



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, रविवार ४ ऑक्टोबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०+४





## पंतप्रधान मोदी बारामती दौ-यावर

### शरद पवारांनी दिली माहिती



बारामती / प्रतिनिधी- येत्या ३ नोव्हेंबर रोजी बारामतीमध्ये एका भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमासाठी खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी बारामतीत येणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) अध्यक्ष शरद पवार यांनी आज पत्रकार परिषदेत ही मोठी माहिती दिली.शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी ३ नोव्हेंबरला बारामती विमानतळावर उतरतील. त्यानंतर तेथून ते थेट विद्या प्रतिष्ठानच्या कॅम्पसमध्ये आयोजित मुख्य कार्यक्रमासाठी उपस्थित राहतील. विद्या प्रतिष्ठानच्या कॅम्पसमध्ये गौतम बुद्धांचा एक अतिशय भव्य पुतळा उभारण्यात आला आहे. या पुतळ्याचे वजन तब्बल ४ टन असून, अशा आकाराचा आणि वैशिष्ट्यपूर्ण पोझमधील पुतळा इतरत्र कुठेही पाहायला मिळत नाही, असे शरद पवार यांनी स्पष्ट केले. ज्या सभागृहात हा पुतळा बसवण्यात आला आहे, तिथे बुद्धांच्या विविध हस्तमुद्राही लावण्यात आल्या आहेत. या प्रत्येक हस्तमुद्रेचा नेमका अर्थ काय आहे, याची सविस्तर माहिती तिथे उपलब्ध करून देण्यात आली आहे. येथे राजमाता जिजाबाई यांच्यासह राज्यासाठी अतुलनीय योगदान देणा-या महापुरु षांची अतिशय उत्तम दर्जाची पेंटिंग्ज साकारण्यात आली आहेत. या प्रत्येक पेंटिंगची साईज ५ बाय ९ फूट (५ फूट रुंद आणि ९ फूट उंच) इतकी मोठी आहे. पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत होणा-या या भव्य अनावरण सोहळ्याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले आहे. मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना निमंत्रण या कार्यक्रमासाठी राज्यपाल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निमंत्रण देण्यात आले आहे. तसेच ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या प्रमुखांसह खासदार पार्थ पवार आणि उद्योगपती सायरस पूनावाला यांनाही कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आल्याची माहिती पवारांनी दिली.

## दिवेआगर दुर्घटनेतील 4 जिवलग मित्रांवर एकत्रच अन्त्यसंस्कार

आळंदी/ प्रतिनिधी- दिवेआगर येथील समुद्रात बुडून मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांवर शुक्रवारी त्यांच्या मूळ गावी अन्त्यसंस्कार करण्यात आले. आळंदीतील तन्मय वहिले, कैवल्य वासनकर, प्रणव बनसोडे आणि सुमीत आहिरे या चार जिवलग मित्रांचे पार्थिव आळंदीतील स्मशानभूमीत आणण्यात आले. आळंदीतील विनर्स क्लासेसचे हे सर्व विद्यार्थी एकमेकांचे खूप जवळचे मित्र होते. तन्मय , कैवल्य, प्रणव आणि सुमीत हे चौघेही आळंदीतच राहत असल्याने त्यांची घट्ट मैत्री होती. आम्ही एकमेकांची काळजी घेउ, असे वचन देउन या मित्रांनी घरून सहलीला जाण्याची परवानगी मिळवली होती. मात्र, नियतीच्या मनात काही वेगळेच होते. शुक्रवारी सकाळी या चौघांचेही पार्थिव आळंदीत आणण्यात आले आणि काही काळ घरी ठेवून त्यांना थेट स्मशानभूमीत नेण्यात आले. जिथे या चारही मित्रांवर एकाच वेळी अन्त्यसंस्कार करण्यात आले. स्मशानभूमीत आपल्या पोटच्या गोळ्यांना सरणावर पाहताना या विद्यार्थ्यांच्या आयांनी जो हंबरडा फोडला, त्याने उपस्थितांचीही मने सुन्न झाली. देवा आमच्यावर हा प्रसंग का आणलास? तळहाताच्या फोडासारखं मुलांना जपलं होतं. तेच आमच्या म्हातारपणाचा आधार होते, असा काळीज पिळवटून टाकणारा आक्रोश या माता करत होत्या. याच दुर्घटनेत प्राण गमावलेले सोहम तुकाराम भांडवलकर आणि राजवीर युवराज वहिले हे आळंदीजवळील केळगावचे रहिवासी होते. या दोन जिवलग मित्रांवर शुक्रवारी सकाळी केळगावच्या स्मशानभूमीत अन्त्यविधी पार पडले.

## बिहारमध्ये पूरस्थिती गंभीर; अनेक नद्यांच्या पाणीपातळीत वाढ



**गांधी घाट** : गेल्या काही दिवसांपासून देशातील अनेक राज्यांत वातावरणात कमालीचा बदल झाल्याचे पहावयास मिळत आहे. बिहारमधील पूरस्थिती गंभीर होत आहे. गंडक नदीचे पाणी सारण जिल्ह्यातील नवीन भागांमध्ये शुक्रवारी पोहोचले. काही ठिकाणी बंधारे फुटल्यानंतर पाणी नवीन भागांमध्ये पसरले. केंद्रीय जल आयोगाने ऑरेंज बुलेटिन जारी केले आहे, जे अनेक जिल्ह्यांमधील २८ ठिकाणी गंभीर पूरस्थिती दर्शवते. इतर नद्यांमधील पाण्याची पातळीही वाढत आहे.हवामान विभागाच्या बुलेटिननुसार, अनेक ठिकाणी गंगा नदी धोक्याच्या पातळीच्या वर वाहत आहे. यामध्ये दानापूर, गांधी घाट, हाथीदाह, दिघा घाट, बांका घाट, महनार, कल्याणपूर, काहलगाव आणि सुलतानगंज यांचा समावेश आहे. दानापूरमध्ये गंगा नदीची पाणी पातळी ५१.४४ मीटर होती, जी धोक्याच्या पातळीपेक्षा ०.२४ मीटर जास्त होती. पाटण्यातील गांधी घाटावर पाणी पातळी ४९.६९ मीटर नोंदवली गेली, जी धोक्याच्या पातळीपेक्षा १.०९ मीटर जास्त होती.सारण जिल्ह्यात, पनापूर आणि मेकर ब्ल?कमधील खराब झालेले बंधारे ओलांडून पुराचे पाणी नवीन भागांत पोहोचले. यामध्ये करचौलिया, अमनौर, जगदीशपूर, मेकर आणि परसा यांचा समावेश आहे. डुमरियाघाट, लालगंज आणि रेवा घाट येथे गंडक नदी धोक्याच्या पातळीच्या वर वाहत होती. मात्र, या तिन्ही ठिकाणी पाणी पातळी कमी होत होती.

### ‘बायकोची पोत विकली, शेत विकले, तरी पण कर्ज फिटलं नाही’, शेतक-याची मृत्यूआधी चिठ्ठी

# अल्पभूधारक शेतक-याने राहत्या घरातच घेतला गळफास

बुलडाणा/प्रतिनिधी : दुष्काळे दाह सुरू झाला आहे. त्यामुळे उत्पन्नाच्या उरल्या सुरल्या आशाही मावळू लागल्या आहेत. त्यामुळे येउ घातलेल्या आर्थिक संकटाने शेतक-यांसमोर नवे आव्हान उभे राहिले असून, अशाच एका घटनेत एका शेतक-याने आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. बुलढाणा जिल्ह्यात ही घटना घडली असून, शेतक-याने चिठ्ठीमध्ये आत्महत्येचे कारणही सांगितले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यात असलेल्या चोंडी टाकळेश्वर या गावात ही घटना घडली आहे. अल्पभूधारक शेतक-याने कर्जाच्या तणावामुळे राहत्या घरातच गळफास घेउन आत्महत्या केली. शंकर रामभाउ भारसाकळे असे आत्महत्या केलेल्या शेतक-याचे नाव आहे.

आत्महत्या करण्यापूर्वी लिहिली चिठ्ठी- शंकर भारसाकळे यांनी आत्महत्या करण्यापूर्वी एक चिठ्ठी लिहून ठेवली. त्यांच्या चिठ्ठीतील मजकूर वाचून सगळ्यांच्याच काळजाचं पाणी पाणी झाले. ‘माझ्यावर खूप कर्ज आहे. वावर विकून पण कर्ज फिटले नाही. एक वावर गहाण ठेवून बी फिटले नाही. बायकोची पोत गहाण ठेवून पण पाहिजे तितके पैसे भेटले नाही म्हणून मी आता जीवन संपवत आहे’, अशी चिठ्ठी लिहून शंकर भारसाकळे यांनी आत्महत्या केली.



## ज्ञानेश कुमार यांच्याविरोधातील जंतर-मंतरच्या आंदोलनाप्रकरणी पोलिसांकडून 3 गुन्हे दाखल



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे मुख्य निवडणूक आयुक्त (CEC) ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात झालेल्या निदर्शनांप्रकरणी दिल्ली पोलिसांनी तीन FIR दाखल केले आहेत. जमावबंदी आणि मनाई आदेश लागू असतानाही आंदोलकांनी एकत्र येउन निदर्शने केल्याचा आरोप पोलिसांनी ठेवला आहे. या कारवाईत संसद मार्ग पोलीस ठाण्यात दोन गुन्हे तर कनाट प्लेस पोलीस ठाण्यात एक गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

२ ऑक्टोबरला जंतर-मंतर आणि आसपासच्या परिसरात आंदोलन आयोजित करण्यात आले होते. यामध्ये काँग्रेस, आम आदमी पार्टी, डावे पक्ष, विविध विद्यार्थी संघटना आणि नागरी समाजातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनाची शक्यता लक्षात घेउन दिल्ली पोलिसांनी सुरक्षेचा उपाय म्हणून नवी दिल्ली जिल्ह्यात आधीच बीएनएसएस (BNSS) कलम १६३ अंतर्गत मनाई आदेश लागू केले होते. मात्र, हे आदेश झुगारून आंदोलकांनी जंतर-मंतरच्या दिशेने कूच करण्याचा प्रयत्न केला.

परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी दिल्ली पोलिसांनी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात केली होती. आंदोलनादरम्यान जंतर-मंतर आणि दिल्लीच्या विविध भागांतून सुमारे ७५० हून अधिक लोकांना ताब्यात घेण्यात आले. एफआयआरमध्ये सध्या कोणत्याही विशिष्ट व्यक्तीचे किंवा संघटनेचे नाव थेट आरोपी म्हणून नोंदवण्यात आले नसले तरी, आंदोलनाचे आयोजक आणि सहभागी संघटनांचा उल्लेख करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहितेच्या (BNS) विविध कलमांखाली हे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी-** विरोधी पक्ष आणि विविध संघटनांनी निवडणूक आयोगातर्फे राबवल्या जाणा-या ‘स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन’ (SIR) प्रक्रियेला तीव्र विरोध दर्शवला आहे. मतदार याद्यांच्या पुनरीक्षणादरम्यान १३ कोटींहून अधिक पात्र मतदारांची नावे हटवण्यात आल्याचा आरोप करत विरोधकांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. दुसरीकडे, निवडणूक आयोगाने या सर्व आरोपांचे खंडन केले असून मतदार याद्यांची पारदर्शकता आणि अचूकता राखण्यासाठी ही मोहीम आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे.

## मुंबई पोलिसांचा CJP ला दणका!

### शिवाजी पार्कवर आंदोलन करणा-या 500 जणांवर FIR दाखल

**मुंबई/प्रतिनिधी :**मुंबईतील ऐतिहासिक शिवाजी पार्क मैदानात महात्मा गांधी जयंतीला काक्रोच जनता पार्टीने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात आंदोलन केले आणि त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. पण या आंदोलनासाठी परवानगी न घेता आंदोलन आयोजित केल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. ’काकरोच जनता पार्टी’ चे नेते आणि कार्यकर्त्यांसह सुमारे ४०० ते ५०० अज्ञातांविरु द्ध शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. निवडणूक सुधारणा आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले होते. पण याचा सीजेपीलाच फटका बसला असल्याची चर्चा आहे.आंदोलनाची घटना २ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ ते संध्याकाळी ७ वाजेच्या दरम्यान घडली. पोलीस प्रशासनाकडून आंदोलनासाठी आधीच रीतसर परवानगी नाकारण्यात आली होती. परिसरात कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. तरीही पोलिसांच्या मनाई आदेशाचे उल्लंघन करत आंदोलकांनी शिवाजी पार्कवर एकत्र येउन जोरदार निदर्शने केली. स्थानिक रहिवाशांनी दिलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी तात्काळ दखल घेत ही कायदेशीर कारवाई केली. या प्रकरणी नोंदवण्यात आलेल्या एफआयआरमध्ये आफ्रीन नवाज, सौम्या कोर्डे, अंकित भारद्वाज, विजय मालगी आणि योगेश इंगले यांच्यासह सीजेपीच्या प्रमुख नेत्यांची नावे नमूद करण्यात आली आहेत. शिवाजी पार्क पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या (BNS) कलम १८९(२) आणि २२३, तसेच महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम ३७(१), ३७(३) आणि १३५ अंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत.मुंबई पोलिसांनी स्पष्ट केले आहे की, शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी परवानगीशिवाय अशा प्रकारची आंदोलने करण्यास सक्त मनाई आहे. या आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते आणि वाहतुकीवरही परिणाम झाला होता. सध्या पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास करत असून आंदोलनाच्या आयोजकांवर अधिक कारवाई करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## प्रेमानंद महाराजांचा आश्रम पुन्हा वादाच्या भोव-यात; मुलांसह महिला बेपत्ता

**वृंदावन/वृत्तसंस्था :** वृंदावन येथील प्रेमानंद महाराजांचा राधा केलि कुंज आश्रम पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. एका शिष्याचा संशयास्पद मृत्यू झाल्यानंतर आता आश्रमाशी संबंधित आणखी काही घटना घडल्या आहेत. आश्रमात आलेला १७ वर्षीय अनुज चौधरी हा मुलगा बेपत्ता झाल्याचा दावा त्याच्या कुटुंबीयांनी केला आहे. मुलाचा शोध घेण्यासाठी त्याचे कुटुंबीय प्रेमानंद महाराजांच्या आश्रमासमोर आंदोलनाला बसले आहेत. अनुजला सुखरूप परत आणावे, अशी त्यांची मागणी आहे. तसेच आश्रमातील काही शिष्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याचा आरोपही कुटुंबीयांनी केला आहे. याचदरम्यान नोएडाहून प्रेमानंद महाराजांच्या आश्रमात आलेली एक महिलाही बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. तिचे वडील मुलीचा शोध घेत वृंदावनमध्ये दाखल झाले आहेत. याशिवाय आश्रमाबाहेरील एका ढाब्यावर काम करणा-या महिलेचे १० वर्षांचे मूलही बेपत्ता असल्याचे सांगितले जात आहे. या घटनांमुळे (पान २ वर)



## १६ वर्षीय मयंक प्रेमानंद महाराजांचा होता भक्त

**वृंदावन/वृत्तसंस्था :**वृंदावनातील प्रसिद्ध केली कुंज धामशी जोडलेला एक १६ वर्षीय अल्पवयीन मुलगा गेल्या तब्बल दोन महिन्यांपासून रहस्यमयी परिस्थितीत बेपत्ता झाला आहे. कासगंजचा राहणारा मयंक नावाचा हा तरु ण संत प्रेमानंद महाराज यांच्या प्रवचनाने आणि विचारांनी अत्यंत प्रभावित होता, असे त्याच्या कुटुंबीयांनी सांगितले आहे. यापूर्वीही तो अनेकदा वृंदावनात आला होता, मात्र यावेळी तो बेपत्ता झाल्याने कुटुंबीयांवर मोठा आघात झाला आहे.समोर आलेल्या माहितीनुसार, कासगंजचा राहणारा १६ वर्षीय मयंक ७ ऑगस्टच्या रात्री ट्रेनने मथुरेमध्ये पोहोचला होता. त्यानंतर आजतागायत त्याचा कोणताही सुगावा लागलेला नाही. तरु ण मुलाविरोधात त्याच्या कुटुंबीयांनी कासगंज पोलीस (पान २ वर)




## शरद पवारांनी विधान परिषदेच्या ७ जागा दिल्या, भाजपसोबत १२ वर्षांत एकही नाही; रामदास आठवलेंची खंत

**मुंबई/प्रतिनिधी :**शरद पवारांसोबत असताना त्यांनी रिपब्लिकन पक्षाला विधान परिषदेच्या सात जागा दिल्या होत्या. मात्र, २०१४ पासून भाजपसोबत असूनही पक्षाला विधान परिषदेची एकही जागा मिळाली नसल्याची खंत आठवले यांनी व्यक्त केली. आठवले म्हणाले की, महायुतीतील सर्व घटक पक्षांनी रिपब्लिकन पक्षाला योग्य प्रतिनिधित्व दिले पाहिजे. पक्षाला सत्तेत वाटा, मंत्रिपद आणि विधान परिषदेतील प्रतिनिधित्व मिळावे, अशी त्यांची मागणी आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांसह स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही रिपब्लिकन पक्षाला पुरेशा जागा मिळत नसल्याचे आठवले यांनी सांगितले. मात्र, याला अन्याय असे म्हणत नसल्याचे स्पष्ट करत मोठ्या पक्षांनी सत्तेतील वाटा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

**सर्व रिपब्लिकन पक्षांनी एकत्र यावे-** सर्व रिपब्लिकन पक्ष एकत्र आल्यास संघटनेची ताकद वाढेल, असेही आठवले म्हणाले. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनुसार व्यापक राजकीय संघटन उभारण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

**निवडणूक आयोगाबाबतही भूमिका-** मतदार याद्यांमधून काही मतदारांची नावे वगळली गेल्याच्या तक्रारींबाबत निवडणूक आयोगाने आवश्यक प्रयत्न करून ती नावे समाविष्ट करावीत, असे आठवले यांनी म्हटले. तसेच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा देण्याची आवश्यकता नसल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

**अभिजित दीपके यांना आठवलेंचा सल्ला-** दरम्यान, अभिजित दीपके यांनी आम आदमी पक्षात प्रवेश करावा, असा सल्ला आठवले यांनी दिला. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात आक्षेपार्ह किंवा शिवराळ भाषा वापरू नये, असेही त्यांनी म्हटले.

## मुंबईसह महाराष्ट्रातून मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू

**मुंबई** : मुंबईसह राज्यातील काही भागातून मोसमी वारे अर्थात मान्सूनने माघार घेण्यास सुरु वात केली आहे. मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने याबाबतची घोषणा केली आहे. दरम्यान, पुढील २ ते ३ दिवसांत संपूर्ण महाराष्ट्रातून मान्सून माघारी फिरण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. त्यामुळे राज्यातील मान्सूनचा परतीचा प्रवास लवकरच पूर्ण होण्याची शक्यता आहे. मोसमी वारे हे राज्यामधल्या काही भागांमधून माघारी गेलेले आहेत. मुंबईसह राज्यामधल्या काही भागांमधून मोसमी वारे हे सध्या माघारी फिरत आहेत. पुढील दोन-तीन दिवसांत संपूर्ण राज्यामधून मान्सून माघारी फिरण्यासाठी अनुकूल असे (पान २ वर)






## राहुल गांधींनी लाँच केला ‘सत्याग्रह’ मंच

### देशभरातील सर्व आंदोलने एकाच नकाशावर!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**राहुल गांधींनी सत्याग्रह वेबसाईट लान्च केली आहे. त्यांनी सांगितले की, याचा उद्देश संघर्ष करणा-या आणि विरोध करणा-या लोकांना आवाज देणे हा आहे. त्यांनी लोकांना आपली गोष्ट शेअर करण्याचे आवाहन केले आहे.

काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शनिवारी सत्याग्रह नावाच्या एका नव्या मंचची सुरु वात केली. या मंचचा उद्देश देशभरात आपल्या हक्कांसाठी आणि न्यायासाठी संघर्ष करणा-या लोकांचा आवाज एका सामायिक मंचावर आणणे हा आहे. राहुल गांधींनी महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त याची सुरु वात केली आणि यासंदर्भातील वेबसाईटची लिंकही शेअर केली.

त्यांनी एक व्हीडीओ जारी करून म्हटले, जेन झी, विद्यार्थी, शेतकरी, आदिवासी, दलित, महिला, प्रत्येक संघर्षाची स्वत:ची एक गोष्ट आहे. मात्र जो आवाज एकटा उठतो, तो अनेकदा दाबला जातो. त्यांनी म्हटले, देशभरात लोक अन्यायाविरोधात आवाज उठवत आहेत. विरोधी पक्षनेता म्हणून तुमची लढाई ही माझी लढाई आहे. आता नव्या सत्याग्रहाची वेळ आहे. तुम्ही कोणत्या मुद्द्यांसाठी संघर्ष करत आहात, ते मला सांगा. मी तुमचे म्हणणे ऐकत आहे.काँग्रेस नेत्यांचे म्हणणे आहे की, सत्याग्रह हा या सर्व आवाजांना एका मंचावर एकत्र आणण्याचा उपक्रम आहे. राहुल गांधींनी लोकांना आवाहन केले की, जर ते कोणत्याही



अन्यायाविरोधात लढत असतील, तर त्यांनी आपली गोष्ट या मंचावर शेअर करावी. त्यांनी म्हटले, तुमच्यासारखे आणखी कोण-कोण लढत आहेत, हे तुम्ही पाहाल. आणि मी जे काही करू शकतो, ते करेन संसदेत, रस्त्यावर, पत्र लिहून, जिथे जिथे माझी गरज असेल तिथे तुमच्यासोबत उभे राहून विरोधी पक्षनेता म्हणून ही माझी जबाबदारी आहे. त्यांचे म्हणणे आहे की, या मंचाच्या माध्यमातून लोक आपली ओळख, आपले मुद्दे आणि त्यांच्या हक्कांच्या मार्गात उभ्या असलेल्या आव्हानांची माहिती शेअर करू शकतात.

**प्रत्येक संघर्षाची स्वत:ची एक कहाणी-** एकट्याने उठणारा आवाज अनेकदा दाबला जातो. सत्याग्रह हा या सर्व आवाजांना एका नकाशावर एकत्र आणण्याचा एक उपक्रम आहे. महात्मा गांधींच्या विचारांचा संदर्भ देत राहुल गांधी म्हणाले की, बापूंनी सत्याग्रहाचा मार्ग दाखवला. ते म्हणाले की सत्य हे सर्वांत मोठे शस्त्र आहे, परंतु सत्यासोबत एकजूट होउन उभे राहणे ही त्याहूनही (पान २ वर)

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# भाकड कथांच्या नादी न लागता ग्रंथांचे अध्ययन करा - विठ्ठल कुलट

**मोर्शी/प्रतिनिधीः-** महापुराणातील स्वर्ग- नरक,पाप-पुण्य देव-दानवांचे भांडणं, समुद्र मंथनातील अमृत इत्यादी सगळ्या काल्पनिक दंतकथा, आख्यायिका आणि भाकड कथा आहेत.त्या लिहिणारा आणि आताचे हे सांगणारे सगळे ढोंगी,भोंदू,पोटभरू आहेत.आपला बहुजन समाज त्यांच्या फारच आहारी गेलेला आहे. भोळ्या भाबड्यांची बुद्धी भ्रष्ट करण्याच्या षडयंत्रातून बाहेर पडण्यासाठी बहुजन समाजातील, खेड्यापाड्यातील लोकांनी- संत आणि समाज सुधारकांनी लिहिलेल्या वास्तववादी ग्रंथांचे अध्ययन करून,त्यातील विचार आचरणात आणावेत, असे मत प्रतिभा साहित्य संघाचे संस्थापक अध्यक्ष कवी विठ्ठल कुलट यांनी व्यक्त केले.सदर कार्यक्रमाचे आयोजन मोर्शी येथील पंजाबबाबा सभागृहात महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य-जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय,अमरावती यांच्या विद्यमाने आयोजित,महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण- २०१० अंतर्गत,ग्रंथोत्सवाचे दि.३ व ४ ऑक्टो.रोजी आयोजन करण्यात आले आहे. या ग्रंथोसवाच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षीय भाषणातून विठ्ठल कुलट यांनी अंधश्रद्धेवर प्रहार करणाऱ्या,वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारणाऱ्या तसेच शेतकऱ्यांचे सुखदुःख आणि परिवारातील नातेसंबंध यावर काव्य गायन करून वरील मत मांडले. ग्रंथोत्सव व ग्रंथदिंडीचे उद्घाटन मोर्शीचे नायब तहसीलदार विनोद वानखडे यांच्या हस्ते करण्यात



आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ.अतुल वानखडे यांनी केले.वक्ते जगदीश पाटील यांनी 'भारताचा रक्तरंजित इतिहास'या विषयावर प्रसंगांचे दाखले देऊन श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. कविवर्य विजय सोसे यांनी'महात्मा फुलेंच्या ग्रंथातील शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या कविता'या विषयावर भाष्य करतांना त्यांच्या लोकप्रिय' दिसं निंगाला निंगाला पन सूर्य कुठी गेला। ज्याची कपटाची नीती,त्यानं हिसकून नेला! तसेच कास्तकारीच्या डावात, नशीब माह्य हारलं,तरी वावरं पेरलं म्या,वावर पेरलं! इत्यादी कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकलीत.यावेळी विचारपीठावरील अमरावती विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर घुगे,अमरावती ग्रंथालय संघाचे अध्यक्ष, चंद्रकांत चांगदे,ग्रंथमित्र राजेश डांगटे,भारतीय महाविद्यालय मोर्शीचे ग्रंथपाल अरविंद पाझारे, सहाय्यक ग्रंथालय संचालक डॉ.राजेश पाटील या मान्यवरांनी ग्रंथांच्या विषयावर मौलिक विचार व्यक्त केलेत.कार्यक्रमाचे संचालन श्रीकांत तळोकार,स्वागत राजेश देवकर तर आभार कैलास गव्हाळे यांनी मानले. उद्घाटन समारंभापूर्वी मोर्शी शहरातील मुख्य रस्त्यावरून ग्रंथदिंडी काढण्यात आली.यामध्ये अण्णासाहेब कानफाडे स्मृती विद्यालयाच्या मुलींनी सहभाग घेतला होता.या ग्रंथोत्सवात साहित्यप्रेमी,विद्यार्थी, वाचक,नागरिक,ग्रंथप्रेमी, शिक्षक यांचा विशेष सहभाग होता.यावेळी आयोजकांच्या वतीने ग्रंथ प्रदर्शनी येथून पुस्तकांचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले.

# अचलपूरात गणपती विसर्जन घाटांची स्वच्छता मोहीम

## -'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत आयोजन





**अचलपूर/प्रतिनिधीः-** अमरावती ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या वतीने ३ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र शासन प्रणित 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अचलपूर तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातील सार्वजनिक गणपती विसर्जन घाट स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये अचलपूर शहरातील कृष्ण पूल परिसरात अचलपूर व सरमसपुरा पोलिस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने स्वच्छता मोहिम राबविण्यात आली आणि परतवाडा पोलिस स्टेशन तर्फे गोंडविहीर येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली .यावेळी गोंडविहीर येथे अचलपूर पोलिस उपविभागीय अधिकारी ईशानी आनंद ,परतवाडा पोलिस स्टेशन चे ठाणेदार अजय आखरे यांची उपस्थिती होती . अचलपूर शहरातील कृष्णपुल परिसरात अचलपूर पोलिस स्टेशनचे ठाणेदार कैलाश भगत , सरमसपुरा पोलिस स्टेशन चे ठाणेदार गौतम इंगळे यांच्या सह घटकातील सर्व अधिकारी व अंमलदार यांनी गणपती विसर्जन घाटांची स्वच्छता करण्यामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.अचलपूर शहरातील गांधीपुल परिसरातील कृष्ण पूल आणि गोंडविहीर येथे मोठ्या प्रमाणात गणपती बाप्पांचे विसर्जन होते. या दोन प्रमुख विसर्जन घाटांवर विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. अचलपूर पोलिस उपविभागीय अधिकारी ईशानी आनंद यांनी स्वतः सहभाग नोंदविला. यंदाच्या संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नैसर्गिक जलस्रोतांचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक असून नद्या, तलाव, धरणे व इतर जलस्रोत स्वच्छ ठेवणे, त्यांचे प्रदूषण टाळणे आणि त्यांचे संवर्धन करणे ही सामूहिक जबाबदारी असल्याचे मत अचलपूर उपविभागीय अधिकारी ईशानी आनंद यांनी व्यक्त केले. याच उद्देशाने जलस्रोतांची स्वच्छता करून त्यांचे संवर्धन व संरक्षण करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या 'सेवा संकल्प' अभियानांतर्गत अमरावती ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.अमरावती ग्रामीण पोलीस दलाच्या 'ऑपरेशन कवच' अंतर्गत स्वच्छता, जलस्रोत संवर्धन आणि सामाजिक जबाबदारीचा संदेश देत हा उपक्रम राबविण्यात आला.

# छपाईच्या पैशांवरून वाद विकोपाला -तिघांचा रॉडने हल्ला

## दुल्हा गेट परिसरातील घटना, -दोघांसह तरुण जखमी, अचलपूर पोलिसांत गुन्हा

अचलपूर/प्रतिनिधीः- छपाईच्या कामाचे पैसे देण्यावरून सुरू असलेल्या वादाचे पर्यवसान थेट मारहाणीत झाले. तिघांनी लोखंडी रॉडने केलेल्या हल्ल्यात एकाच कुटुंबातील दोघांसह एक तरुण जखमी झाल्याची घटना दुल्हा गेट परिसरात घडली. याप्रकरणी अचलपूर पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.मोहम्मद शफीक शेख हनीफ (वय २७) यांच्या भावाकडे परवेज खान युसूफ खान (वय २८) हा छपाईचे काम करीत होता. या कामाच्या मोबदल्यावरून दोघांमध्ये काही दिवसांपासून वाद सुरू होता. याच कारणावरून परवेजने शफीक यांना धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यानंतर काही वेळाने परवेज हा मो. इशाक शेख चांद (वय ४०) आणि मो. अलीम मो. इलियाज (वय ३६) यांच्यासोबत घटनास्थळी आला. यावेळी पुन्हा वाद झाला.

त्यातून परवेजने शफीक यांच्या भावाच्या डोक्यावर लोखंडी रॉडने वार केल्याचा आरोप आहे. मारहाण सुरू असल्याचे पाहून त्यांचे वडील भांडण सोडविण्यासाठीमध्ये पडले. त्यावेळी इशाकने त्यांच्या डोक्यावर रॉडने मारल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तर अलीमने शफीक यांच्या उजव्या खांद्यावर रॉडने प्रहार केल्याचा आरोप आहे. या घटनेदरम्यान आरोपींकडून शिवीगाळही करण्यात आल्याचे पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत नमूद आहे. घटनेनंतर जखमींनी पोलिसांत धाव घेतली. तक्रारीच्या आधारे अचलपूर पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ३५१(२), ३५२ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### राहुल गांधींनी लॉंच केला

मोठी शक्ती आहे. त्यांनी अन्यायाविरुद्ध संघर्ष करणा-या लोकांना आपल्या कथा सांगण्याचे आवाहन केले.

### मुंबईसह महाराष्ट्रातून मान्सूनचा

वातावरण तयार होत आहे. मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने या संदर्भातली माहिती दिली आहे. शेतक-यांसाठी आणि सर्वसामान्यांसाठी देखील चिंता निर्माण करणारी ही बातमी आहे. भारतीय हवामान विभागाकडून मोठी घोषणा केली आहे. राज्यातल्या काही भागातून मोसमी वारे माघारी परतले असल्याची घोषणा ही भारतीय हवामान केंद्राकडून करण्यात आलेली आहे आणि सोबतच पुढील दोन ते तीन दिवसांत संपूर्ण राज्यातून हे मोसमी वारे माघारी परततील. एकूणच परतीचा पाउस हा कुठेतरी होईल, अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

### प्रेमानंद महाराजांचा आश्रम

आश्रमातील व्यवस्थेबाबत विविध चर्चा सुरू झाल्या आहेत.प्रेमानंद महाराज गेल्या काही वर्षांत सोशल मीडियामुळे मोठ्या प्रमाणात चर्चेत आले. २०२३ मध्ये विराट कोहली आणि अनुष्का शर्मा आपल्या मुलीसह त्यांच्या आश्रमात पोहोचले होते. त्यानंतर प्रेमानंद महाराजांची देशभरात मोठी चर्चा झाली.सोशल मीडियावर त्यांच्या सत्संगाचे व्हीडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होउ लागले. त्यांच्या रात्रीच्या पदयात्रेलाही मोठी गर्दी होउ लागली. अनेक प्रसिद्ध व्यक्ती आश्रमात येउ लागल्याने त्यांची लोकप्रियता आणखी वाढली. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून त्यांची रात्रीची पदयात्रा बंद असल्याचे सांगितले जात आहे.

### १६ वर्षीय मयंक प्रेमानंद

ठाण्यात तो लापता असल्याची तक्रार दाखल केली असून, गेल्या दोन महिन्यांपासून ते त्याच्या शोधात राज्यभर वणवण भटकत आहेत. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, मयंक सोशल मीडियावर संत प्रेमानंद महाराज यांचे व्हिडिओ नियमितपणे पाहत असे. त्यांच्या विचारांमुळे प्रेरित होउनच तो यापूर्वीही वृंदावनात आला होता. यामुळेच तो पुन्हा वृंदावनातच आला असावा, असा ठाम संशय त्याच्या पालकांना आहे.

### समृद्धी महामार्गावर पुन्हा भीषण

हाताला गंभीर दुखापत झाली असून उषा शिवरकर, रीना रामटेके, कमोद भावे, बंडू उरकुडे, योगेश उरकुडे, संजय सोंदरकर, शांता सोनवणे व वंदना बुराडे हे गंभीर जखमी झाले आहेत. तर रोहित सहारे, अमर सहारे, स्वभा वाघमारे, विनोद रामटेके, अजय राऊत, अशोक कुंबले, महेंद्र शिवरकर व ललिता राऊत हे किरकोळ जखमी झाले आहेत.सर्व १७ जखमींना तातडीने धामणगाव रेल्वे येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. वाहनचालक ओम पंढरी तनपुरे (वय २६, रा. वाकद, ता. रिसोड) यांच्यासह काही प्रवासी सुदैवाने सुरक्षित राहिले.

**२० मिनिटांत मदतकार्य सुरू-** अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस (IC-७ गावनेर, तळेगाव) येथील पोलीस हेड कॉन्स्टेबल दीपक मांडवे, तसेच MSF जवान अश्विन चव्हाण व आकाश राठोड यांनी अवघ्या २० मिनिटांत घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तत्काळ बचावकार्य सुरू करून जखमींना बाहेर काढण्यास मदत केली.

**अपघातांचे सत्र सुरूच**-समृद्धी महामार्गावर गुरुवारी झालेल्या भीषण अपघातात दुर्गादेवीचा रथ घेऊन जाणाऱ्या बोलेरो पिकअपला ट्रकने धडक दिल्याने ७ भाविकांचा मृत्यू झाला होता, तर अनेक जण जखमी झाले होते. या घटनेच्या धक्क्यातून परिसर सावरत असतानाच दुसऱ्याच दिवशी पुन्हा पिकअप वाहनाला झालेल्या अपघातामुळे समृद्धी महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अपघातानंतर पोलिसांनी क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त पिकअप वाहन महामार्गाच्या शोल्डर लेनवर हलविले. घटनास्थळी बॅरिकेट्स व कोन्स लावून वाहतूक सुरक्षित करण्यात आली. तळेगाव दशासर पोलिसांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी पोहोचून महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली. या अपघाताचा पुढील तपास तळेगाव दशासर पोलीस करीत आहेत.

### समृद्धीवर प्रवेशाचे 'फोन कनेक्शन'

कोणाची? मिळालेल्या माहितीनुसार, दुर्गामातेची मूर्ती घेऊन जाणारे वाहन कारंजा टोल प्लाझाजवळ समृद्धी महामार्गावर प्रवेशासाठी पोहोचले. त्यावेळी टोल कर्मचाऱ्यांनी वाहन अडवून या प्रकारच्या वाहनाला महामार्गावर प्रवेशाची परवानगी नसल्याचे सांगितल्याची माहिती आहे. मात्र युवकांनी मागील वर्षी याच मार्गाने मूर्ती आणल्याचे सांगत प्रवेश देण्याची मागणी केली. 'देवी याच मार्गाने न्यायची' या भूमिकेवर काही युवक ठाम होते, अशी माहिती टोल परिसरातील सूत्रांकडून समोर आली आहे. यानंतर फोनाफोनी सुरू झाली. सकाळी सुमारे ११ वाजून २१ मिनिटांच्या सुमारास फोन झाल्यानंतर वाहनाला प्रवेश देण्यात आल्याची चर्चा आहे. या फोननंतर एका आमदाराच्या पीएने संबंधितांशी संपर्क साधल्याची माहितीही चर्चेत आहे. मात्र हा फोन

नेमका कोणत्या आमदाराच्या पीएने केला, कोणत्या अधिकाऱ्याशी केला आणि त्या फोननंतर प्रवेशाची परवानगी नेमकी कोणी दिली, याचा अधिकृत खुलासा अद्याप झालेला नाही.

**फोनची 'कॉल डिटेल' तपासा**-अपघाताच्या तपासाबरोबरच वाहनाला महामार्गावर प्रवेश कसा मिळाला, याचाही स्वतंत्र तपास होण्याची मागणी होत आहे. कारंजा टोल प्लाझावरील सीसीटीव्ही फुटेज, वाहन प्रवेशाची नोंद, टोल कर्मचाऱ्यांचे जबाब, पोलिसांची नोंद आणि संबंधित वेळेतील अधिकृत फोन कॉलची माहिती तपासल्यास या प्रश्नांची उत्तरे मिळू शकतात.

### दर्यापूर तालुक्यातील ग्रामिण

केंद्रांच्या माध्यमातून ग्रामिण भागातील उपकेंद्रे चालविली जातात. गावपातळीवर नागरिकांना प्राथमिक उपचार, लसीकरण, माता-बाल आरोग्य सेवा आणि विविध आरोग्यविषयक सुविधा पुरविण्यात या केंद्रांची महत्त्वाची भूमिका असते. मात्र आवश्यक असलेले कर्मचारी उपलब्ध नसल्याने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार पडत आहे.परिणामी, रुग्णांची तपासणी, नियमित आरोग्य सेवा आणि इतर वैद्यकीय कामांच्या व्यवस्थापनावर परिणाम होत आहे. विशेषतः तातडीच्या उपचारांची गरज असलेल्या रुग्णांना वेळेत सेवा मिळणे महत्त्वाचे असल्याने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. ग्रामिण भागातील नागरिकांना उपचारांसाठी दूरच्या शहरांमध्ये धाव घ्यावी लागू नये, यासाठी स्थानिक आरोग्य केंद्रे सक्षम असणे आवश्यक आहे. केवळ इमारती आणि उपकरणे उपलब्ध असून चालत नाही तर आवश्यक वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि इतर कर्मचाऱ्यांची उपलब्धताही महत्त्वाची आहे. त्यामुळे संबंधित आरोग्य विभागाने रिक्त पदांची अधिकृत स्थिती स्पष्ट करून पदभरतीसाठी ठोस कार्यवाही करावी, अशी अपेक्षा आहे.

### नशेत झालेल्या वादानंतर तरूणाने

विषारी पदार्थ गिळले. घटनेची माहिती डायल ११२बीट मार्शल-२ ला मिळताच बडनेरा बीट मार्शल-२ चे पोलीस कर्मचारी पीसी नीरज बनारसे, त्यांच्यासोबत डीओ जीपीएसआय संजय देशमुख आणि हेड कॉन्स्टेबल कैलास धाखरे तत्काळ घटनास्थळी पोहोचले. पोलीस पथकाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन युवकाला तातडीने वाहनाने जिल्हा सामान्य रुग्णालय येथे दाखल केले, जेथे त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

### पत्नीला निरोप देताना घात

ते रेल्वेतून खाली उतरण्याच्या तयारीत होते. दरम्यान, रेल्वेने हालचाल सुरू करून वेग पकडला. त्याचवेळी दिनेश यांनी खाली उतरण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोल गेल्याने ते प्लॅटफार्मवर न पडता रेल्वेखाली गेल्याचे पोलिसांनी सांगितले. गंभीर दुखापत झाल्याने त्यांना तातडीने उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात नेण्यात आले. रेल्वे पोलिसांना घटनेची माहिती मिळताच पथक घटनास्थळी पोहोचले. जखमी अवस्थेतील दिनेश यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. या घटनेनंतर मृतदेह इर्विन रुग्णालयाच्या शवागारात ठेवण्यात आला. रेल्वे पोलिसांनी घटनेची नोंद घेतली असून, अपघाताच्या परिस्थितीचा तपास सुरू केला आहे.

### अमरावती विभाग शिक्षक

संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपूर्वी पूर्ण करण्यात येणार आहे.

### युवकांना उडवून कार पोलवर

चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्याचवेळी रस्त्यावरून जाणाऱ्या दोन युवकांना कारने जोरदार धडक दिली. धडकेच्या तीव्रतेमुळे दोन्ही युवक रस्त्यावर फेकले गेले आणि त्यांना गंभीर दुखापत झाली. युवकांना धडक दिल्यानंतरही कार थांबली नाही. नियंत्रणाबाहेर गेलेले वाहन पुढे जाऊन रस्त्याच्या कडेला असलेल्या पोलवर आदळले. या अपघाताचा आवाज आणि आरडाओरड ऐकून परिसरातील नागरिक घटनास्थळी जमा झाले. नागरिकांनी तत्काळ जखमी युवकांना मदत केली. दोन्ही जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती मिळाली. दरम्यान, अपघातामुळे संतप्त झालेल्या काही नागरिकांनी कारचालकाला वाहनातून बाहेर काढून मारहाण केली. त्यामुळे काही काळ परिसरात गोंधळाची स्थिती निर्माण झाली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, चालकाचे वाहनावरील नियंत्रण कसे सुटले आणि जखमींची वैद्यकीय स्थिती याबाबत तपास सुरू आहे. बातमी लिहिपर्यंत पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

### गुणवंत महाराज मंदिरातून

मोठी गर्दी असल्याने त्या महिलेला दर्शनासाठी रांगेमध्ये उभे राहावे लागले. गर्दीत दर्शना दरम्यान अज्ञात आरोपीने गर्दीचा फायदा घेत त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून गायब झाले.काही वेळानंतर महिलेला आपल्या गळ्यातील मंगळसूत्र गायब झाल्याचे लक्षात आले. त्यांनी तात्काळ आरडाओरडा केला, त्यामुळे आसपासचे श्रद्धाळूही सतर्क झाले. मात्र आरोपी गर्दीचा फायदा घेत तेथून निसटण्यात यशस्वी झाला.घटनेची माहिती मिळताच शिरजगांव कसबा पोलिसांचे पथक मंदिर परिसरात पोहोचले. पीडित महिलेच्या तक्रारी वरून अज्ञात आरोपी विरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता मंदिर परिसर आणि परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले जात आहे.

### भाडेपट्ट्याने शेती करणा-या

किंवा लागवण पट्ट्याने शेती करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना दुष्काळी उपाययोजनांचा लाभ मिळण्यासाठी योग्य व्यवस्था करण्याची मागणी भाजपा किसान मोर्चा मेळघाटचे जिल्हाध्यक्ष माधव अवघड आणि सरचिटणीस अंकुश घुलक्षे यांनी केली आहे.यासाठी कृषी सहायक, ग्राम महसूल अधिकारी व पोलीस पाटील यांचा संयुक्त पंचनामा व अहवाल ग्राह्य करण्याची मागणी ही त्यांनी या निवेदनाद्वारे केली आहे.

### ७ दिवसांपासून तरूणी बेपत्ता

घेऊन गेला व तिचे अपहरण केले. मात्र, या आरोपांची अधिकृत पुष्टी होणे बाकी आहे.युवतीचे आई-वडील अतिशय गरीब कुटुंबातील आहेत. मुलगी बेपत्ता झाल्यापासून ते सतत तिच्या शोधाबाबत चिंतेत आहेत. शिवराय कुलकर्णी यांचा आरोप आहे की, तक्रार दाखल होऊन सात दिवस झाले तरी पोलिसांकडून प्रकरणात अपेक्षित कारवाई दिसून आली नाही. त्यांचे म्हणणे आहे की, पोलिसांनी संबंधित युवकाच्या घरी जाऊन चौकशी करायला हवी होती, परंतु आतापर्यंत या दिशेने कोणतेही ठोस पाऊल उचलल्याची माहिती समोर आली नाही.यामुळे कुलकर्णी यांनी हे आंदोलन केले. त्याची दखल देत शोधकार्य सुरू करण्यात आले.

### तलावात बुडून पुन्हा दोन

निवेदन/२०२६ अन्वये आदेश काढला होता की, विभागांतर्गत असलेल्या सर्व प्रकल्पांवर धोक्याचे फलक लावण्यात येऊन सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात. परंतु; या आदेशाचे पालन न करता भानखेडा येथील तलाव आजही असुरक्षित ठेवण्यात आलेला आहे. ना कुंपण, ना सुरक्षा रक्षक, ना धोक्याचे फलक. त्यामुळेच आज पुन्हा दोन मुले बळी पडली. त्यामुळे जिल्ह्यातील राजकीय नेते आणि संबंधित अधिकारी झोपले आहेत का? असा सवाल उपस्थित होत आहे. निष्काळजी अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून त्यांना निलंबित करावे आणि तात्काळ सर्व तलावांना कुंपण घालून सुरक्षा व्यवस्था करावी, अशी मागणी हरमकर यांनी केली आहे. या सोबतच, प्रमोद पांडे, संध्या अवसरे, मोनाली आगाशे, संगिता गजभिये, अंजली पांडे, दत्ता पाटणे, वसंत पाटील, बिजवे, अमोल आगाशे, दिपक कोल्हे, पिंटू दाते, प्रकाश ढोरे, प्रविण शेंडे, चौधरी, राऊत, गुल्हाने, वासुदेव अवसरे यांनी नमूद केले आहे की; कधी काळी सूचना दिल्यानंतर, जीव जाण्यापुर्वी प्रशासन दखल घेत होते. आज अनेकदा जीव गेल्यानंतरही प्रशासन दखल घेत नसल्याने आज परत एकदा कडु व चव्हाण परिवारातील दोन शाळकरी विद्यार्थ्यांचे जीव गेलेत. ज्या उद्देशाने जंगलात तलाव निर्माण झाले आहेत. त्या उद्देशाची पुर्ती करतेवेळी सुरक्षितता जपणे प्रशासनाची जबाबदारी आहे. जीव गेल्यानंतर चार दिवस फुकटचा आव आणून वीसरभोळ्या प्रशासकीय प्रवृत्तीमुळे आता, पालकांनीही आपआपल्या मुलांच्या शाळा, ट्युशन, ईतर वेळी सतत संपर्कात राहणे आवश्यक असल्याचे प्रमोद पांडे यांनी नमूद केले आहे.

### सिनेट सदस्य डॉ.प्रशांत विघे

, आरटीईच्या अंमलबजावणीची आव्हाने, शिक्षकांवर वाढणारा अशैक्षणिक कामांचा बोजा, नोकरीतील सुरक्षितता आणि मराठी माध्यमाच्या शाळांमधील घटती विद्यार्थी संख्या हे अनेक प्रश्न शिक्षकांसमोर आहेत. या प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी सक्षम व अभ्यासू शिक्षक नेतृत्वाची आवश्यकता आहे. शिक्षकांना अध्यापनासाठी वेळ मिळावा, त्यांच्या सेवा सुरक्षतेची समस्या सोडवावी, पेन्शन संबंधी समस्यांवर ठोस भूमिका घ्यावी, टीईटी संबंधी समस्या दूर कराव्यात, सरकारी व मराठी माध्यमाच्या शाळांचे अस्तित्व अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. शिक्षकांचा प्रश्न, त्यांचे भविष्य आणि प्रभावी प्रतिनिधित्वासाठी साथ द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. शिक्षकांचा सन्मान ,सेवा सुरक्षितता, पेन्शन ,सरकारी शाळाचे संरक्षण आणि शिक्षणाची गुणवत्ता हे प्रश्न महत्त्वाचे राहणार आहे,असे ही ते म्हणाले. पत्रकार परिषदेमध्ये प्राचार्य डॉ.पृथ्वीसिंग राजपूत, डॉ.प्रकाश मानेकर, प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर यावले, अमर भुयार, डॉ. लाभ साबळे, मयूर देवहाते आदी उपस्थित होते.

# कुमकुम मोहोडचे दुहेरी सुवर्ण

## -नीरजला कांस्य - भारताची तिरंदाजी मोहीम ८ पदकांसह संपली

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावतीच्या १७ वर्षीय कुमकुम मोहोडने तिचा सर्वोत्तम खेळ सर्वात मोठ्या मंचासाठी राखून ठेवला होता. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला महिला रिकर्व्ह सांघिक प्रकारात पहिले-वहिले सुवर्ण मिळवून दिल्यानंतर दुसऱ्याच दिवशी, कुमकुमने २० व्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील आपले दुसरे सुवर्णपदक शनिवारी जिंकले. महिला रिकर्व्ह वैयक्तिक अंतिम फेरीत तिने एका नाट्यमय शूट-ऑफमध्ये दक्षिण कोरियाच्या ओह येजिनचा पराभव केला.



'मला पदकाच्या लढतीत बलाढ्य प्रतिस्पर्ध्यांचा सामना करायला आवडतो. त्यामुळे माझ्यातला सर्वोत्तम खेळ बाहेर येतो,' कुमकुम क्वार्टर फायनलमध्ये पोहोचल्यानंतर म्हणाली होती. तिने आपला प्रत्येक शब्द खरा करून दाखवला.अंतिम फेरीत कुमकुमची सुरुवात संथ झाली, पहिला सेट ती २७-२९ ने हरली. पण तिने जोरदार पुनरागमन करत दुसरा सेट २९-२९ ने बरोबरीत सोडवला आणि तिसरा सेट ३०-२९ ने जिंकून आघाडी घेतली. चौथा सेट २७-२८ ने गमावल्यानंतर तिने पाचवा सेट ३०-२८ ने जिंकला आणि स्कोअर ५-५ ने बरोबरीत आला, त्यामुळे सुवर्णपदकासाठी एका बाणाचा शूट-ऑफ झाला.या विजयासह कुमकुमने आपली पहिलीच आशियाई क्रीडा मोहीम दोन सुवर्णपदकांसह - महिला संघ आणि वैयक्तिक - आणि धीरज बोम्मदेवरासोबत मिश्र सांघिक प्रकारात एका रौप्यपदकासह संपवली. भारताने आपली तिरंदाजी मोहीम ५ सुवर्ण, १ रौप्य आणि २ कांस्य पदकांसह संपवली - एकूण ८ पदके, जी हांगझोऊच्या कामगिरीएवढीच आहे.आणि या सगळ्याच्या केंद्रस्थानी होती अमरावतीची एक १७ वर्षांची मुलगी, जिला सगळ्यात मोठ्या क्षणी सर्वोत्तम खेळाडूंना हरवायला आवडते.

### जन्मजात दुभंगलेले ओठ आणि

हॉस्पिटल मध्ये मोफत तीन दिवसीय शिबिराचे आयोजन सोमवार १२ ते बुधवार १४ ऑक्टोबर दरम्यान करण्यात आले असल्याची माहिती आज शनिवार ३ ऑक्टोंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत डॉ.नीरज मुरके यांनी दिली.डॉ.मुरके यांनी सांगितले की, गोडे कॉलेजमध्ये मिशन स्माईल संस्थेच्या वतीने ही वैद्यकीय मोहीम राबविली जात आहे. राज्यात आतापर्यंत मिशन स्माईलच्या माध्यमातून १२० पेक्षा अधिक रुग्णांवर मोफत उपचार करण्यात आले आहेत. या मोहिमेअंतर्गत १२ ऑक्टोबर रोजी रुग्णांची तपासणी केली जाणार आहे आणि त्यातील निवड झालेल्या रुग्णांवर १३ व १४ ऑक्टोबर रोजी ऑपरेशन केले जाणार आहे. ४० पेक्षा अधिक रुग्णांच्या शस्त्रक्रियेचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.देशभरातील प्लास्टिक सर्जरी, ओरल अँड मॅक्झिलो फेशियल सर्जरी, भूलशास्त्र, दंतचिकित्सा व नर्सिंग क्षेत्रातील तज्ञांचे पथक या मोहिमेत सहभागी झाले आहे. गरजू नागरिकांसाठी हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये लुधियानाचे डॉ. कुलजीत सिंह विके, हैदराबादचे डॉ. प्रभाकर मरगम, मुंबईचे डॉ. रंगनाथ जवाहर, डॉ. अभितोष देवता, पुण्याच्या डॉ. पूजा दांडेकर, मध्यप्रदेशच्या डॉ.सुजाता, चेन्नईचे डॉ.अन्नु थैंगराजन, कोचीचे डॉ.रोहित कमल सहभागी होऊन आपली सेवा देतील. रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.शिबिराच्या यशस्वीतेसाठी हॉस्पिटलचे सीईओ डॉ. योगेश गोडे, डॉ. सुनील हातकर, डॉ. सीमा सुने, डॉ. नीरज मुरके, डॉ. प्राजक्ता मोवले, डॉ. अश्विनी दंदे, डॉ. राधा सावदेकर, डॉ. नितीन अलसपुरकर, डॉ. शुभम राठी, डॉ. सौरभ लकडे, डॉ. शिवानी गंधे, डॉ. सचिन दामके, डॉ. विजयसिंग राजपूत आदी प्रयत्नशील आहेत.पत्रकार परिषदेला डॉ. नीरज मुरके यांच्यासोबत डॉ. राजेंद्र गनेडीवाल, डॉ. सचिन दामके, हर्षल गजभे, वैभव कोकाटे, रफिउर रहेमान आदी उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
paper www.janmadhyam.com

# २१ सुवर्णपदकांसह भारताची आशियाई क्रीडा स्पर्धेतील प्रवासाची सांगता

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : आयची नागोया येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारताच्या खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. काही खेळांमध्ये पदरी निराशा पडली असली तरी अखेरच्या दिवसांमध्ये भारताने सुवर्णपदकांची कसर ब-यापैकी भरून काढली. भारताने तिरंदाजी, हाकी, क्रिकेट, कबड्डी, नेमबाजी, गोल्फ या प्रकारांमध्ये पुरूष व महिला खेळाडूंनी सुवर्ण कामगिरी केली. १४ दिवसांच्या यशस्वी मोहिमेनंतर, भारतीय खेळाडूंनी आशियाई क्रीडा स्पर्धेत एकूण ८५ पदकं जिंकली; यामध्ये २१ सुवर्ण, २७ रौप्य आणि ३७ कांस्य पदकांचा समावेश आहे. या कामगिरीमुळे पदक तालिकेत भारत चौथ्या स्थानावर पोहोचला आहे.**

20th Asian Games
Aichi-Nagoya 2026

**२०२६: सुवर्णपदक पटकावणारे भारतीय खेळाडू**

महिला क्रिकेट -श्रीलंकेचा पराभव करून सुवर्णपदक
महिला हाकी - चीनचा १-० असा पराभव करून सुवर्णपदक
नेमबाजी -१० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक- सुरुची आणि कमलजीत
महिला ट्रॅप शूटिंग -नीरू ढांढा
मिश्र ट्रॅप शूटिंग -सुवर्णपदक
तिरंदाजी - महिला कंपाऊंड सांघिक - सुवर्णपदक
तिरंदाजी - मिश्र कंपाऊंड सांघिक - सुवर्णपदक
तिरंदाजी - पुरुष कंपाऊंड सांघिक - सुवर्णपदक
तिरंदाजी - महिला रिकर्व वैयक्तिक - कुमकुम मोहोद
कबड्डी -महिला - सुवर्णपदक
कबड्डी - पुरुष - सुवर्णपदक
ॲथलेटिक्स -महिला ४x४०० मीटर रिले - किरण पहल, एम.आर. पूवम्मा, प्राची चौधरी आणि विथ्या रामराज
बाक्सिंग - महिला ७५ किलो -लव्हलिना बोर्गोहेन
बाक्सिंग -महिला ६५ किलो - परवीन हुड्डा
बाक्सिंग - पुरुष ८० किलो - अंकुश पंघाल
कुस्ती - पुरुष फ्रीस्टाइल ६५ किलो -सुजीत कलकल
गोल्फ -महिला वैयक्तिक -प्रणवी युआरएस
क्रिकेट -पुरुष -पाकिस्तानचा पराभव करून सुवर्णपदक
हाकी -पुरुष -मलेशियाचा ५-१ असा पराभव करून सुवर्णपदक
कुस्ती -पुरुष फ्रीस्टाइल ५७ किलो -अमन सहरावत

**२०२६: रौप्य पदक जिंकणारे खेळाडू**

कुस्ती -महिला ५३ किलो -अंतिम पंघाल
गोल्फ- महिला सांघिक -प्रणवी उर्स, अदिती अशोक आणि दीक्षा डागर
तिरंदाजी - पुरुष रिकर्व सांघिक -भारत
तिरंदाजी - मिश्र रिकर्व सांघिक - भारत
भालाफेक - पुरुष -यश वीर सिंह
लांब उडी -पुरुष-मुरली श्रीशंकर
१५०० मीटर धावणे - पुरुष -गुलवीर सिंह
नेमबाजी -२५ मीटर एअर पिस्तूल महिला -ईशा सिंह
लांब उडी-महिला -अंसी सोजन
उंच उडी - पुरुष -सर्वेश कुशारे
स्क्वाश - महिला एकेरी - अनाहत सिंह
स्क्वाश । पुरुष एकेरी - अभय सिंह
वुशू ९महिला ६० किलो ९ रोशिबिना देवी
वेटलिफ्टिंग ९ महिला ४९ किलो९ मीराबाई चानू
नेमबाजी - महिला १० मीटर एअर रायफल सांघिक - इलावेनिल वलारिवन, सोनम मस्कर आणि विदर्शा विनोद
नेमबाजी -महिला १० मीटर एअर रायफल वैयक्तिक - इलावेनिल वलारिवन
नेमबाजी-पुरुष १० मीटर एअर रायफल सांघिक - रुद्रांक्ष पाटील, पार्थ माने आणि हिमांशु ढिल्लन
शूटिंग -पुरुष १० मीटर एअर रायफल वैयक्तिक - हिमांशु ढिल्लन
नेमबाजी -पुरुष ५० मीटर रायफल ३६ - भारत
नेमबाजी -महिला रायफल ३६ सांघिक-भारत
मॅरेथान -पुरुष-सावन बरवाल
शाटपुट -पुरुष - तजिंदरपाल सिंह तूर
कुस्ती -पुरुष GR ९७ किलो -नितेश सिवाच

**भारतासाठी कांस्य पदक जिंकणारे खेळाडू**

तिरंदाजी - पुरुष रिकर्व वैयक्तिक - नीरज चौहान
कुस्ती - पुरुष फ्रीस्टाइल ९७ किलो दीपक पुनिया-
सेलिंग - महिला डिंगी - नेत्रा कुमानन
सेलिंग - स्किफ सांघिक - भारत
ॲथलेटिक्स - महिला ५००० मीटर - पारुल चौधरी
भालाफेक - पुरुष -रोहित यादव
४०० मीटर हर्डल्स - महिला - हरिता भद्रा
कुराश - महिला ७८ किलो - पिंकी बलहारा
डिकॅथलान - पुरुष - तेजस्विन शंकर
ॲथलेटिक्स - महिला ३००० मीटर स्टीपलचेस - पारुल चौधरी
२०० मीटर -महिला -हरिता भद्रा
नेमबाजी - मिश्र स्कीट सांघिक -अनंतजीत सिंह नरुका आणि परिनाज धालीवाल
रोइंग - पुरुष डबल्स स्कल्स - सलमान खान आणि सतनाम सिंह
नेमबाजी - पुरुष स्कीट सांघिक - अनंतजीत सिंह नरुका, मैराज खान आणि भावतेग सिंह गिल
साफ्टबाल टेनिस - जय मीणा
शूटिंग- महिला स्कीट सांघिक -रायझा ढिल्लन, माहेश्वरी चौहान आणि परिनाज धालीवाल




**आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ पदकतालिका**

| रँकिंग | देश | सुवर्णपदक | रौप्यपदक | कांस्यपदक | एकूण पदकं |
|---|---|---|---|---|---|
| १ | चीन | १६९ | ८९ | ८३ | ३४१ |
| २ | जपान | ८३ | ९३ | ९१ | २६७ |
| ३ | दक्षिण कोरिया | ३८ | ४३ | ६८ | १४९ |
| ३ | भारत | २१ | २७ | ३७ | ८५ |
| ५ | ऊझ्बेकिस्तान | २१ | २५ | २४ | ७० |

शूटिंग - पुरुष १० मीटर एअर रायफल वैयक्तिक - रुद्रांक्ष पाटील
मिश्र मार्शल आर्ट्स - महिला ६० किलो - सुचिका तारियाल
बॅडमिंटन । पुरुष सांघिक ।भारत
शाटपुट - महिला -मनप्रीत कौर
पोल व्हाल्ट - महिला -बर्निका इलांगोवन
टेबल टेनिस - मिश्र दुहेरी - दिया आणि मानुष
४०० मीटर - महिला -प्राची चौधरी
स्क्वाश -मिश्र दुहेरी - जोशना चिनप्पा आणि सेंथिलकुमार
स्क्वाश -पुरुष सांघिक - भारत

## पंजाबमध्ये सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर 'मॅड संधू' याची हत्या; अमृतसर परिसरात खळबळ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**पंजाबमधील अमृतसर शहरातून एक अत्यंत धक्कादायक आणि गंभीर घटना समोर आली आहे. प्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर आणि



मेकअप आर्टिस्ट मॅड संधू (ग्ठुडु च्ठुदड्डुण्द्व) याची शनिवारी अज्ञातांनी गोळ्या झाडून हत्या केली. रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अवस्थेतील त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर संपूर्ण परिसरात आणि त्यांच्या चाहत्यांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मॅड संधू हे काही कामानिमित्त जात असताना अचानक अज्ञात हल्लेखोरांनी त्याच्यावर गोळीबार केला. गोळी लागताच ते गंभीर जखमी होउन रस्त्यावर कोसळले. तेथे उपस्थित असलेल्या स्थानिक नागरिकांनी त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न केला; मात्र रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच वाटेत त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच त्यांच्या फालोअर्सनी सोशल मीडियावरून तीव्र शोक व्यक्त केला आहे.

**पोलिसांकडून तपास सुरू**- घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेउन तपास चक्राला गती दिली आहे. गुन्ह्याच्या ठिकाणाहून महत्त्वाचे पुरावे गोळा करण्यात आले असून आजूबाजूच्या नागरिकांची चौकशी सुरू आहे. हत्येमागील नेमके कारण अद्याप अस्पष्ट असून, वैयक्तिक वैमनस्य, जुना वाद की इतर काही कारण आहे, याचा शोध पोलीस घेत आहेत. हल्लेखोरांची ओळख पटवण्यासाठी आणि त्यांचा माग काढण्यासाठी पोलीस परिसरातील सर्व सीसीटीव्ही कॅमे-यांचे फुटेज बारकाईने तपासत आहेत. तसेच घटनेपूर्वी मॅड संधू कोणाच्या संपर्कात होते, याविषयीही माहिती गोळा केली जात आहे. दिवसढवळ्या झालेल्या या हत्याकांडाने अमृतसर शहरात भीतीचे वातावरण पसरले असून पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## चिनी ध्वजाच्या रंगांनी उजळला बुर्ज खलिफा

**दुबई :** संयुक्त अरब अमिरातीमधील दुबई शहरात स्थित जगातील सर्वांत उंच इमारत असलेल्या बुर्ज खलिफावर चीनच्या राष्ट्रीय दिनानिमित्त एक अत्यंत



प्रेक्षणीय आणि ऐतिहासिक लाईट शो आयोजित करण्यात आला. चीनच्या पीपल्स रिपब्लिकच्या स्थापनेचा ७७ वा वर्धापनदिन साजरा करण्यासाठी ८२८ मीटर उंच असलेल्या या अथांग गगनचुंबी इमारतीला लाल दिव्यांच्या भव्य रोषणाईने सजवण्यात आले होते. या विशेष प्रसंगी बुर्ज खलिफाचे सौंदर्य पाहण्यासाठी हजारो स्थानिक रहिवासी आणि आंतरराष्ट्रीय पर्यटक एकत्र आले होते. चीनच्या राष्ट्रीय दिनाचे औचित्य साधून चायना मीडिया ग्रुपने या विशेष व्हीडीओ लाईट शोचे आयोजन केले होते. जागतिक माध्यमांच्या इतिहासात ही पहिलीच वेळ आहे, जेव्हा जगातील सर्वांत प्रतिष्ठित आणि उंच इमारतीवर चायना मीडिया ग्रुपचा अधिकृत व्हिज्युअल लाईट शो प्रदर्शित करण्यात आला. या प्रदर्शनाने दुबईच्या रात्रीच्या क्षितिजाला एका वेगळ्याच लाल तेजाने उजळवून टाकले. या तांत्रिक आणि सांस्कृतिक प्रयोगाने जगभरातील प्रसारमाध्यमांचे आणि पर्यटकांचे लक्ष वेधून घेतले.

## भरधाव पिकअपची स्कूल बसला धडक; चालकासह लहान मुले जखमी

**नांदेड / प्रतिनिधी-** भरधाव वेगाने जाणा-या बलेरो पिकअपने लहान मुलांना घेउन जाणा-या स्कूल बसला पाठीमागून जोरदार धडक दिल्याची घटना नांदेड-नागपूर महामार्गावर अर्धापूर तालुक्यातील सत्यगणपती देवस्थानाजवळ घडली. या अपघातात स्कूल बसचा चालक, एका महिलेसह काही लहान मुले जखमी झाल्याची माहिती आहे. दरम्यान, बसला धडक दिल्यानंतर बलेरो पिकअप रस्त्यालगतच्या खड्ड्यात जाउन उलटली.मिळालेल्या माहितीनुसार, स्कूल बसमधून लहान मुले प्रवास करीत होती. ही बस नांदेड-नागपूर महामार्गावरून जात असताना सत्य गणपती देवस्थानाजवळ मागून भरधाव वेगाने आलेल्या बलेरो पिकअपने बसला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडक एवढी जोरदार होती की बसमधील चालक, महिला आणि काही लहान मुले जखमी झाली. दरम्यान, स्कूल बसला धडक दिल्यानंतर पिकअप चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर पिकअप रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात जाउन उलटली. अपघाताची माहिती मिळताच रस्त्याने जाणा-या नागरिकांसह परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी बसमधील जखमींना बाहेर काढून मदत केली. जखमींना पुढील उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. या अपघातामुळे महामार्गावर काही काळ वाहतुकीची कोंडी झाली होती. नागरिकांनी तत्काळ मदतकार्य केल्याने जखमींना उपचारासाठी हलविण्यात आले.

## हुशारांना नापास करून मर्जीतल्यांची भरती!

**भंडारा /प्रतिनिधी-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगासारख्या घटनात्मक स्वायत्त संस्थेमध्ये सध्या मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरू असून पेपरफुटी आणि परीक्षा रद्द होण्याचे प्रकार सातत्याने घडत आहेत. भंडारा येथे माध्यमांशी संवाद साधताना काँग्रेसचे नेते नाना पेटोले यांनी एमपीएससीतील घोळावरून राज्य सरकारवर आणि मतदार यादीतील फेरफार प्रकरणावरून केंद्र सरकारसह मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर तीव्र शब्दांत हल्लाबोल केला.

एमपीएससीमधील अनागोंदीवर बोलताना नाना पटोले म्हणाले, एमपीएससी हा एक घटनात्मक बोर्ड आहे. मात्र, विद्यार्थ्यांचा प्रचंड दबाव वाढल्यानंतर केवळ सचिवांची बदली करण्यात आली. हा प्रकार म्हणजे दुधाची तहान ताकावर भागवण्यासारखा आहे. सचिवांना पदावरून हटवले याचा थेट अर्थ असा की एमपीएससीच्या संपूर्ण प्रक्रियेत मोठी गडबड झाली आहे, हे सरकारने स्वतःच मान्य केले आहे.



परीक्षेत गैरप्रकार करून सरकारने राज्यातील सुशिक्षित तरुणांचा विश्वासघात केला असून त्यांच्या भविष्याशी खेळ चालवला आहे. राज्य सरकारने या गोंधळाबद्दल जनतेची जाहीर माफी मागितली पाहिजे आणि भविष्यात असा घोळ होणार नाही याची लेखी हमी दिली पाहिजे.

विशिष्ट जाती-धर्माची नावे वगळली केंद्रीय निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कारभारावर तोफ डागताना त्यांनी गंभीर आरोप केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या इशा-यावर निवडणूक आयोग काम करत असून देशभरात एसआयआरच्या नावाखाली लाखो पात्र मतदारांची नावे यादीतून जाणीवपूर्वक वगळण्यात आली. यामध्ये विशिष्ट जाती आणि अल्पसंख्याक समाजातील मतदारांना लक्ष्य करण्यात आले आहे.

**फार्म ६ मधील नियमबा बदल**

नवीन मतदारांच्या नोंदणीसाठी वापरल्या जाणा-या फार्म ६ मध्ये ज्ञानेश कुमार यांनी नियमबा बदल केले. या मनमानी कारभारावर खुद्द ज्ञानेश कुमार यांचे सहकारी सिंधू आणि जोशी यांनीच तीव्र आक्षेप नोंदवले आहेत. इतकेच नव्हे, तर महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम यांनीही यावर हरकत घेतली होती. त्यामुळे निवडणूक आयोगाचे पितळ आता उघडे पडले आहे.

**लोकांची मते चोरून निवडणुका जिंकल्या**

निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता पूर्णपणे संपुष्टात आल्याचा दावा करत नाना पटोले पुढे म्हणाले, लोकांची मते चोरूनच या निवडणुका जिंकल्या जात असल्याचे आता सिद्ध झाले आहे. देशभरात १३ कोटी मतदारांची नावे संशयास्पदरीत्या वगळल्यानंतर आता पुन्हा सुधारणा करण्याचे नाटक केले जात आहे. यावरून स्पष्ट होते की मतदारांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवण्याचे काम पद्धतशीरपणे आखले गेले होते.

## पाकिस्तानला धुळ चारत भारताने जिंकले 19 वे सुवर्णपदक

**आयची-नागोया/ वृत्तसंस्था**

२०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत पुरुष क्रिकेटच्या अंतिम सामन्यात भारत आणि पाकिस्तान क्रिकेट संघ एकमेकांसमोर आले. या सामन्यात भारताने १९ धावांनी विजय मिळवत सलग दुस-यांदा गोल्ड मेडल जिंकलं आहे. यासह यंदाच्या स्पर्धेतील हे भारताचे १९ वे सुवर्णपदक ठरलं. सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारतानं सहा गडी गमावून २११ धावा केल्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानचा संघ धावांपर्यंत मर्यादित राहिला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारतानं प्रभावी खेळी केली. प्रथम अभिषेक शर्माकडून आणि नंतर तिलक वर्मानं आक्रमक खेळी केली. अभिषेकनं २८ चेंडूंमध्ये ६१धावा केल्या, तर तिलकनं २२ चेंडूंमध्ये नाबाद ५१धावा केल्या. वैभव सूर्यवंशी अवघ्या ९ चेंडूंमध्ये १५ धावांवर बाद झाला. संजू सॅमसनलाही केवळ दोन धावा करता आल्या. कर्णधार श्रेयसनं २४ चेंडूंमध्ये २१ धावा केल्या. इशान किशननं १८ चेंडूंमध्ये २० धावा केल्या. तर शिवम दुबेनं अवघ्या १५ चेंडूंमध्ये २७धावांची वेगवान खेळी केली.

**अय्यरनं केले नाही हस्तांदोलन-** सामना सुरु होण्यापूर्वी, नाणेफेकीच्या वेळी, एका दृश्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. नाणेफेकीनंतर भारतीय कर्णधार श्रेयस अय्यरने पाकिस्तानी कर्णधाराशी



हस्तांदोलन करण्यास नकार दिला. हे लक्षात घेण्यासारखं आहे की, आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होणारा भारतीय क्रिकेट संघ बीसीसीआयऐवजी भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अंतर्गत खेळतो. असे असूनही, दहशतवादाच्या निषेधार्थ विरोधी संघाशी हस्तांदोलन न करण्याच्या आपल्या निर्णयावर भारतीय संघ आणि कर्णधार ठाम राहिला.

## स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जयंतीनिमित्त विधान भवनात अभिवादन

**मुंबई, दि. ३ :** थोर स्वातंर्त्य सेनानी व मराठवाडा मुक्ती संग्रामाचे प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जयंतीनिमित्त शनिवार, दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२६ रोजी विधानभवन परिसरातील त्यांच्या पुतळ्यास महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव -१, श्री.जितेंद्र भोळे यांनी पुष्पहार व गुलाबपुष्प अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे, सचिव-३ डा.विलास आठवले, सचिव-४ श्री.शिवदर्शन साठ्ये, यांचेसह इतर अधिकारी व कर्मचा-यांनीही स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुतळ्यास गुलाबपुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

### मराठी ही केवळ संवाद आणि भाषा नव्हे, तर संस्कृती-इतिहासाची साक्षीदार

## डिजिटल युगात मराठीला ज्ञानभाषा करणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :**मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नाही, तर ती आपल्या समृद्ध संस्कृतीची वाहक आणि जाज्वल्य इतिहासाची साक्षीदार आहे. विपुल शब्दसंपदा, समृद्ध साहित्यपरंपरा आणि विविध बोलीभाषांचा वारसा लाभलेल्या मराठीला २१ व्या शतकात डिजिटल आणि ज्ञानभाषा म्हणून अधिक सक्षम करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मराठीचा दैनंदिन व्यवहारातील वापर वाढविण्यासोबतच कृत्रिम बुद्धिमत्ता डिजिटल तंत्रज्ञान, क्वांटम काम्प्युटिंग, स्पेस टेक्नालाजी आणि बायोटेक्नालाजीसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्येही मराठीचा वापर वाढविण्याचे आवाहन त्यांनी केले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित अभिजात मराठी भाषा सप्ताह आणि अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस कार्यक्रमाचा चर्चगेट येथील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकर्सी महिला विद्यापीठाच्या पाटकर सभागृहात उत्साहात शुभारंभ झाला. यावेळी आयोजित विशेष सोहळ्यात फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मराठी भाषा व उद्योगमंत्री डा. उदय सामंत, मुंबईच्या महापौर रितू तावडे, विद्यापीठाच्या कुलगुरू डा. हेमलता बागला, मराठी भाषा विभागाचे सचिव किरण कुलकर्णी यांच्यासह मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी आणि मराठीप्रेमी उपस्थित होते.

**मराठीला अभिजात भाषेचा दर्जा हा अभिमानाचा क्षण-** मराठी भाषा प्राचीन आणि अभिजात आहेच; मात्र तिला केंद्र सरकारकडून अभिजात भाषेची अधिकृत मान्यता मिळणे हा मराठी भाषकांसाठी अभिमानाचा क्षण असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या भाषिक आणि सांस्कृतिक वारशाला राष्ट्रीय पातळीवर विशेष अधोरेखित स्थान मिळाले असल्याचे त्यांनी नमूद केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या संकल्पनेसोबत स्वभाषेलाही महत्त्व दिले. राज्यकारभारात मराठीचा वापर वाढविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आणि त्यातून मराठीच्या प्रशासकीय वापराला नवी दिशा मिळाली, अशी आठवणही फडणवीस यांनी यावेळी करून दिली.जगात सर्वाधिक बोलल्या जाणा-या भाषांमध्ये मराठीचा १३वा क्रमांक असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मराठी ही जागतिक स्वरूपाची भाषा आहे. विसाव्या शतकात तयार झालेल्या मराठी ज्ञानकोश आणि शब्दरत्नाकरामध्ये ११ ते १३ लाख शब्द असल्याचा उल्लेख त्यांनी केला. तुलनेत ऑक्सफर्ड शब्दकोशात सुमारे सहा लाख शब्द, तर मँडरिन, स्पॅनिश आणि फ्रेंचसारख्या भाषांमध्ये साधारण तीन ते साडेतीन लाख शब्द असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य शासनाच्या प्रकाशित मराठी शब्दकोशात सध्या सुमारे तीन लाख शब्द आहेत. त्याच्या पुढील आवृत्त्या तयार करून शब्दसंपदा १३ लाख शब्दांपर्यंत नेण्याचे काम करण्याची गरज मुख्यमंत्र्यांनी यावेळी अधोरेखित केली.मराठीच्या समृद्ध शब्दसंपदेचा उल्लेख करताना फडणवीस यांनी मराठी ज्ञानकोश आणि शब्दकोशांच्या परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले. विविध कोशांमध्ये लाखो मराठी शब्द नोंदविले गेले असून, ही शब्दसंपदा मराठीच्या समृद्ध भाषिक परंपरेचे दर्शन घडवते, असे त्यांनी सांगितले. मराठीचा हा शब्दवैभव केवळ अभिमानाचा विषय न



राहता आधुनिक ज्ञाननिर्मितीमध्येही त्याचा प्रभावी वापर झाला पाहिजे. विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था, शिक्षण आणि संशोधनाच्या क्षेत्रातील संकल्पना मराठीत उपलब्ध झाल्यास मराठी ख-या अर्थाने ज्ञानभाषा बनेल, असे त्यांनी स्पष्ट केले. डिजिटल तंत्रज्ञानामुळे संवादाची माध्यमे वेगाने बदलत आहेत. अशा परिस्थितीत मराठीला केवळ पारंपरिक वापरापुरते मर्यादित न ठेवता नव्या तंत्रज्ञानाशी जोडणे आवश्यक आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. मराठी AIच्या माध्यमातून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात मराठीचा प्रभावी वापर वाढविणे, डिजिटल माध्यमांवर मराठीतील माहिती आणि ज्ञानसामग्री उपलब्ध करून देणे, तसेच ओटीटी प्लॅटफार्म आणि सोशल मीडियावर दर्जेदार मराठी कंटेंट मोठ्या प्रमाणात निर्माण करणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले. क्वांटम काम्प्युटिंग, स्पेस टेक्नालाजी, बायोटेक्नालाजी यांसारख्या अत्याधुनिक क्षेत्रांमध्ये मराठीतील ज्ञानसामग्री उपलब्ध झाल्यास नव्या पिढीला मातृभाषेतून आधुनिक ज्ञान आत्मसात करण्याची संधी मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**बोलीभाषांचा गोडवाही जपला पाहिजे**

प्रमाण मराठीसोबतच महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये बोलल्या जाणा-या बोलीभाषा हा मराठीचा अमूल्य ठेवा असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. कोकणी, व-हाडी, खानदेशी-अहिराणी, मालवणी, डांगी, झाडीबोली यांसारख्या बोलीभाषांमध्ये स्थानिक संस्कृती, लोकपरंपरा आणि जीवनानुभव सामावलेले आहेत. त्यामुळे या बोलींचे साहित्य, लोकपरंपरा आणि भाषिक वैशिष्ट्ये जतन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

मराठी नाट्यसंस्कृतीचाही त्यांनी विशेष उल्लेख केला. आधुनिक तंत्रज्ञानाची साधने मर्यादित असतानाही अनेक पिढ्यांनी मराठी रंगभूमीची समृद्ध परंपरा जिवंत ठेवली. कलावंतांनी आपल्या अभिनयातून, लेखनातून आणि प्रयोगशीलतेतून मराठी रंगभूमीला वेगळी ओळख मिळवून दिली. ही नाट्यपरंपरा मराठीच्या सांस्कृतिक सामर्थ्याचे वैशिष्ट्य असल्याचे फडणवीस यांनी नमूद केले.

**रोजच्या व्यवहारातून मराठीचे संवर्धन**

मराठीचे जतन आणि संवर्धन केवळ शासकीय उपक्रमांपुरते मर्यादित न ठेवता प्रत्येक मराठी भाषिकाने आपल्या दैनंदिन व्यवहारातून त्यासाठी योगदान देणे आवश्यक आहे. घर, शिक्षण, प्रशासन, व्यवसाय, तंत्रज्ञान आणि सामाजिक माध्यमे अशा सर्व क्षेत्रांमध्ये मराठीचा अधिकाधिक वापर वाढला पाहिजे. परंपरेचा अभिमान आणि आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालत मराठीला भविष्यातील सक्षम ज्ञानभाषा बनविणे ही सामूहिक जबाबदारी आहे, असे आवाहन फडणवीस यांनी केले.

**पुढील विश्व मराठी साहित्य संमेलनही लंडनमध्ये** - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

आपली माय मराठी ही केवळ महाराष्ट्राची ओळख नाही, तर आपला स्वाभिमान आहे. संत ज्ञानेश्वरांपासून छत्रपती शिवाजी महाराजांपर्यंतच्या समृद्ध परंपरेने नटलेली मराठी आता सातासमुद्रापार पोहोचली असून, जगभरात तिचा डंका वाजत आहे. भविष्यातही मराठीचा जागतिक विस्तार अधिक वेगाने व्हावा, यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. डिजिटल जगत, सोशल मीडिया, पाडकास्ट, गेमिंग आणि कोडिंगसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्येही मराठीचा वापर वाढवून नव्या पिढीला मराठीशी जोडले पाहिजे. जगातील ५० हून अधिक देशांमध्ये मराठीचा प्रचार आणि प्रसार वाढविण्याचा संकल्प असून, लंडनमध्ये छत्रपती शिवाजी महाराज वैश्विक मराठी केंद्र उभारण्याबरोबरच पुढील विश्व मराठी साहित्य संमेलनही लंडनमध्ये आयोजित केले जाणार आहे,

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# सरकारसमोरील आव्हाने

यंदा आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्याला पाऊस मिळाला नाही आणि जिथे मिळाला तिथे त्याचे वितरण इतके असमान राहिले, की एका बाजूला पिके तहानेने सुकली, तर दुसऱ्या बाजूला अल्पावधीत पडलेल्या पावसाने पिकांचे नुकसान केले. मॉन्सूनच्या लहरीपणाने पुन्हा एकदा भारतीय शेतीची पावसावर असलेली परावलंबित्वाची स्थिती उघड केली. त्यामुळे दुष्काळ जाहीर करण्याचा निर्णय ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नाही, ती शेतकऱ्यांच्या आयुष्यातील आर्थिक संकटाची अधिकृत कबुली आहे. राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित झाला आहे. पर्जन्यमानातील तूट आणि दीर्घकाळ पावसाचा खंड यामुळे ३२ हून अधिक जिल्ह्यांमध्ये परिस्थिती गंभीर बनली आहे. सोलापूर, अहिल्यानगर, नाशिक, लातूर, बीड, बुलडाणा, अमरावती, यवतमाळ, नागपूर आणि चंद्रपूरसह अनेक जिल्ह्यांना या संकटाचा मोठा फटका बसला आहे. दुष्काळाच्या घोषणेनंतर काही महत्त्वाच्या सवलती लागू होणार आहेत. जमीन महसूलात सवलत मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या पीक कर्जाचे पुनर्गठन केले जाणार आहे. कृषी कर्जाच्या वसुलीला स्थगिती दिली जाणार आहे. कृषी पंपांच्या वीजबिलात सवलत देण्याची तरतूद करण्यात आली आहे. दुष्काळ जाहीर झाल्याचा आदेश शेतकऱ्याच्या घरापर्यंत पोहोचला, तरी त्याच्या खात्यात मदत किती दिवसांमध्ये पोहोचणार, कर्जाची वसुली थांबली तरी पुढील हंगामासाठी भांडवल कुठून मिळणार, वीजबिलात सवलत मिळाली, तरी विहिरीत पाणी नसेल तर त्या विजेचा उपयोग काय, रोजगार हमीची कामे वाढवली, तरी गावातच पुरेसे काम उपलब्ध झाले नाही तर स्थलांतर कसे थांबणार या प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील. सर्वात्त आधी गरज आहे ती पीक नुकसानीच्या पंचनाम्यांची, दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्याला कागदपत्रांच्या चक्रात अडकवून ठेवले, तर शासनाच्या मदतीचा उद्देशच फोल ठरेल. शेतात उभे राहून सुकलेले सोयाबीन, मका, कापूस, ज्वारी, भात किंवा इतर पिके पाहण्याची वेळ अधिकाऱ्यांवर आली आहे. नुकसान प्रत्यक्ष किती आहे, हे कागदावर नव्हे तर बांधावर जाऊन ठरवावे लागेल. सरकारनेही पीक नुकसानीच्या आर्थिक मदतीसाठी पंचनाम्यांची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंत्तर स्वतंत्र निर्णय घेतला जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. शेतकऱ्यांसाठी वीजबिलातील सवलतही महत्त्वाची आहे; परंतु दुष्काळाच्या काळात कृषी पंपांना अखंडित वीज देणे त्याहून महत्त्वाचे आहे. विहिरी, बोअरवेल आणि उपलब्ध जलस्त्रोतांमधून शेतीला पाणी देण्यासाठी वीजपुरवठा खंडित झाला तर सवलतीचा अर्थ उरणार नाही. ज्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, तेथे टँकरची व्यवस्था कागदावर न राहता प्रत्यक्षात नियमित झाली पाहिजे. जनावरांसाठी चारा उपलब्ध करणे हीदेखील तातडीची गरज आहे. दुष्काळात माणसाच्या पाण्याबरोबरच पशुधनाच्या पाण्याचा आणि चाऱ्याचा प्रश्न उभा राहतो. तो दुर्लक्षित केला तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा आधारच कमकुवत होईल. रोजगार हमी योजनेच्या कामांना दुष्काळग्रस्त भागात अधिक व्यापक स्वरूप देणे गरजेचे आहे. शेतात उत्पन्न नाही, मजुरीची कामे कमी झाली आणि घरखर्चाचा भार वाढला, तर ग्रामीण कुटुंबांकडे शहरांकडे स्थलांतर करण्याशिवाय पर्याव उरणार नाही. येथे लक्षात घेणे गरजेचे आहे, की रोजगार हमी योजनेची कामे केवळ खड्डे खोदण्यापुरती मर्यादित न ठेवता जलसंधारण, नाला खोलीकरण, गाळ काढणे, बंधारे, शेततळी, पाणलोट विकास आणि भूजल पुनर्भरणाशी जोडली पाहिजेत. आजच्या रोजगारातून उद्याच्या पाण्याची निर्मिती झाली, तर दुष्काळ निवारणाला दीर्घकालीन अर्थ प्राप्त होईल. दुष्काळाचा सर्वाधिक गंभीर परिणाम खरीप संपल्यानंतर जाणवणार आहे. कारण शेतकऱ्याची खरी परीक्षा रब्बी हंगामात होणार आहे. जमिनीमध्ये पुरेसा ओलावा नसेल आणि धरणांमध्ये समाधानकारक पाणीसाठा नसेल, तर गहू, हरभरा, ज्वारी, करडई, मोहरी यांसारख्या पिकांची पेरणी धोक्यात येईल. विविध समस्यांमुळे ग्रामीण बाजारपेठेत पैसा फिरला नाही, तर ट्रॅक्टर, दुचाकी, शेतीची अवजारे, कपडे, बांधकाम साहित्य, ग्राहकोपयोगी वस्तू यांची मागणी कमी होईल. शेतीतील संकट हळूहळू ग्रामीण अर्थव्यवस्थेत आणि त्यानंतर राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत पोहोचते. अन्नधान्याचे उत्पादन घटले, तर महागाई वाढण्याचा धोका निर्माण होतो. अन्नधान्य महागले, तर सामान्य कुटुंबाच्या बजेटवर थेट परिणाम होतो. दुष्काळ हा केवळ शेती विभागाचा विषय नसून अर्थव्यवस्था, अन्नसुरक्षा आणि सामाजिक स्थैर्याशी जोडलेला प्रश्न आहे. हवामान बदलामुळे पावसाचे प्रमाणच नव्हे, तर त्याचे वितरणही अनिश्चित होत आहे. कधी प्रदीर्घ कोरडा काळ, तर कधी काही तासांमध्ये मुसळधार पाऊस. या बदलत्या हवामानाशी शेतीला जुळवून घ्यावे लागेल. यासाठी पीकपद्धतीत बदल आवश्यक आहे. पाण्याची उपलब्धता कमी असणाऱ्या भागामध्ये अतिपाणी लागणा-या पिकांना प्रोत्साहन देण्याऐवजी ज्वारी, बाजरी, नाचणी, कडधान्ये आणि तेलबियांसारख्या तुलनेने कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना बाजारपेठ, हमीभाव आणि प्रक्रिया उद्योगाची जोड द्यावी लागेल. ठिबक आणि तुषार सिंचनाचा विस्तार करावा लागेल. पाण्याचा प्रत्येक थेंब उत्पादनक्षम करण्याची वेळ आली आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही घोषणा महाराष्ट्राने अनेक वर्षे ऐकली आहे. आता या घोषणेचे मोजता येणारे परिणाम दाखवण्याची वेळ आली आहे. किती गावांमध्ये पाणलोट विकास झाला, किती पाणी साठवले गेले, भूजल पातळी किती वाढली, किती शेतकऱ्यांना त्याचा लाभ झाला, याचे सामाजिक आणि तांत्रिक ऑडिट झाले पाहिजे. आता दुष्काळ निवारणासंदर्भातील उपाययोजनांची आखणी आणि अंमलबजावणी बदलण्याची गरज आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर केवळ सरकारी कार्यालयातील आकडेवारीसाठी नव्हे, तर थेट शेतकऱ्याच्या निर्णयक्षमतेसाठी झाला पाहिजे. राज्य सरकारने २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून संकटाची तीव्रता मान्य केली आहे. आता या निर्णयाचे मोजमाप घोषणांच्या संख्येने नव्हे, तर मदत मिळालेल्या शेतकऱ्यांच्या संख्येने झाले पाहिजे. महसुलात सवलत मिळाली का, कर्जवसुली थांबली का, पीककर्जाचे पुनर्गठन झाले का, वीजसवलत प्रत्यक्ष बिलात उतरली का, रोजगार हमीची कामे सुरू झाली का, टँकर वेळेवर पोहोचतात का, चारा उपलब्ध आहे का या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर प्रशासनाने द्यावे.

**दोन 'डी-कपल' झालेल्या बातम्या!**

# शेतीक्षेत्रात अरिष्ट तरी देखील जीडीपी वेगवान!

१. **बा**तमी एक: जून-सप्टेंबर मॉन्सून सिझन संपला. पाऊस १२ टक्के कमी पडला आहे. २०१५ नंतर सर्वात कमी. ऑक्टोबर-डिसेंबर, मोन्सूनोत्तर पावसाचे अंदाज, जो मुख्यत्वे दक्षिणेतील राज्यात पडतो, देखील फारसे उत्साहवर्धक नाहीत.

२. बातमी दोन: भारताची जीडीपी चालू वित्तवर्षात २०२६-२७ मध्ये किमान ७ टक्क्यांनी वाढेल असे अंदाज, फक्त केंद्र सरकारने नाही तर ओईसीडी, आंतरराष्ट्रीय पतमानांकन संस्था मूडीज, एस अँड पी यांनी व्यक्त केले आहेत. आजच्या जागतिक वातावरणात हा चांगला जीडीपी वाढदर मानला जात आहे.

भारताचे परराष्ट्र मंत्री जयशंकर अमेरिकेतून साऱ्या जगाला (ज्यात भारत देखील आला असे समजूया) इशारा देते झाले आहेत की येणाऱ्या काळात ४-इ-फूड, फर्टिलायझर, फ्युएल आणि फायनान्स, या आघाड्यांवर अरिष्ट सदृश्य परिस्थिती तयार होऊ शकते.

केंद्र सरकारने महाराष्ट्र, कर्नाटक, राजस्थान, आंध्र प्रदेश, तेलंगण, या पाच राज्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर केली आहे.यात देखील सर्वात गंभीर दुष्काळ महाराष्ट्रात आहे. महाराष्ट्र सरकारने राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी २६५ तालुक्यात (म्हणजे राज्याच्या तीन चतुर्थांश भूभागात) दुष्काळ जाहीर केला आहे. राज्य सरकारने काही पावले उचलली आहेत. ती पुरेशी नाहीत. आशा करूया की राज्य सरकार विधायक प्रतिसाद देईल.

अपेक्षेप्रमाणे सर्वात गंभीर प्रश्न पिण्याच्या पाण्याचा असेल. आणि जनावरांच्या चाऱ्याचा. तो भविष्यात अजून गंभीर बनेल कारण भूगर्भातील पाण्याची पातळी दरवर्षी अधिकाधिक खाली जात आहे. अजून खोल जाऊन पाणी काढले तर ते मानवी शरीराला अपायकारक ठरू शकते.

केंद्र सरकरने देखील परिस्थितीला तोंड देण्यासाठी काही मदत योजना जाहीर केल्या आहेत. उदा रबी हंगामातील पिकांना वाढीव हमीभाव देण्यात येतील इत्यादी.

दुसरा तेवढाच गंभीर प्रश्न तयार होऊ शकतो, ग्रामीण भागात शेतकरी आणि बिगर शेतकऱ्यांचा कुवतीबाहेर जाणाऱ्या कर्जबाजारीपणाचा. मायक्रो फायनान्स कंपन्या असूदेत नाहीतर खाजगी सावकार, शुष्क हृदयी आहेत.तिसरा किंवा (खरेतर पहिला) गंभीर प्रश्न असेल, कधीच कमी न झालेल्या शेतकऱ्यांच्या, वाढू शकणाऱ्या आत्महत्यांचा. अख्खे कुटुंब, त्यातील लहान / तरुण मुले मुली यांची आयुष्ये उध्वस्त होणे. या मानवी शोकांतिकेचे रुपयातील मूल्य कधीच काढता येणारे नसते

प्रश्न असा पडतो, देशाच्या लोकसंख्येपैकी ४५ टक्के लोकसंख्या शेतीशी निगडित असणाऱ्या उपजीविकेच्या साधनांवर अवलंबून असताना देशाच्या जीडीपीला फारसा ओरखडा देखील कसा पडत नाही?

एका वाक्यात किंवा आकड्यात उत्तर द्यायचे झाले तर ते हेच असेल की देशाच्या लोकसंख्येच्या ४५ टक्के नागरिक अवलंबून असणाऱ्या शेतीक्षेत्राचा जीडीपी मध्ये वाटा फक्त १५ टक्के आहे!

ट्रॅक्टर आणि ट्रेलर आपण सर्वांनी बघितला आहेच; ट्रेलर ट्रॅक्टरशी जोडावा लागतोय. ट्रेलरमध्ये भरपूर जड वस्तुमाल असेल तर इंजिन वेगाने जाऊ शकत नाही. उद्या इंजिन चालवणाऱ्याला अशी भावना झाली कि या जड ट्रेलरमुळे आपल्याला वेगाने जाता येत नाहीये तर तो ट्रेलरला जोडलेला सांधा सोडवून घेतो, त्याला 'डी-कपल' करणे म्हणतात.आपल्या देशातील लोकसंख्येत फारतर २५ टक्के असणाऱ्या श्रीमंत / उच्च / मध्यम वर्गाने स्वतःला उरलेल्या ७५ टक्के लोकसंख्येपासून 'डी-कपल' केले आहे, आणि ते स्वतःपुरती देशाची अर्थव्यवस्था वेगाने पुढे नेऊ पाहत आहेत.

सर्व प्रकारची महागाई / वाढते व्याजदर / महाग डॉलर्स / वाढते इंधन दर / कोरोना काळातून कंबरडे मोडलेले अनौपचारिक क्षेत्र / महापूर, दुष्काळ, पर्यावरण बदलामुळे हातातोंडाशी आलेली पिके एका रात्रीत, दिवसात गमावून बसणारा शेतकरी / न फेडता येणारी कर्जे डोक्यावर घेऊन फिरणारी लाखो कुटुंबे / शैक्षणिक कर्जे काढून, जमिनीचे तुकडे विकून उच्च शिक्षण घेतलेली चांगल्या नोकऱ्या शोधत फिरणारे तरुण हा तो जड ट्रेलर आहे. या जड ट्रेलर ला डी-कपल करत, देशातील श्रीमंत / उच्च / मध्यम वर्गाने अर्थव्यवस्थेचे premiumization केले आहे. म्हणजे 'प्रीमियम' प्रॉडक्ट उत्पादन करण्यावर भर! मास साठी नव्हे क्लास साठी उत्पादन!

उदा. हाय एंड रियल इस्टेट / वाहने / दागिने / अनेक ग्राहकपयोगी वस्तू / नवीन इलेक्ट्रॉनिक्स गॅजेट्स / परदेशी, देशांतर्गत पर्यटन, विमान वाहतूक यांच्या मागणीला उधाण आणले आहे.

१४० कोटी लोकसंख्येचे २५ टक्के म्हणजे पूर्ण अमेरिकेची किंवा पूर्ण युरोपची लोकसंख्या होऊ शकेल. यावरून भारतातील या वर्गाचे वजन लक्षात यावे.मायक्रो फायनास / स्मॉल फायनान्स / डिजिटल लोन्स, गोल्ड लॉन्स / क्रेडिट कार्ड / बाय नौ पे लेटरष्ठखाजगी सावकरांकडून मुबलक कर्ज उपलब्ध करून देऊन, स्वतःची पुरेशी क्रयशक्ती नसणाऱ्या बॉटम ऑफ पिरॅमिड मधील लोकांना खरेदीच्या खेळात परिघावर का होईना सामील करून घेत आहेत.देश म्हणजे काय ? देशाची आर्थिक प्रगती म्हणजे काय ? शासनाचे आर्थिक प्राधान्यक्रम कोणत्या निकषावर ठरतात? अर्थशास्त्रातील हे मूलभूत प्रश्न ते लोक कधीही सार्वजनिक चर्चाविश्वाचा भाग करणार नाहीत. पण आपल्याला कोणी अडवलय? गावातील पार, देवळे, तरुणांचे अड्डे, ट्रेन्स / बसेस मधील गप्पा यावर हे विषय चर्चिले गेले पाहिजेत. तरच आजचा ट्रेलर त्यांच्यापेक्षा जास्त अश्वशक्तीचे पण स्वतःचे इंजिन स्वतःमध्ये बसवून सुटा धावू शकेल. तसे झाले तर त्यांचे इंजिन या मोठ्या इंजिनामागे धावत येऊ लागेल हे नक्की.

**संजीव चांदोरकर**

## दीपकेचा मुखजोरपणा

अभिजीत दीपके हे स्वतःच्या योग्यतेपेक्षा मोठी वक्तव्ये करत आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी निरर्थक जनहित याचिकांवर 'झुरळांचा सुळसुळाट' अशी टीका केली होती. त्याच शब्दावरून दीपके यांनी सोशल मीडियावर 'कॉकरोच जनता पार्टी' ही आभासी पार्टी सुरू केली. नीट पेपरफुटीच्या मुद्द्यावर जंतरमंतर येथे त्यांनी आंदोलन केले. पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री शाह यांच्यावर ते मर्यादा सोडून टीका करतात. दीपके यांचे स्वतःचे शैक्षणिक पात्रता, सामाजिक किंवा राजकीय कर्तृत्व काय? असा लेखकाचा सवाल आहे. लोकशाहीत विरोधाला अधिकार आहे, पण त्याला संयम, विवेक आणि भाषेची मर्यादा असायला हवी.

याला 'अरविंद केजरीवाल पॅटर्न' म्हटले आहे - केवळ स्टंटबाजी, सोशल मीडिया सनसनाटी आणि प्रसिद्धीच्या जोरावर राजकारण.शेवटी लेखकाचा इशारा - अशा बेजबाबदार वक्तव्यांना वेळीच आवरले नाही तर सामाजिक शांतता आणि अराजकता निर्माण होऊ शकते.थोडक्यात: दीपके हे प्रसिद्धीसाठी घटनात्मक पदांवर बेछूट टीका करतात, त्यांच्या पाठीशी ठोस कार्य नाही.

**अविनाश देशपांडे**

## पितृपक्षात दत्तगुरूंच्या नामजपाचे महत्त्व

*'दत्ताचिया भक्ता नाही भय चिंता ।*
*दैवे कष्ट येता वारी दत्त ।।'*

हा दत्तमहाराजांच्या भक्तांमधील अत्यंत प्रसिद्ध आणि आश्वस्त करणारा श्लोक आहे. सध्या पितृपक्ष सुरू असून या कालावधीत दत्तगुरूंच्या नामजपाने आपल्याला पुष्कळ लाभ होतात. 'श्री गुरुदेव दत्त ।' हा नामजप अगदी सहज सोपा आणि कुठेही, कधीही करता येण्यासारखा आहे. कोणत्याही प्रकारे मानसिक त्रास होत असताना किंवा काहीच सुचत नसताना दत्तमहाराजांचा हा नामजप लगेचच मन शांत करतो. पितृपक्षात मनोभावे मृत पूर्वजांचे श्राद्ध करण्यासोबतच दत्तगुरूंचा नामजप दरदिवशी किमान दोन तास केल्यास आपल्याला आनंद मिळतो आणि पूर्वजांना सद्गती मिळते.दत्त नामजप आपल्या सभोवती संरक्षक कवचही निर्माण करतो.

**आदिती देखणे**

# महासत्तेचा दुपट्टीपणा

**अमेरिकेत संमत झालेल्या नव्या विधेयकामुळे रशियन तेल खरेदी केल्यास भारतावर १०० टक्के टॅरिफ आकारण्याचा अधिकार डोनाल्ड ट्रम्प यांना मिळाला आहे. विशेष म्हणजे, अब्जावधी डॉलर्सचा रशियन एलएनजी खरेदी करणाऱ्या युरोपियन राष्ट्रांवर एकही निर्बंध अमेरिकेने लादलेला नाही. खुद्द अमेरिकेच्या अणुभट्ट्यांना सर्वाधिक युरेनियम रशियाच पुरवतो. हा पुरवठा चालू राहावा म्हणून अलीकडेच मंजूर झालेल्या कायद्यात पळवाट ठेवली आहे.**




**अ**मेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्वाक्षरी केलेल्या नव्या कायद्यामुळे जागतिक ऊर्जा बाजारात आणि भारताच्या अर्थकारणात खळबळ उडाली आहे. रशिया आणि इराणकडून खनिज तेल खरेदी करणाऱ्या देशांवर १०० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क (टॅरिफ) लादण्याचे अमर्याद अधिकार या कायद्याने ट्रम्प प्रशासनाला दिले आहेत. भारताचा विचार करता हा निर्णय अत्यंत गंभीर मानला जात आहे. भारत आपल्या एकूण गरजेच्या तब्बल ८८ टक्क्यांहून अधिक कच्च्या तेलाची आयात करतो आणि या आयातीत रशियाचा वाटा जवळपास निम्म्यावर पोहोचला आहे. अशावेळी अमेरिकेच्या या संभाव्य टॅरिफमुळे भारताला रशियन तेलाची आयात कमी करावी लागणार का, ते शक्य आहे का, या तेलामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला मिळणाऱ्या लाभावर अमेरिकेमुळे पाणी सोडावे लागणार का, असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. पश्चिम आशियातील वाढता तणाव, होर्मुझ आणि बाब-अल-मंदेबच्या सामुद्रधुनीत निर्माण झालेली कोंडी आणि जागतिक बाजारातील तेलाचा तुटवडा पाहता रशियन तेलाचा पुरवठा रोखणे भारतासाठी तर अशक्य आहेच, शिवाय खुद्द अमेरिकेसाठीही ते आर्थिक दृष्ट्या धोक्याचे ठरू शकते.

'लिंडसे ओ. ग्रॅहॅम सँक्शनिंग रशिया अँड इराण ॲक्ट २०२६' या नावाने संमत झालेल्या या कायद्यानुसार रशियन ऊर्जा क्षेत्राचे प्रमुख खरेदीदार असणाऱ्या जगातील पहिल्या पाच देशांवर अमेरिका अतिरिक्त १०० टक्के टॅरिफ लादू शकते. गेल्या वर्षी या विधेयकाच्या मूळ मसुद्यात ५०० टक्के इतक्या अवाढव्य आयात शुल्काची तरतूद करण्यात आली होती. त्या तुलनेत १०० टक्के ही मर्यादा कमी वाटत असली, तरी ती भारतासारख्या विकसनशील आणि अमेरिकेशी व्यापारी करार करू इच्छिणाऱ्या देशासाठी अत्यंत घातक आहे. या कायद्याच्या कक्षेत भारतासह चीनसारखे मोठे आयातदार देश थेट येतात. दर १८० दिवसांनी अमेरिका अशा देशांच्या व्यापाराचा आढावा घेणार असून, गरज पडल्यास अतिरिक्त शुल्क लागू केले जाईल. त्यामुळे भारतीय वस्तूंच्या अमेरिकेतील निर्यातीवर मोठा परिणाम होण्याची भीती आहे.

जागतिक स्तरावर खनिज तेलाची सध्याची स्थिती अत्यंत बिकट आहे. पश्चिम आशियातील युद्धाची झळ आता होर्मुझच्या सामुद्रधुनीतून पुढे सरकत बाब-अल-मंदेबपर्यंत पोहोचली आहे. या आंतरराष्ट्रीय जलमार्गांवरील वाहतूक ठप्प झाल्यामुळे आखाती देशांतून होणारा तेलाचा पुरवठा प्रचंड घटला आहे. पूर्वी भारताच्या एकूण तेल आयातीपैकी तब्बल ४० टक्के तेल होर्मुझच्या सामुद्रधुनीतून येत असे. हा मार्ग धोक्यात आल्यामुळे रशियन तेल भारतासाठी एक भक्कम सुरक्षा कवच ठरले आहे. ऑगस्ट महिन्यात भारताने रशियाकडून दररोज २०.८ लाख बॅरेल तेलाची आयात केली, जे भारताच्या एकूण आयातीच्या ४५ टक्के होते. तत्पूर्वीच्या काही महिन्यांत हा वाटा ५० टक्क्यांहून अधिक होता. त्यामुळे आखाती देशांतून तेलाची आवक घटलेली असताना रशिया हा भारताचा तुटवडा भरून काढणारा एकमेव पर्याय उरतो.

रशियन तेलातून मिळणारा लाभ

रशिया आणि युक्रेन संघर्ष सुरू झाल्यानंतर पाश्चात्त्य देशांनी रशियन तेलावर निर्बंध लादले; मात्र भारताने स्वतःचे ऊर्जा हित जपत रशियाकडून सवलतीच्या दरात मोठ्या प्रमाणावर कच्च्या तेलाची आयात सुरू केली. विविध आकडेवारीनुसार, गेल्या तीन ते साडेतीन वर्षांत सवलतीमधील रशियन तेल खरेदी केल्यामुळे भारताने थेट १३ ते १७ अब्ज डॉलर म्हणजेच सुमारे १.०८ लाख कोटी ते १.४१ लाख कोटी रुपये इतक्या परकीय चलनाची थेट बचत केली आहे. या सवलतीच्या तेलामुळे देशांतर्गत बाजारात इंधनाचे दर नियंत्रणात ठेवणे आणि महागाई रोखणे भारताला शक्य झाले. २०२२ मधील सुरुवातीच्या काळात रशियाकडून प्रतिबॅरेल तब्बल २५ ते ३० डॉलरपर्यंत घसघशीत सवलत मिळत होती. नंतरच्या काळात ही सवलत प्रतिबॅरेल ४ ते ८ डॉलरपर्यंत खाली आली असली, तरी जागतिक बाजारातील चढ-उतारांच्या काळात या आयातीने भारताला एक मजबूत आर्थिक आणि ऊर्जा सुरक्षा कवच प्रदान केले; पण आता तेच काढून घेण्याचा डाव अमेरिकेने टाकला आहे.

युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर युरोपियन देशांनी रशियन पाईपलाईन गॅसवर बहिष्कार टाकण्याच्या मोठ्या घोषणा केल्या; परंतु वास्तवात युरोप अजूनही रशियन द्रव स्वरूपातील नैसर्गिक वायूवर (एलएनजी) प्रचंड प्रमाणावर अवलंबून आहे. आजही रशियाकडून अब्जावधी डॉलर्सचा एलएनजी हे देश खरेदी करत आहेत. या खरेदीवर अमेरिकेने कोणताही कठोर निर्बंध लादलेला नाही. सर्वात मोठा विरोधाभास खुद्द अमेरिकेच्या धोरणात दिसून येतो. अमेरिकेतील अणुऊर्जा क्षेत्राला आणि अणुभट्ट्यांना लागणाऱ्या समृद्ध युरेनियमचा सर्वात मोठा पुरवठादार रशियाच आहे. २०२५ मधील आकडेवारीनुसार, अमेरिकेच्या एकूण युरेनियम गरजेपैकी तब्बल २६ टक्के वाटा एकट्या रशियाकडून पूर्ण झाला आहे. अमेरिका दरवर्षी अंदाजे १ अब्ज डॉलर्स खर्चून तब्बल ४०० टन रशियन युरेनियम आयात करतो. हा पुरवठा थांबला, तर अमेरिकेतील अनेक अणुभट्ट्या बंद पडून तिथे विजेचे मोठे संकट निर्माण होऊ शकते. धक्कादायक बाब म्हणजे, हा ऊर्जा पुरवठा धोक्यात येऊ नये म्हणून नव्या कायद्यांमध्ये अत्यंत चतुराईने पळवाटा ठेवल्या आहेत. रशियन युरेनियमवरील बंदीच्या कायद्यातही अशीच सोय करण्यात आली आहे, जेणेकरून अमेरिकन सरकार आपल्या गरजेनुसार रशियाकडून युरेनियमची खरेदी चालू ठेवू शकेल. अमेरिका-इस्त्रायलने इराणविरुद्ध युद्ध छेडले तेव्हा मार्च महिन्यात जगभरात कच्च्या तेलाच्या किमती वाढून १०० डॉलरच्या पुढे गेल्या होत्या. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी ट्रम्प प्रशासनाने इतर देशांनाही समुद्रात अडकलेले रशियन तेल खरेदी करण्याची तात्पुरती परवानगी दिली होती. ट्रम्प यांचा हा मनमानीपणा, दुटप्पीपणा भारतासारख्या विकसनशील देशांसाठी मारक ठरणारा आहे.

अमेरिकेलाही झळ बसणार?

रशियन तेल जागतिक बाजारातून पूर्णपणे बाहेर काढले, तर आंतरराष्ट्रीय बाजारात इंधनाचे दर प्रचंड भडकतील. अमेरिकेत आगामी काळात मध्यावधी निवडणुका पार पडणार आहेत. अशा वेळी देशांतर्गत बाजारात पेट्रोल आणि इंधनाचे दर वाढणे ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला राजकीय दृष्ट्या परवडणारे नाही. अलीकडेच ट्रम्प यांनी युक्रेनला रशियन तेल शुद्धीकरण कारखान्यांवर (रिफायनरी) होणारे हल्ले थांबवण्याचे आवाहन केले होते. यावरूनच अमेरिकेलाही जागतिक बाजारात इंधनाचा पुरवठा सुरळीत ठेवणे गरजेचे आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे भारतावर कठोर कारवाई करून स्वतःच्याच अडचणी वाढवणे ट्रम्प प्रशासनासाठी शहाणपणाचे ठरणार नाही.रशियाने सवलतीच्या दरात तेल देण्याची तयारी दर्शवताच भारतीय रिफायनरीजनी या संधीचा पूर्ण फायदा घेतला. रशिया पूर्वी भारताचा दुय्यम पुरवठादार होता, तो थेट अव्वल स्थानावर पोहोचला. चालू वर्षाच्या सुरुवातीला अमेरिकेने रोसनेफ्त आणि लुकोईलसारख्या रशियन कंपन्यांवर कडक निर्बंध लादल्यानंतर भारताने रशियन तेलाची आयात निम्म्यावर आणली होती. फेब्रुवारी महिन्यात रशियन तेलाची आयात दिवसाला १० लाख बॅरेलपर्यंत खाली आली होती; मात्र पश्चिम आशियातील संघर्ष तीव्र होताच भारताला पुन्हा एकदा रशियाकडे वळावे लागले. त्याच वेळी भारताने व्हेनेझुएला, आफ्रिका, उत्तर आणि दक्षिण अमेरिकेतून तेल आयात वाढवून आपल्या पुरवठ्याचे वैविध्यही जपले आहे; पण रशियन तेलापासून पूर्ण फारकत घेणे भारताला ऊर्जासुरक्षेच्या दृष्टीनेही परवडणारे नाही आणि रशियाशी असणाऱ्या पारंपरिक मैत्रीसंबंधांचा विचार करता ते उचितही ठरणारे नाही. भारताच्या अडचणीच्या काळात अनेकदा रशियाने धैर्याने आधार दिला आहे.

सुरक्षा परिषदेत जेव्हा जेव्हा अमेरिका किंवा इतर पाश्चात्त्य देशांनी भारताच्या विरोधात किंवा भारत-पाक युद्धात युद्धबंदीचे ठराव आणले, तेव्हा रशियाने आपल्या विशेषाधिकाराचा वापर करून ते सर्व ठराव उधळून लावले. यामुळे भारताला युद्ध पूर्ण करून विजय मिळवण्यासाठी आवश्यक वेळ मिळाला. हा इतिहास भारत कदापि विसरू शकणार नाही. वर्तमानकाळातही पंतप्रधान मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांचे घनिष्ठ संबंध आहेत. पंतप्रधान मोदींनी तिसऱ्यांदा सत्तासूत्रे स्वीकारल्यानंतर पहिल्यांदा रशियाचा दौरा करून आपली भूमिका स्पष्ट केली होती. ब्रिक्स, एससीओ अशा विविध संघटनांच्या व्यासपीठावर या दोघांनी मिळून अमेरिकाकेंद्री विश्वरचनेला विरोध दर्शवत बहुध्रुवीय विश्वरचनेचा नारा दिला आहे.

भारताची कणखर भूमिका

अमेरिकेच्या नव्या कायद्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने अत्यंत स्पष्ट आणि कणखर भूमिका घेतली आहे. भारताच्या १४० कोटी जनतेची ऊर्जा सुरक्षा हीच सर्वोच्च प्राधान्याची बाब असल्याचे भारताने स्पष्ट केले आहे. उच्चस्तरीय राजनैतिक चर्चेत भारताने अमेरिकेला या निर्णयाचे दोन्ही देशांतील संबंधांवर आणि जागतिक ऊर्जा बाजारावर होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव करून दिली आहे. देशाचे आर्थिक आणि व्यापारी हितसंबंध जपण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलली जातील, असे परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले असून भारतीय उद्योग क्षेत्राशी यासंदर्भात सतत संवाद साधला जात आहे. अमेरिकेच्या संसदेने संमत केलेला हा कायदा कागदावर अत्यंत कठोर आणि भारताच्या चिंतेत भर घालणारा दिसत असला, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या पातळीवर वास्तवाचे भान अमेरिकेलाही ठेवावेच लागेल. जागतिक बाजारात तेलाचा तुटवडा असताना भारतासारख्या मोठ्या अर्थव्यवस्थेला रशियन तेलापासून पूर्णपणे तोडणे म्हणजे स्वतःच्या पायावर दगड मारून घेण्यासारखे आहे.

**डॉ. विजय कुमार**

रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# पुसद येथील राज्य उत्पादन शुल्क कर्मचाऱ्यावर धारधार शस्त्राने हल्ला..!

## कार्यालय समोरच घडली घटना.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. ३ :** शहरात आज सकाळच्या सुमारास खळबळजनक घटना घडली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयासमोरच विभागातील एका कर्मचाऱ्यावर चाकूहल्ला झाल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आज ३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ ते १२ वाजताच्या सुमारास राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कर्मचारी वाघजी सुखदेव बोंबले यांच्यावर एका व्यक्तीने चाकूने हल्ला केल्याचे सांगण्यात येत आहे.

या हल्ल्यात वाघजी बोंबले हे गंभीर जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, ही घटना पुसद शहरातील गुणवंतराव शाळेच्या हाकेच्या अंतरावर आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयासमोरच घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच वसंतनगर पोलीस ठाण्याच्या परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक पूजा राठोड, पोलीस कर्मचारी तसेच आरसीपी पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांकडून घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला असून, हल्लेखोराचा शोध घेण्यासाठी पोलीस पथक रवाना करण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान, या हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. तसेच संशयित व्यक्तीची ओळख आणि नावाबाबत अधिकृत पुष्टी झालेली नसल्याने सध्या कोणाचेही नाव घेणे टाळण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास वसंतनगर पोलीस करीत असून, तपासानंतरच हल्ल्याचे नेमके कारण आणि घटनेमागील संपूर्ण पार्श्वभूमी स्पष्ट होणार आहे. पुसद शहरात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कर्मचाऱ्यावर कार्यालयासमोरच झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात चर्चेला उधाण आले असून, पोलिसांकडून हल्लेखोराचा शोध सुरू आहे.

# ७२ तासांचा थरार, डिजिटल अरेस्ट टोळीचे सहा जण जेरबंद!

## हुलकावणी देणारा आरोपीही पुन्हा जाळ्यात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ३ :** ज्येष्ठ नागरिकाला डिजिटल अरेस्टच्या नावाखाली तब्बल ३२ लाख ८० हजार २०० रुपयांना गंडा घालणाऱ्या टोळीविरुद्ध यवतमाळ शहर पोलिसांनी सलग ७२ तास धडक मोहीम राबवत एकूण सहा आरोपींना जेरबंद केले. आरोपी सतत लोकेशन बदलत असल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान होते.

मात्र शहर, अवधूतवाडी व एलसीबीच्या पथकांनी नागपूर, हैदराबाद आणि तेलंगणापर्यंत पाठलाग करीत टोळीचा पर्दाफाश केला. प्रकरणातील सुरुवातीचे तीन आरोपी थौनाओजम सुरज मेइतेई, रोसन खुमुकचम सिंग आणि इलांगबम बोरिश मेइतेई यांना २४ सप्टेंबरच्या रात्री धावत्या गुवाहाटी एक्स्प्रेस मधून अटक करण्यात आली. पोलिसांनी टीसीच्या वेशात रेल्वेच्या बोग्यांची तपासणी करीत संशयितांना शोधून काढल्याची माहिती आहे. चौकशीत मिळालेल्या माहितीच्या आधारे विनय हरीदास नारदेलवार, श्रीनिवास रेड्डी आणि मनोजकुमार राजवीरसिंग गहलोत यांना ताब्यात घेण्यात आले. दरम्यान, गहलोतने यवतमाळ शासकीय रुग्णालयातून पोलिसांना हुलकावणी देत पलायन केले. मात्र एपीआय विकास पाटील यांच्या पथकाने त्याचा माग काढत नागपूर रेल्वेस्थानकावर पुन्हा बेड्या ठोकल्या. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, एसडीपीओ अमोल कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार निलेश सुरडकर व पथकाने केली. आरोपी टेलिग्रामवरूनच संपर्क साधत आणि सतत ठिकाण बदलत असल्याचे तपासात समोर आले आहे.

## थोडक्यात



### गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, पालकांच्या हस्ते शाळेला स्पोर्ट रायफल भेट

**बाभुळगाव:** जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करून शाळेचे नाव उज्ज्वल करणाऱ्या पी.एम.बी. स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या क्रीडा यशाचे कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दैनिक भास्करचे पत्रकार शहेजाद शेख होते. प्रमुख अतिथी म्हणून नगरसेवक अक्षय राऊत व उर्दू जि.प. शाळा समितीचे माजी अध्यक्ष महम्मद जावेद उपस्थित होते. दरम्यान, विद्यार्थ्यांच्या क्रीडा प्रगतीला बळ देण्यासाठी पालकांनी पुढाकार घेत स्वखुशीने वर्गणी जमा केली. त्यातून शाळेला विद्यार्थ्यांच्या सरावासाठी अत्याधुनिक स्पोर्ट रायफल भेट देण्यात आली. या उपक्रमामुळे रायफल शूटिंगच्या सरावाला चालना मिळणार असून भविष्यात जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना अधिक सक्षम तयारी करता येणार आहे. प्रवीण चौधरी, राजू राठोड, राणी अमरावती, विजय कुकडे, राजेश काटेकर, प्रवीण आरडे, मुबारकपूर, अमोल लाकडे, शालिनी अरकराव, गजानन काटेकर व अतुल गावंडे यांच्यासह पालक व मान्यवरांनी या उपक्रमात सहभाग घेतला. मुख्याध्यापिका प्रा. मोनिका बुरेवार व संस्थाध्यक्ष गजानन बुरेवार यांनी आभार मानले.

### नशामुक्त भारत अभियानांतर्गत सवना येथे जनजागृती

**विद्यार्थ्यांना नशामुक्तीची सामूहिक शपथ**

**महागाव :** महागाव - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या व राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या निर्देशानुसार सवना येथील श्री विठ्ठल रुक्मिणी वाणिज्य महाविद्यालयात 'नशामुक्त भारत अभियान' राबविण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना नशामुक्तीची सामूहिक शपथ देण्यात आली. अमलीपदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम स्पष्ट करणारा माहितीपट दाखवून जनजागृती करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा.पी.पी.जयस्वाल होते. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. पंकज वामनराव चौधरी यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख उपस्थित प्रा.डॉ. गौरव काळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी नशामुक्त समाजनिर्मितीसाठी युवकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, रासेयो स्वयंसेवक व विद्यार्थी उपस्थित होते. संचालन व आभार डॉ. शुक्ला यांनी मानले.

### सत्य-अहिंसेच्या विचारांनी गुरुकुल विद्यालयात गांधी जयंतीला उजाळा

**गुरुकुल विद्यालयात महात्मा गांधी जयंती उत्साहात साजरी**

**झरी :** गुरुकुल विद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. सत्य, अहिंसा आणि मानवतेचा संदेश आपल्या विचारांतून संपूर्ण जगाला देणाऱ्या महात्मा गांधींच्या कार्याचे यावेळी स्मरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना गांधीजींच्या जीवनातील सत्य, अहिंसा, स्वच्छता, साधेपणा आणि स्वावलंबन या मूल्यांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. महात्मा गांधींचे विचार केवळ जयंती पुरते स्मरणात न ठेवता, ते आपल्या दैनंदिन आचरणातून प्रत्यक्षात आणणे हीच गांधीजींना खरी श्रद्धांजली ठरेल, असा प्रेरणादायी संदेश यावेळी देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण विद्यालय परिसर गांधीजींच्या विचारांनी भारावून गेला. कार्यक्रमास मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भरवस्तीतून गाभण गाय लंपास सीसीटीव्हीत चोरी कैद..!

**फुलसावंगी :** अस्मानी संकटांशी झुंज देत पशुधनाच्या आधाराने संसार सावरणाऱ्या शेतकऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. फुलसावंगी येथील तरुण शेतकरी शिवदास किसन साखरे यांची सुमारे ५० हजार रुपये किमतीची पाच महिन्यांची गाभण जर्शी गाय अज्ञात चोरट्यांनी भरवस्तीतून चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. अहिल्यादेवी होळकर कमानीजवळील खुल्या गोठ्यात ३० सप्टेंबरच्या रात्री गाय बांधण्यात आली होती. मात्र, १ ऑक्टोबर रोजी सकाळी ती गाय गायब असल्याचे निदर्शनास आले. उपलब्ध सीसीटीव्ही फुटेजमध्ये चोरीचा प्रकार कैद झाल्याचे सांगण्यात येत आहे. चोरट्यांनी गाईला इंजेक्शन देऊन बेशुद्ध करून चारचाकी वाहनातून नेल्याचा संशय आहे. या प्रकरणी महागाव पोलिसांत साना क्र. ४१/२०२६ नुसार नोंद झाली आहे. भरवस्तीतून जनावर चोरीला गेल्याने रात्रीच्या गस्तीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, सीसीटीव्हीच्या आधारे आरोपींचा छडा लावून गाय तातडीने शोधावी, अशी मागणी होत आहे.

# गोदावरी अर्बनचा ५,५६१ कोटींचा व्यवसाय ७ टक्के लाभांशाची घोषणा..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ३ :** सहकार क्षेत्रातील गोदावरी अर्बन पतसंस्थेची १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नांदेड येथील ब्लेसिंग सभागृहात उत्साहात पार पडली. संस्थेने मागील आर्थिक वर्षात ५ हजार ५६१ कोटी रुपयांचा एकूण व्यवसाय पूर्ण केल्याची माहिती व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांनी वार्षिक अहवालाच्या माध्यमातून दिली. संस्थेला २९.३२ कोटी रुपयांचा शुद्ध नफा झाला असून, सभासद व ग्राहकांसाठी ७ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला.

संस्थेच्या एकूण ठेवी ३ हजार ७९ कोटी, तर कर्जवितरण २ हजार ४८१ कोटी रुपये झाले. या आर्थिक कामगिरीचा उल्लेख करताना संस्थेच्या अध्यक्षा राजश्री पाटील यांनी आर्थिक शिस्त, ग्राहकाभिमुख सेवा आणि सभासदांचा विश्वास ही संस्थेच्या वाटचालीची प्रमुख शक्ती असल्याचे सांगितले. माजी आमदार शंकरअण्णा धोंडगे यांनी गोदावरी अर्बनचा पारदर्शक कारभार व आर्थिक सुदृढता इतर पतसंस्थांसाठी मार्गदर्शक ठरू शकते, असे मत व्यक्त केले. संस्थापक अध्यक्ष आमदार हेमंत पाटील, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंदराव बोंढारकर यांच्यासह पदाधिकारी, संचालक, अधिकारी, कर्मचारी व सभासद उपस्थित होते. सभेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांसह विविध शाखांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यवतमाळ शाखा क्रमांक एकने ४४७ कोटींच्या ठेवींसह सर्वोच्च ठेवींच्या कामगिरीत विशेष स्थान मिळविले. उत्कृष्ट वसुलीबद्दलही याच शाखेचा गौरव करण्यात आला. "गोदावरी अर्बन ही केवळ पतसंस्था नसून लाखो सभासदांचा दृढ विश्वास असलेला परिवार आहे," असे अध्यक्षा राजश्री पाटील यांनी नमूद केले.

# ३० कोटींचा निधी की केवळ घोषणेचा गाजावाजा?

## मंजुरीचे पत्र, प्रशासकीय मान्यता कुठे? संतोष बोरेले यांचा सवाल

## नियोजन न झाल्यास उपोषणाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ३ :** यवतमाळ शहराच्या विकासासाठी ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याच्या दाव्यावरून नगरपरिषदेत आरोप-प्रत्यारोपांना पुन्हा धार आली आहे. निधी मंजुरीबाबत शासनाचे अधिकृत पत्र, प्रशासकीय मान्यता अथवा शासन आदेश नगरपरिषदेला प्राप्त झाला आहे का, असा थेट सवाल नगरसेवक संतोष बोरेले यांनी उपस्थित केला आहे.

त्यामुळे ३० कोटींच्या निधीची घोषणा नेमकी कागदावर आहे की प्रत्यक्ष मंजुरीत, याबाबत प्रशासनाने स्पष्टता देण्याची मागणी होत आहे. बोरेले यांनी ३ ऑक्टोबर रोजी मुख्याधिकाऱ्यांना पत्र देऊन शहरातील विकासकामांच्या नियोजनाचा मुद्दा उपस्थित केला. यापूर्वी २९ सप्टेंबर रोजी दिलेल्या पत्रावर कार्यवाही न झाल्यास ११ ऑक्टोबर रोजी नगरपरिषदेसमोर आमरण उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. सत्तापक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केल्यानंतर ३० कोटी रुपये मंजूर झाल्याचा दावा केला आहे. मात्र, या निधीबाबत अद्याप शासनाचे अधिकृत पत्र, प्रशासकीय मान्यता किंवा निधी मंजुरी आदेश प्राप्त झालेला नसल्याची माहिती मुख्याधिकाऱ्यांनी दिल्याचे बोरेले यांनी पत्रात नमूद केले आहे. दरम्यान, शहरातील स्वच्छता, रस्त्यांची डागडुजी, नाल्यांची समस्या आणि नवरात्रोत्सवातील आवश्यक कामे अद्याप प्रलंबित असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. नागरिकांकडून कर वसुली होत असताना प्राथमिक सुविधांसाठी मात्र वारंवार निवेदने द्यावी लागत असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. ३० कोटींचा निधी प्रत्यक्षात उपलब्ध झाला असेल तर त्याचा अधिकृत आदेश कुठे? आणि कोणती कामे प्रस्तावित आहेत? याचा खुलासा नगरपरिषद प्रशासनाने करावा, अशी मागणी बोरेले यांनी केली आहे.

# सीसीटीव्हीचा 'डोळा' ठरला कामी, १० लाखांचे दागिने पोलिसांच्या हाती..!

## सात तोळे सोन्याचा ऐवज मुळ मालकाच्या स्वाधीन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. ३ :** रस्त्यात गहाळ झालेले सुमारे सात तोळे सोन्याचे दागिने आणि तब्बल १० लाख रुपयांचा ऐवज उमरखेड पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज, गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे शोधून काढला. पोलिसांच्या या तपासामुळे मौल्यवान दागिने मुळ मालकाला सुखरूप परत मिळाले.

बाजार समितीचे संचालक राधेश्याम नरसिंगदास भट्टड यांच्या पत्नीचे सोन्याचे विविध दागिने २६ सप्टेंबर रोजी दुपारी २ ते ३ वाजताच्या सुमारास सराफा दुकानात घेऊन जात असताना पाऊचमधून रस्त्यात कुठेतरी पडले. दागिने गहाळ झाल्याचे लक्षात आल्यानंतर भट्टड यांनी ३० सप्टेंबर रोजी उमरखेड पोलिसांत तक्रार दाखल केली. प्रभारी ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक अमोल गुंडे यांच्या निर्देशानुसार डी.बी. पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक शरद लोहकरे यांच्या पथकाने तपासाची चक्रे फिरवली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासताना तसेच तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे तपास पुढे नेताना बिटरगाव परिसरातील एका महिलेकडे दागिने असल्याचे निष्पन्न झाले.चौकशीत संबंधित महिलेने दागिने पोलिसांकडे स्वेच्छेने सुपूर्द केले. दागिने कोणाचे आहेत, याची माहिती नसल्याने ते स्वतःकडे ठेवले होते, असे तिने सांगितले. सात तोळे सोन्याचा हा ऐवज सुमारे १० लाख रुपये किमतीचा आहे. सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी गौरव कायंदे पाटील यांच्या हस्ते दागिने राधेश्याम भट्टड यांना परत करण्यात आले. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता व अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून मानकीत साकारला वनराई बंधारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**वणी, दि. ३ :** सेवा संकल्प अभियानांतर्गत मानकी येथे जि.प. उच्च प्राथमिक शाळा व ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून वनराई बंधारा बांधण्यात आला.विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष श्रमदानात सहभागी होत जलसंवर्धनाच्या उपक्रमाचा आनंद अनुभवला.या उपक्रमातून विद्यार्थ्यांना केवळ श्रमदानाची अनुभूतीच नव्हे,तर पाणी अडविणे, पाण्याचे संवर्धन आणि पर्यावरणाचे महत्त्व यासंदर्भातील वैज्ञानिक व सामाजिक जाणिवांचे धडे मिळाले.

या उपक्रमात शाळेचे मुख्याध्यापक आनंद पाटील,शिक्षक सुनील वाटेकर,श्रीकांत पिंपळशेंडे,श्रीमती अनिता नालमवार,कु.सपना ढवस, कु.दर्शना पिपराडे,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रशांत दर्वे,नागपूरे, ग्रामसेवक ऋषीकेश सोळंकी तसेच माजी सरपंच कैलास पिपराडे यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी बंधारा बांधण्याच्या कामात उत्साहाने सहभाग घेतला. प्रत्यक्ष कृतीतून पावसाचे पाणी अडविण्याचे तंत्र, जलसाठ्याचे महत्त्व आणि जलस्रोतांचे संवर्धन याबाबत विद्यार्थ्यांना अनुभवात्मक ज्ञान मिळाले. 'शिकणे आणि करून पाहणे' या संकल्पनेला या उपक्रमातून प्रत्यक्ष रूप मिळाले. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल संवेदनशीलता,सामाजिक बांधिलकी आणि सामूहिक कार्याची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.मानकी येथील हा उपक्रम जलसंवर्धनासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण जडणघडणीचा प्रेरणादायी उपक्रम ठरला.

# महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पाटणबोरी, दि. ३ :** जनता हायस्कूल, पाटणबोरी येथे २ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर सर्वधर्म प्रार्थना सभेचे आयोजन करण्यात आले. विविध धर्मांच्या प्रार्थनांमधून सर्वधर्मसमभाव, बंधुभाव, एकता व शांततेचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक कासावर सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षक चवर्डोल सर उपस्थित होते. यावेळी बुर्रेवार सर, नार्लावार सर, कुर्मावार सर, विनोद सर, नालमवार मॅडम यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी भाषणातून महात्मा गांधींचे सत्य, अहिंसा व शांततेचे विचार तसेच लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, प्रामाणिकपणा व देशभक्तीविषयी मनोगत व्यक्त केले. उपस्थितांनी विद्यार्थ्यांना या महान व्यक्तींच्या विचारांचा आदर्श घेऊन जबाबदार नागरिक बनण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे आयोजन गाईड कॅप्टन गीता कुमरे यांनी केले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# दुष्काळातही 'फी वसुली'चा तगादा, शासन निर्णयाला खाजगी शाळांचा ठेंगा!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. ३ :** दुष्काळाच्या संकटात शेतकरी आर्थिक अडचणीत असताना त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाचा खर्चही डोईजड होत आहे. राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांच्या शालेय शुल्का बाबत शासन निर्णय झालेला असतानाही काही खासगी व कॉन्व्हेंट शाळांकडून फी वसुलीसाठी पालकांवर दबाव टाकला जात असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्या संध्या संदेश रणवीर यांनी केला आहे.

२५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक ५ मध्ये 'शालेय' असा स्पष्ट उल्लेख असतानाही इयत्ता १ली ते ९वीच्या विद्यार्थ्यांकडून सहामाही परीक्षेपूर्वी 'पूर्ण फी भरा, अन्यथा परीक्षेला बसू देणार नाही' असा तगादा लावला जात असल्याचे रणवीर यांनी निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे शासन निर्णयाची अंमलबजावणी नेमकी कोण करणार, असा सवाल उपस्थित झाला आहे. या प्रकरणी रणवीर यांनी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांना निवेदन देऊन दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची इयत्ता १०वी-१२वीप्रमाणेच १ली ते ९वीची परीक्षा व तीन महिन्यांची मासिक फी माफ करण्याचे स्पष्ट आदेश देण्याची मागणी केली आहे. तसेच कोणत्याही विद्यार्थ्याला फीअभावी परीक्षेपासून वंचित ठेवू नये, याबाबत जिल्हाधिकारी व शिक्षणाधिकाऱ्यांना निर्देश द्यावेत आणि शासन निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या शाळांवर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# जिल्हा बँक निवडणुकीत 'शेतकरी सहकार विकास आघाडी'चा प्रचाराचा नारळ

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ३ :** यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या २०२६-३१ कालावधीतील निवडणुकीची रणधुमाळी आता प्रत्यक्ष प्रचाराच्या टप्प्यात पोहोचली आहे. 'शेतकरी सहकार विकास आघाडी'ने आपल्या प्रचार दौऱ्याचे नियोजन जाहीर केले असून, ४ ऑक्टोबर रोजी कळंब येथून प्रचाराचा श्रीगणेशा होणार आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या सत्तासमीकरणाला आता तालुकानिहाय बैठका आणि प्रचारातून धार येण्याची चिन्हे आहेत.

कळंब येथील चिंतामणी देवस्थानात सकाळी ११ वाजता नारळ फोडून प्रचाराचा प्रारंभ करण्यात येणार आहे. यावेळी माजी मंत्री माणिकराव ठाकरे, खासदार प्रतिभाताई धानोरकर, शिवाजीराव मोघे, प्रा.वसंतराव पुरके, आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्यासह प्रमुख पदाधिकारी व नेते उपस्थित राहणार असल्याचे आघाडीने नमूद केले आहे. ४ ते ८ ऑक्टोबरदरम्यान आघाडीचा १५ ठिकाणी प्रचार दौरा होणार आहे. कळंब, राळेगाव, यवतमाळनंतर आर्णी, घाटंजी, पांढरकवडा, दारव्हा, नेर, बाभूळगाव, वणी, मारेगाव, महागाव, उमरखेड आणि पुसद येथे बैठका घेण्यात येणार आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले असून, दिग्रस, पुसद व दारव्हा तालुका गटातील जागा बिनविरोध झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे उर्वरित जागांसाठी होणारा प्रचार आणि तालुकानिहाय मतदारांची जुळवाजुळव निर्णायक ठरणार आहे.

## जहाँ संत की होगी समाधी,धन्य वही स्थान है...

# संत अच्युत महाराजांना हजारो भाविकांची मौन श्रद्धांजली

### अभिनेते भारत गणेशपुरे यांची उपस्थिती;गायक रघुनाथ कर्डीकर यांच्या सुमधुर वाणीतून कार्यक्रम

**तिवसा/वार्ताहर**

विदर्भाचे ज्ञानेश्वर म्हणून ओळखले जाणाऱ्या गुरुमाऊली श्री संत अच्युत महाराज यांना आज त्यांच्या गुरुग्राम श्री क्षेत्र शेंदूरजना बाजार येथील महासमाधीस्थळी उपस्थित हजारो भाविकांनी साश्रूनयनांनी दोन मिनिटे मौन श्रद्धांजली वाहिली. यावेळी सुप्रसिद्ध सिने अभिनेते भारत गणेशपुरे यांनी या सोहळ्याला उपस्थिती दर्शविली होती.सुप्रसिद्ध गायक रघुनाथ कर्डीकर यांच्या सुमधुर वाणीतून मौन श्रद्धांजली सोहळ्याचा कार्यक्रम भावविभोर व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.



आज ३ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता गुरुमाऊली श्री संत अच्युत महाराज यांचे गुरुग्राम श्री क्षेत्र शेंदूरजना बाजार येथे देहावसान झाले होते.या दिवसाचे व वेळेचे स्मरण ठेवत महाराजांना श्रद्धांजली वाहिली जाते.या सोहळ्याला विदर्भ-महाराष्ट्र राज्याच्या कानाकोपऱ्यातुन तसेच पंचक्रोशीतील भाविकांनी आज या सोहळ्याला मोठ्या प्रमाणात उपस्थित होऊन श्रद्धांजली अर्पण केली.श्रद्धांजली कार्यक्रमानंतर अच्युत महाराजांची आरती व 'चलाना हमे नाम गुरू का चलाना 'या गीताद्वारे सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात आली.यावेळी सुप्रसिद्ध मराठी सिने अभिनेते भारत गणेशपुरे,अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस ,पद्मश्री जनार्दनपंत बोथे गुरुजी,आमदार राजेश वानखडे, अध्यक्ष डॉ अनिलपंत सावरकर,संत सचिनदेव महाराज,संत सयाजी महाराज, अशोकानंद कवर महाराज,जगद्गुरू रामराजेश्वर माऊली, कनेरकर महाराज,हार्ट हॉस्पिटलचे सचिव सुधीर दिवे, युवा स्वाभिमान चे पदाधिकारी धीरज केने,गोपाल कडू,अनंत धर्माळे आदी मान्यवर उपस्थित होते.

**संतांनी लिहिलेल्या पुस्तकातील विचाराने कार्य करा:-भारत गणेशपुरे**



आपल्या जिल्ह्याला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा,संत अच्युत महाराज सारखे अनेक संत लाभलेले आहे की, ज्यांनी समाजासाठी काम केले.समाजातील अनिष्ट रूढी,परंपरा, अंधश्रद्धा यावर भजन,कीर्तन व लेखनीतून प्रहार केला.जनजागृती केली.तरी आपण आजही अंधश्रद्धेला खतपाणी घालतो.आतातरी जागे व्हा.संतांनी अनेक पुस्तके लिहिली आहे,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीता लिहून ठेवली,त्यातील विचार पुढील आजच नाही तर पुढील १०० वर्षेही कामी येईल,असे त्यातील विचार असून अंधश्रद्धा निर्मूलन करणारे संत आपल्या जिल्ह्याला मिळाले आहे,त्यामुळे आपण खरोखरच भाग्यवान असल्याचे सुप्रसिद्ध मराठी सिने अभिनेते भारत गणेशपुरे यांनी यावेळी सांगितले.

## १,९८५ गावांची नजरअंदाज पैसेवारी जाहीर

### खरीप पिकांची हंगामी सुधारित पैसेवारी ५० च्या आतच

**अमरावती/का.प्र.**

वर्ष २०२६-२७ या वर्षासाठी खरीप पिकांची हंगामी सुधारित पैसेवारी जाहीर करण्यात आली आहे. जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये एकूण २ हजार १२ गावे असून त्यापैकी १ हजार ९८५ गावांची पैसेवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे. खरीप पिकांची हंगामी सुधारित पैसेवारी ५० च्या आतच असल्याचे दिसून येत आहे. २७गावांची मात्र पैसेवारी काढण्यात आलेली नाही.

प्रसिद्ध करण्यात आलेल्या गावांमध्ये तालुकानिहाय नजरअंदाज पैसेवारीची आकडेवारी प्रशासनाने निश्चित केली आहे. अमरावती तालुक्यात १५६ पैकी १५१, भातकुली तालुक्यात १३८ पैकी १३६, तिवसा तालुक्यातील सर्व ९९, चांदूर रेल्वेतील ९४ पैकी ९१ आणि धामणगाव रेल्वेतील सर्व ११२ गावांची पैसेवारी प्रसिद्ध झाली आहे. नांदगाव खंडेश्वर तालुक्यात १६१ पैकी १६१, मोर्शीमध्ये १६० पैकी १५९, वरूडमध्ये सर्व १४०, अचलपूरमधील सर्व १८६, चांदूर बाजारमधील सर्व १६९, दर्यापूरमधील सर्व १५६, अंजनगाव सुर्जीतील सर्व १२७, धारणीतील १५३ पैकी १५२ आणि चिखलदरा तालुक्यातील १६१ पैकी १४६ गावांची पैसेवारी प्रसिद्ध झाली आहे. जिल्ह्याची एकत्रित प्रसिद्ध नजरअंदाज पैसेवारी ४७पैसे आहे.

## माजी सरकारी वकील ॲड. विजय तायडे यांना श्रद्धांजली

**अमरावती/का.प्र.**

लेबर लॉ प्रॅक्टीशनर असोसिएशन द्वारा दिवंगत अधिवक्ता विजय तायडे यांना वकील संघाचे कार्यालयात ज्येष्ठ अधिवक्ता ॲड. नारायण टावरी यांच्या अध्यक्षतेखाली श्रद्धांजली देण्यात आली. वकील संघाचे सदस्य ॲड. दिपक श्रीमाळी, ॲड. सी.बी. पचलोरे, ॲड. अनिल कडू, ॲड. राजेंद्र पांडे, ॲड. संजय भोंडे, ॲड. दिपक सिनकर यांनी त्यांच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकला. संचालन ॲड. निलिजा राऊत यांनी केले. या प्रसंगी सन्माननीय सदस्य ॲड. संजय राठी, आदित्य दुबे, अरविंद इंगळे, अंजली धोटे, ज्ञानेश्वर बुरघाटे, संजय ठाकरे, घनश्याम पांडे यांचेसह बहुसंख्य अधिवक्तागण उपस्थित होते.



## खेळाडूंना मिळणार घरबसल्या 'क्रीडा ई-प्रमाणपत्र'

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील गुणवंत खेळाडूंना शासकीय आणि निमशासकीय सेवांमध्ये ५ टक्के आरक्षणाचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि जलद गतीने मिळावा यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने खेळाडूंसाठी 'क्रीडा ई-प्रमाण' ही ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित अद्ययावत प्रणाली कार्यान्वित केली आहे. या प्रणालीमुळे खेळाडूंना घरी बसून अत्यंत सोप्या पद्धतीने आपले क्रीडा ई-प्रमाणपत्र मिळवता येणार आहे.

ही नवीन प्रणाली ब्लॉकचेन तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आहे. त्यामुळे बोगस प्रमाणपत्रांच्या गैरप्रकारांना पूर्णपणे आळा बसेल. खेळाडूने पोर्टलवर माहिती भरल्यानंतर, ती मूळ डेटाशी जुळल्यास अवघ्या २४ तासांच्या आत डिजिटल पडताळणी अहवाल उपलब्ध होणार आहे. तसेच प्रत्येक प्रमाणपत्रावर एक क्यूआर कोड सुरक्षा असेल. नियुक्ती प्राधिकारी हा क्यूआर कोड स्कॅन करून प्रमाणपत्राची सत्यता त्वरित पडताळू शकतील.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच इतर सर्व शासकीय पदभरतीसाठी अर्ज करताना खेळाडूंना आता हे 'क्रीडा ई-प्रमाणपत्र' जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे. या प्रमाणपत्राशिवाय खेळाडू संवर्गातून अर्जाचा विचार केला जाणार नाही. ज्या खेळाडूंनी यापूर्वी विभागीय उपसंचालकांकडून प्रमाणपत्रांची पडताळणी करून घेतली आहे, त्यांनाही आगामी भरती प्रक्रियेसाठी या नवीन प्रणालीद्वारे प्रमाणपत्र तयार करून घेणे बंधनकारक आहे. या प्रणाली अंतर्गत ५ टक्के खेळाडू आरक्षणाचे क्रीडा संघटनेमार्फत प्राप्त अभिलेख (रेकॉर्ड्स) क्रीडा ई-प्रमाण पोर्टलवर अपलोड केले जात आहेत.

अधिकृत स्पर्धांमध्ये प्रावीण्य मिळविलेल्या खेळाडूंनी प्रमाणपत्र मिळविण्याकरिता क्रीडा विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर आपली नोंदणी पूर्ण करावी आणि प्रमाणपत्र मिळवावे, असे आवाहन क्रीडा विभागाकडून करण्यात आले आहे.

## शनी ग्रह आज पृथ्वीच्या जवळ

**अमरावती/का.प्र.**

आपल्या सूर्यमालेतील सर्वात सुंदर विलोभनीय रिंग असणारा शनी ग्रह हा ४ ऑक्टोबर रोजी पृथ्वीच्या जवळ राहील. ४ ऑक्टोबर रोजी शनी ग्रह अगदी सूर्यासमोर राहील. या घटनेला खगोलशास्त्रात प्रतियूती असे म्हणतात.

प्रतियूतीच्या आसपास पृथ्वी-शनी हे अंतर सरासरी कमी असते. त्यामुळे या काळात शनीची सुप्रसिद्ध सुंदर रिंग अगदी चांगल्या प्रकारे दिसू शकते. ही रिंग साध्या डोळ्यांनी दिसू शकत नाही. याकरिता टेलीस्कोपची आवश्यकता आहे. शनीला एकूण ८२ चंद्र असून सर्वात मोठा चंद्र टायटन हा आहे. या ग्रहाला सूर्याभोवती एक चक्कर मारण्यास २९.५ वर्ष लागतात. या ग्रहाचा व्यास १,२०,००० किमी आहे. तापमान शून्याखाली १८० अंश सेंटिग्रेड आहे. या ग्रहाची घनता सर्वात कमी आहे. शनीची रिंग २ लाख ७० हजार किमीपर्यंत पसरलेली आहे. ही रिंग बर्फाची आहे. शनीचे वस्तूमान पृथ्वीच्या ९५ पट आहे. पृथ्वी ज्या वेळी शनीच्या विषुववृत्त पातळीत असते,अशा वेळी शनीचे कडे पृथ्वीवरुन चांगल्या प्रकारे दिसू शकत नाही.

शनीचा अभ्यास करणारे पहिले मानवरहित यान 'कॅसिनी' हे आहे. व्हायेजर या मानवरहित यानांनीसुद्धा

शनीचे जवळून छायाचित्र घेतले होते. ४ ऑक्टोबर रोजी सूर्य मावळल्यावर लगेच शनी ग्रह हा पूर्व क्षितीजावर उगवेल व पहाटे पश्चिम क्षितीजावर मावळेल. हा ग्रह रात्रभर आकाशामध्ये दिसेल. हा ग्रह काळसर व पिंगट रंगाचा अगदी चमकदार दिसेल. त्यामुळे हा सहज ओळखता येईल. परंतु, या ग्रहाची

सुप्रसिद्ध रिंग साध्या डोळ्यांनी दिसू शकणार नाही. या करिता टेलिस्कोपची आवश्यकता आहे. हा ग्रह पृथ्वीच्या जवळ आल्याने या ग्रहाचा मानवी जीवनावर कोणताही वाईट परिणाम होणार नाही. या आधी २१ सप्टेंबर २०२५ रोजी शनी पृथ्वीच्या जवळ आला होता, अशी माहिती मराठी विज्ञान परिषद,अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी दिली आहे.

## अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक - २०२६

### मतदानासाठी मतदारांना विशेष नैमित्तिक रजा जाहिर

**अमरावती-** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. निवडणूकीसाठी मतदार असलेल्या शिक्षक मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी विशेष नैमित्तिक रजा जाहिर करण्यात आली आहे.भारत निवडणूक आयोगाने दिनांक २२ सप्टेंबर, २०२६ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकान्वये औरंगाबाद विभाग, पुणे? विभाग व नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघ तसेच अमरावती विभाग व पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक - २०२६ चा कार्यक्रम जाहिर केलेला आहे. निवडणूकीचे मतदान शुक्रवार दि. २३ ऑक्टोबर, २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत व मतमोजणी मंगळवार दि. २७ ऑक्टोबर, २०२६ रोजी होणार आहे.

निवडणुकीसाठी मतदार असलेल्या पदवीधर/शिक्षक मतदारांना मतदानांचा हक्क बजावता यावा, यासाठी लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ च्या कलम १३५ँ नुसार भर पगारी सुट्टी जाहीर करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २३ जून, १९९१ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदवीधर/शिक्षक मतदारसंघामध्ये मतदार असलेल्या व्यक्तींना विशेष नैमित्तिक रजा जाहीर करण्यात आलेली आहे. या शासन निर्णयाची प्रत शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.निवडणुकीरिता मतदार असलेल्या खाजगी आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या मतदारांना सदर विशेष नैमित्तिक रजा लागू होत नाही. त्यामुळे अशा मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी २ तासांची विशेष सवलत देण्याबाबत संबंधित खाजगी आस्थापनांना त्यांच्या स्तरावरुन आवश्यक त्या सूचना देण्याबाबत निवडणूक आयोगाने कळविले आहे.अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणूकीसाठी मतदार असलेल्या कर्मचाऱ्यांना या तरतुदीनुसार विशेष नैमित्तिक रजा जाहिर करण्यात आली असून मतदारांनी आपला मतदानाचा हक्क प्राधान्याने बजावावा असे आवाहन अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी नयना गुंडे यांनी केले आहे.

## वैराट जंगल सफारीला पर्यटकांची पहिली पसंती

**चिखलदरा/वार्ताहर**

सातपुडा पर्वतरांगेत वसलेले पाने जंगल, वन्यजीव प्रेमी आणि पर्यटक या दोघांसाठीही एक लोकप्रिय ठिकाण बनले आहे. वैरात जंगल सफारी पर्यटकांसाठी झपाट्याने एक लोकप्रिय पर्याय बनत आहे. हे नैसर्गिकरित्या सुंदर जंगल पर्यटकांना एक रोमांचक अनुभव देते, जिथे त्यांना धरणे, दुर्मिळ वन्यजीव आणि रंगीबेरंगी पक्षी पाहायला मिळतात.

मेळघाटाच्या जंगलात वन्यजीव पाहण्यासाठी चार प्रमुख सफारी गेट्स आहेत. यामध्ये अकोटमधील नरनाळा, सेमाडोह, चिखलदरा येथील बागत आणि हरिभान जंगल सफारी गेट यांचा समावेश आहे. या जंगलांमध्ये नर आणि मादी या दोघांसहित ७५ पेक्षा जास्त पक्ष्यांच्या प्रजातींचे संरक्षण आणि संगोपन केले जात आहे.





वाघांच्या उपस्थितीव्यतिरिक्त, पर्यटकांना जंगलातील इतर वन्यजीव पाहण्याची संधीही मिळते.६ ते ७ वाघ दिसल्याचे वृत्त समोर आले असलने वैराट जंगल सफारी सध्या चर्चेत आहे.मात्र, वन्यजीवांचे दर्शन हवामान, वेळ आणि नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून असते. मेळघाटाची नैसर्गिक संपत्ती,वाघ आणि विविध वन्यजीवांच्या उपस्थितीमुळे वैरात जंगल सफारी हे एक प्रमुख पर्यटन स्थळ बनले आहे, जिथे निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवण्याची संधी मिळते. जंगलांमध्ये वन्यजीव दिसण्याच्या मुबलक संधींमुळे हे एक लोकप्रिय पर्यटन स्थळ बनले आहे.

**अस्वलांपासून ते जंगली श्वानांपर्यंत, वन्यजीवांचे अनोखे जग**

जंगल सफारीमध्ये अस्वल, बिबट्या, सांबर, रानकुत्रे, रानडुक्कर आणि भुंकणारे हरीण यांच्या व्यतिरिक्त, घारीसह अनेक पक्ष्यांच्या प्रजातींची उपस्थिती पर्यटकांना आकर्षित करते. घनदाट जंगल, डोंगर आणि नैसर्गिक वातावरणात या पक्ष्यांना भेट देणे हा पर्यटकांसाठी एक अविस्मरणीय अनुभव असतो.

**पर्यटन आणि स्थानिक रोजगाराला नवी ओळख मिळत आहे.**

वैराट जंगल सफारीमधील वाढत्या रसामुळे चिखलदराच्या पर्यटन क्षेत्राला एक नवी ओळख मिळत आहे. या जंगल सफारीच्या माध्यमातून जिप्सी चालक आणि स्थानिक मार्गदर्शक पर्यटकांना जंगलाची सफर घडवतात. यामुळे परिसरातील तरुणांना रोजगाराच्या संधीही उपलब्ध होतात. या प्रदेशासाठी वन्यजीव संरक्षण आणि पर्यटन यांच्यात संतुलन राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

## संक्षिप्त

### ऑफ्रोह संघटनेचे आज अमरावती येथे अधिवेशन

**अमरावती-**ऑर्गनायझेशन फॉर राईट्स ऑफ ह्युमन (ऑफ्रोह) महाराष्ट्र या संघटनेचे अधिवेशन रविवार दिनांक ४ ऑक्टोबर रोजी अभियंता भवन येथे होणार आहेत. आमदार प्रविण तायडे यांचे हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार असून प्रमुख अतिथी प्रितीताई हर्षल रेवणे शिक्षण सभापती महानगरपालिका, ऑफ्रोह संघटनेचे राज्याध्यक्ष राजेश सोनपरोते राहणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवानंद सहारकर हे आहेत.अनुसूचित जमातीतील अधिकारी कर्मचा-यांच्या समस्येसाठी ऑफ्रोह संघटनेची स्थापना करण्यात आली होती. या संघटनेच्या माध्यमातून कर्मचा-यांच्या अनेक समस्यांवर शासनासोबत चर्चा करण्यात आल्या. तथापि अजून ही आदिवासींच्या अनेक समस्या विविध स्वरूपात निर्माण होत आहेत.या अधिवेशनात संघटनेचे कायदे सल्लागार मनोज जुनोनकर, अनिल ढोले, उपाध्यक्ष प्रा देवराम नंदनवार, कोषाध्यक्ष मनिष पंचगाम, डॉ अनंत पाटील, गजेंद्र पौनीकर, दत्तात्रय अन्नमवाड, चंद्रभान सोनुने, महिला राजाध्यक्ष अनघा वैद्य, उपाध्यक्षा प्रिया खापरे, विभागीय अध्यक्ष प्रा सुरेश पाटकर इ प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.अधिवेशनात संघटनेची नवीन कार्यकारिणी निवडली जाणार आहेत.

### मराठी भाषा गौरव दिनानिमित्त निबंध स्पर्धा

**अमरावती-**स्थानिक श्री. आर. आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालय मोर्शी येथे 'अभिजात मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने' निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.एन. चौधरी यांच्या मार्गदर्शनात मराठीच्या शिक्षिका डॉ. दिपाली सांगोले (चिखले) यांनी सदर निबंध स्पर्धेचे आयोजन केले. यावेळी या निबंध स्पर्धेला महाविद्यालयाचे विज्ञान विभागाचे विभाग प्रमुख विनोद सावरकर यांनी यानिमिताने विशेष मार्गदर्शन केले. तसेच हर्षल देशमुख यांनी ही विद्यार्थ्यांच्या निबंध लेखन उपक्रमाबाबत त्यांचे कौतुक केले. या निबंध स्पर्धेला महाविद्यालयातील बहुतांश विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवून मराठी भाषेविषयीची आपली आवड, आपले ज्ञान व लेखन कौशल्य याचा कस लावत या निबंध स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धेच्या निमिताने महाविद्यालयातील शिक्षकांचे सहकार्य लाभले.



### विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभागात आत्महत्या प्रतिबंध जनजागृती कार्यक्रम

**अमरावती-**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा मानसशास्त्र विभाग आणि विदर्भ सायकियाट्रिक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आत्महत्या प्रतिबंध जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, प्रमुख वक्ते म्हणून प्रसिध्द मानसोपचार तज्ज्ञ तथा विदर्भ सायकियाट्रिक असोसिएशनचे सचिव डॉ. रोहीत देशमुख, प्रमुख अतिथी म्हणून इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय कोल्हे उपस्थित होते. आत्महत्या प्रतिबंध महिन्याच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्य, आत्महत्या प्रतिबंध, जोखीम, वेळेवर व्यावसायिक मदत आणि जागरुकता निर्माण करणे हा कार्यक्रमाचा उद्देश होता.यावेळी प्रसिध्द मानसोपचार तज्ज्ञ डॉ. रोहित देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना आत्महत्येमागील वैद्यकीय व मानसशास्त्रीय कारणे, मानसिकता याबाबत माहिती दिली.प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. अजय कोल्हे यांनी मोबाईलचा अतिवापर,समवयस्कांचा दबाव याचा मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम सांगितला. अध्यक्षीय भाषणातून कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अपेक्षा आणि प्रत्यक्ष जीवनातील परिस्थितीतील अंतरामुळे निर्माण होणा-या मानसिक आजाराविषयी मार्गदर्शन केले.संचालन प्रा. मनिषा लाकडे प्रा. राजश्री खडसे यांनी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने कार्यक्रम व्यवस्थापनाची जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाला वरिष्ठ सहाय्यक राजीव इंगोले, डॉ. श्रध्दा हरकंचे,प्रा. अभिजित खंडारे,विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.



### निवृत्तीवेतनधारकांसाठी मंगळवारी कार्यशाळा

**अमरावती-**लेखा व कोषागारे संचालनालयाने निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी महा-उपलब्धी या मोबाईल ॲपबाबत जनजागृती व मार्गदर्शन करण्यासाठी अमरावती जिल्हा कोषागार कार्यालयात विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.ही कार्यशाळा मंगळवार, ६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा कोषागार कार्यालयातील जिजाऊ सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.'महा-उपलब्धी'पच्या माध्यमातून निवृत्तीवेतनासंबंधी विविध सेवा जलद, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध होणार आहेत. निवृत्तीवेतनधारकांना विविध सेवांचा लाभ घेण्यासाठी हे ॲप उपयुक्त ठरणार आहे. वित्त विभागाचे प्रधान सचिव (ले. व को.) ऑनलाइन उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.कोषागार कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी उपस्थित राहून कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कोषागार अधिकारी (निवे.) अमोल इखे यांनी केले आहे.

### आज राष्ट्रीय तबलावादन व शास्त्रीय गायन स्पर्धा

**अमरावती-**शहरातील विख्यात तबलावादक स्व. उस्ताद लड्डूमियाँ खां प्रतिष्ठानच्या वतीने रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी भव्य राष्ट्रीय तबलावादन व शास्त्रीय गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. राजापेठ चौकातील दीपार्चन सभागृहात होणारी ही स्पर्धा किशोर गट, बाल गट व कन्या गट अशा तीन विभागांत पार पडणार आहे.स्पर्धेत रायपूर, इंदौर, गुजरात, मुंबई, ठाणे, बनारस यांसह विविध शहरांतील नामांकित तसेच नवोदित तबलावादक व शास्त्रीय गायक सहभागी होणार आहेत. देशभरातून येणाऱ्या कलाकारांच्या सादरीकरणामुळे अमरावतीतील संगीत रसिकांना दर्जेदार कलाविष्काराचा आनंद घेता येणार आहे.मुकुंद सराफ व प्रा. मीनल ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या स्पर्धेला सुरमणी कमलताई भोंडे, प्रा. डॉ. मीनल ठाकरे, ॲड. मिलिंद वैष्णव, निलेश इंगळे, नारायण दरेकर, श्रीकृष्ण जिरापुरे, गजानन देऊळकर यांच्यासह शहरातील अनेक दिग्गज संगीत साधक उपस्थित राहणार आहेत.

# शिक्षणव्यवस्थेची सुटका

भारतीय शिक्षण व्यवस्थेला गेल्या काही दशकांपासून ग्रासणारा सर्वात मोठा आजार म्हणजे 'कोचिंग संस्कृती'. इयत्ता अकरावी-बारावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपासून ते वैद्यकीय (नीट), अभियांत्रिकी (जेईई) किंवा केंद्रीय विद्यापीठांच्या (सीयूईटी) प्रवेश परीक्षांची तयारी करणाऱ्या तरुण पिढीपर्यंत प्रत्येकजण आज या खासगी प्रशिक्षण वर्गांच्या विळख्यात सापडला आहे, या पार्श्वभूमीवर, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने कोचिंगवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी तयार केलेला नवीन मसुदा अत्यंत आश्वासक आणि काळाची गरज अधोरेखित करणारा आहे. तत्कालीन उच्च शिक्षण सचिव विनीत जोशी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या नऊ सदस्यीय समितीने प्रवेश परीक्षांचे वर्षातून किमान दोनदा आयोजन, शालेय शिक्षकांचे विशेष प्रशिक्षण आणि प्रश्नपत्रिकांच्या काठिण्यपातळीचे पुनरावलोकन यांसारख्या अत्यंत महत्त्वपूर्ण शिफारशी मांडल्या आहेत. या धोरणात्मक बदलांचे स्वागत करतानाच, मूळ शालेय शिक्षणाचा दर्जा सुधारल्याशिवाय हा लढा यशस्वी होऊ शकत नाही, हे वास्तवाचे भानही ठेवणे आवश्यक आहे.

प्रस्तावित मसुद्यातील सर्वात मोठा दिलासादायक निर्णय म्हणजे जेईई, नीट आणि सीयूईटी यांसारख्या अत्यंत प्रतिष्ठेच्या प्रवेश परीक्षा वर्षातून दोनदा आयोजित करण्याची शिफारस. सध्या जेईई मेन्स सोडल्यास नीट आणि सीयूईटी या परीक्षा वर्षातून केवळ एकदाच घेतल्या जातात. एकाच परीक्षेवर विद्यार्थ्यांचे संपूर्ण भवितव्य अवलंबून असल्याने त्यांच्यावर 'करा किंवा मरा' स्वरूपाचा प्रचंड दबाव असतो. ऐन परीक्षेच्या दिवशी आजारपण किंवा मानसिक ताण आल्यास विद्यार्थ्यांचे संपूर्ण वर्ष वाया जाते, ज्यातून अनेक तरुण नैराश्येच्या गर्तेत ढकलले जातात. परीक्षा वर्षातून दोनदा झाल्यास विद्यार्थ्यांना सुधारण्याची दुसरी संधी मिळेल, ज्यामुळे त्यांच्या डोक्यावरील मानसिक ताण लक्षणीयरीत्या कमी होईल. समितीने मांडलेला दुसरा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रवेश परीक्षांच्या काठिण्यपातळीची आणि



**कोचिंग संस्कृतीतून भारतीय शिक्षणव्यवस्थेची सुटका करण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने तयार केलेला नवीन मसुदा अत्यंत आश्वासक आहे. मात्र, केवळ परीक्षांचे स्वरूप बदलून किंवा काठिण्यपातळी कमी करून कोचिंग संस्कृती नष्ट होणार नाही. या मसुद्याची अंमलबजावणी केवळ कागदावर राहता कामा नये.**

अभ्यासक्रमाची पुनर्रचना करणे. गेल्या काही वर्षांत व्यावसायिक प्रवेश परीक्षांमध्ये विचारले जाणारे प्रश्न हे शालेय अभ्यासक्रमाच्या आणि बारावीच्या पातळीच्या खूप वरचे असतात, अशी तक्रार नेहमी केली जाते. त्यामुळेच विद्यार्थ्यांना शाळा सोडून खासगी प्रशिक्षण वर्गांचा आश्रय घ्यावा लागतो. यातूनच 'डमी शाळां'ची गैरप्रथा उगम पावली, जिथे विद्यार्थी शाळेत न जाता थेट कोचिंग सेंटरमध्ये बसतात. केवळ नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग (एनसीईआरटी) वर आधारित प्रश्नपत्रिकांऐवजी राज्य शिक्षण मंडळांच्या (स्टेट बोर्ड) अभ्यासक्रमाचाही समावेश करण्याचा प्रस्ताव ग्रामीण आणि प्रादेशिक बोर्डाच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत न्यायाचा ठरेल. यामुळे सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांना समान संधी उपलब्ध होऊ शकेल; परंतु केवळ परीक्षांचे स्वरूप बदलून किंवा काठिण्यपातळी कमी करून कोचिंग संस्कृती नष्ट होणार नाही. या समस्येचे मूळ आपल्या शालेय शिक्षणव्यवस्थेच्या ढासळलेल्या दर्जात दडले आहे. एक काळ असा होता की, अकरावी-बारावीचा अभ्यास प्रामाणिकपणे करणारा विद्यार्थी कोणत्याही कोचिंगशिवाय अभियांत्रिकी आणि वैद्यकीय प्रवेश परीक्षा सहज उत्तीर्ण होत असे. मात्र, काळाच्या ओघात शाळांमधील पठन-पाठणाचा दर्जा घसरत गेला आणि प्रवेश परीक्षा अधिक क्लिष्ट होत गेल्या. या पोकळीचा फायदा घेऊन खासगी प्रशिक्षण वर्गांनी अब्जावधी रुपयांचा उद्योग उभारला.

आज बहुतांश शिक्षण मंडळांचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना केवळ बोर्डाच्या परीक्षेत ९०-९५ टक्के गुण मिळवून देणे एवढेच उरले आहे. गुणांची ही फुगीर टक्केवारी विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची खरी खोली दर्शवत नाही. त्यामुळे शालेय स्तरावर, विशेषतः आठवीपासूनच जेव्हा विद्यार्थी विज्ञान आणि गणित या विषयांची निवड करतात, तेव्हापासूनच शिक्षणाचा दर्जा असा असायला हवा की त्यांना भविष्यात कोणत्याही शिकवणी वर्ग किंवा कोचिंगची गरज भासू नये. यासाठी सरकारी तसेच खासगी शाळांमधील शिक्षकांना स्पर्धा परीक्षांच्या धर्तीवर शिकवण्यासाठी विशेष प्रशिक्षित करणे अनिवार्य आहे.

शिक्षण मंत्रालयाने उचललेले हे पाऊल निश्चितच स्वागतार्ह आहे; परंतु त्याची अंमलबजावणी केवळ कागदावर राहता कामा नये. केंद्रीय आणि राज्य शिक्षण मंडळांच्या अभ्यासक्रमात सुसूत्रता आणणे, शाळांमधील पायाभूत सुविधा आणि गुणवत्तेत वाढ करणे, तसेच डमी शाळांवर आणि खासगी प्रशिक्षण वर्गांच्या अवाच्या सव्वा फीवर कठोर नियंत्रण आणणे तितकेच गरजेचे आहे. पालकांच्या खिशाला पडणारे भगदाड आणि विद्यार्थ्यांवर येणारा मानसिक ताण थांबवायचा असेल, तर शालेय शिक्षणव्यवस्थेला पुन्हा एकदा सक्षम बनवावे लागेल. शिक्षण हे केवळ परीक्षा पास होण्याचे साधन न राहता, ते विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान आणि क्षमता निर्माण करणारे असावे, तरच या देशातील तरुण पिढी कोचिंगच्या मानसिक गुलामगिरीतून खऱ्या अर्थाने मुक्त होईल. पालकांनीही आपल्या पाल्यावर गुणांचे ओझे लादण्याऐवजी त्यांच्यातील नैसर्गिक कौशल्यांचा विकास करावा, जेणेकरून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल, शिक्षण मंत्रालयाने उचललेले हे पाऊल निश्चितच स्वागतार्ह आहे, परंतु त्याची अंमलबजावणी केवळ कागदावर राहता कामा नये. केंद्रीय आणि राज्य शिक्षण मंडळांच्या अभ्यासक्रमात सुसूत्रता आणणे, शाळांमधील पायाभूत सुविधा आणि गुणवत्तेत वाढ करणे तितकेच गरजेचे आहे.

(साभार-प्रहार)

## हनुमान चालिसाचे महत्त्व...

कॅप्टन स्मित मच्छार यांच्या शौर्याने भारताची मान जगभरात उंचावली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद साधताना त्यांच्या प्रसंगावधनासोबत, त्यांनी हनुमान चालिसेचा उल्लेख केला, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे.कठीण प्रसंगी हनुमान चालिसेतून मिळणारे मनोबल आपल्याला संकटांशी लढण्याचे बळ देते, असा त्यांचा अनुभव आहे. या प्रसंगातून भारतीय संस्कृती आणि अध्यात्माचे जीवनातील महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे. आपल्या पूर्वजांनी दिलेले श्लोक, स्तोत्रे आणि मंत्र हे जुनाट नसून मनाला स्थैर्य व सकारात्मकता देणारा समृद्ध वारसा आहे.म्हणून या बातम्या केवळ वाचून न थांबता हनुमान चालिसा किंवा श्रीमारुतिस्तोत्र यासह विविध स्तोत्रांचे पठण घरोघरी सुरू झाले पाहिजे. लहान मुलांनाही या संस्कारांची ओळख करून देणे आवश्यक आहे.आजच्या तणावपूर्ण जीवनात नामस्मरण, प्रार्थना आणि स्तोत्रपठण मनाला आधार देऊ शकते. आपली आध्यात्मिक परंपरा ही केवळ भूतकाळाची आठवण नसून वर्तमान जीवनालाही बळ देणारी आहे. हा वारसा जपणे आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे, हे प्रत्येक सनातन धर्मीयाचे कर्तव्य आहे.



**प्रणाली कोचरेकर**

## मन वढाय वढाय

सुप्तावस्तेत काम वासना
प्रत्येकाच्या मनी वसते

रुपसुंदरी दिसता भौ
नकळत उफाळून येते..

तरुण असो की वयोवृद्ध
एकचआहे 'पॅटर्न'

त्यामुळेच जीवनात येती
धोकादायक 'टर्न'...

लोक काय म्हणतील व
नैतिक संस्कारांचा प्रभाव
वाईट कृत्यांपासून
करतात आपला बचाव..

**प्रा.अशोक सारडा,**
मेहकर
मो.९४२१३९४३३९

# प्रज्ञाचक्षुचे सगुण दर्शन एका नवबौद्धाने घडविले

परवा सरसंघचालक मोहन भागवत माधान येथे आले होते. प्रज्ञाचक्षु श्री संत गुलाबराव महाराज यांचे हे पैतृक गाव. त्यांनी स्थापन केलेल्या मधुराव्दैत संप्रदायाचे काही धार्मिक निर्बंध होते. त्यामुळे इतक्या मोठ्या तत्वज्ञ संताचे, ना देऊळ ना मूर्ती.मात्र १९८१ च्या जन्मशताब्दी वर्षात स्व.बाबा मोहोड या साहित्यीकाने हे निर्बंध तोडले .त्यामुळे अभिजनांच्या साखळदंडातून मुक्त होत.श्री महाराज कृषिवलांच्या लोकगंगेत अवतरले.त्यावर्षी चंगल बावरू सर्वटकर या नवबौद्धाने श्री संत गुलाबराव महाराज यांचा सगुण विग्रह (मूर्ती) बसवण्याचा संकल्प केला.त्याने ही मूर्ती पोळ्याला जयपूरहून गावात आणली.ती जवंजाळच्या वाड्यात ठेवली . याआधी जवंजाळ कुटुंबाच्या आश्रीत माता तुळजाबाई बनाजी



भालेराव यांनी ८ एकर काळीची शेती महाराजांना दान केली होती.ज्ञानेश्वर महाराज पुण्यतिथी च्या महाप्रसादाची त्यातून करण्याची तजवीज करून ठेवली होती.हा दुग्धशर्करा योग होता.परंतु या नवबौद्धाच्या मूर्ती संकल्पपूर्तीला जातीवादी नकार आले. त्यामुळे या दातृत्वाच्या पार चिंधड्या झाल्या.मात्र एक तपानंतर वैकुंठवासी हभप पंचगव्हाणकर महाराजांनी मध्यस्थी करून मूर्ती स्थापनेचा मार्ग मोकळा केला. शंकराचार्यांनी आपले प्राण ओतून अखेर ह्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली. त्यामुळे कुठलेही धार्मिक अधिष्ठान नसलेले हे स्थळ या नवबौध्दाच्या दातृत्वाने मान्यता पावले.श्री संत गुलाबराव महाराजांचा हा पहिला वहिला सगुण विग्रह.पहिल्यांदा पूजाअर्चेसाठी प्रतिष्ठापीत झाला.ही खरी क्रांतीकारी घटना होती .

खरे तर हाकेच्या अंतरावर असलेले शिवमंदीर हे मोहोड कुळाची तपोभूमी आहे.सोमलसारखे जहाल हलाहल पचवून आपली प्राणसिद्धता याच मंदिरात महाराजांनी करून दाखवली होती.आपल्या सर्वच ग्रंथप्रतिभेची प्रेरणा व प्रज्ञा त्यांना येथूनच मिळाली होती. त्यांचे उत्तराधिकारी श्री बाबाजी महाराज पंडीत,हे हयातभर या शिवमंदिरा सोबत जुळून होते.मात्र एका नवबौधाने स्थापन केलेल्या सगुण विग्रहाने या 'नव्या श्रद्धा मंदीराला' लोक मान्यता मिळाली आहे. मागिल महिन्यात सरसंघचालक मोहन भागवतांनी अमेरीकेत जाऊन,आपल्या देशाची ओळख बुध्दामुळे असल्याचे जाहीर केले होते.त्याच अभियानाचा कदाचित एक भाग म्हणून ते प्रज्ञाचक्षूंच्या या मंदिरात येऊन मूर्ती दात्याच्या ' श्रध्देसमोर' कदाचित बुद्धम शरणम् झाले असावे .

एकसंघ वैदीक हिंदू राष्ट्राची संकल्पना मांडणाऱ्या संघाने बुद्धम शरणम् व्हावे यात फारसे आश्चर्य नाहीच.जात्यांध विचारांना नाकारलेल्या गौतम बुद्धाला विष्णू अवतारात स्थान देवून त्यांनी बुद्ध कधीच स्विकारला आहे.इतकेच नाहीत तर आद्य शंकराचार्यांना, 'प्रश्चन्न बुद्ध' म्हणण्या इतपत त्यांची मजल गेली आहे.

श्रीसंत गुलाबराव महाराज यांना नागपूरच्या दिवंगत डॉ.कृष्ण माधव घटाटे यांनी प्रबंध लिहून व्यापक केले.आपल्या अंगणात पाच फूट बुद्धाची प्रतिमा उभारून पूर्व सरसंघचालक गोळवलकर यांच्या मार्गदर्शनात त्यांनी या प्रबंधाचा प्रपंच केला.

**पंकज आवारे.**
प्रज्ञाचक्षु ज्ञान विज्ञान अभ्यास केंद्र माधान , चांदूरबाजार




# मानधन झाले कालबाह्य; ग्रामीण वार्ताहरांची पत्रकारिता मात्र अजूनही जिवंत!

बातमीच्या प्रत्येक ओळीमागे असते एका ग्रामीण वार्ताहराची धडपड; मात्र त्याच्या श्रमाचे मोल कुठे?एक काळ होता, जेव्हा पत्रकारितेत काम करणाऱ्या ग्रामीण वार्ताहराला मानधन मिळणे ही स्वाभाविक बाब मानली जायची. रक्कम फार मोठी नसायची; मात्र ती रक्कम मानधन होती. आपल्या लेखणीने, वेळेने आणि श्रमाने उभ्या केलेल्या बातम्यांचा मोबदला म्हणून मिळणाऱ्या त्या काहीशा रकमेचा ग्रामीण वार्ताहर अभिमानाने स्वीकार करायचा. कारण त्यामागे पैशापेक्षा आपल्या कामाची संस्थेकडून झालेली दखल महत्त्वाची होती.

सकाळ, पुढारी, लोकमत, लोकसत्ता यांसारख्या राज्यातील प्रमुख दैनिकांच्या गावपातळीवरील वार्ताहरांनाही पूर्वी कमी-अधिक प्रमाणात मानधन मिळत असल्याचे अनेक जुन्या पत्रकारांना आठवते. तालुका प्रतिनिधी किंवा वार्ताहर म्हणून काम करणाऱ्याला संस्थेचा अधिकृत भाग असल्याची भावना होती. बातमी संकलन,लेखन,छायाचित्रण, तहसील-कचेऱ्यांच्या फेऱ्या, पोलीस ठाणे,रुग्णालये,शेतकरी, ग्रामपंचायती, राजकीय घडामोडी, सामाजिक प्रश्न अशा असंख्य विषयांसाठी दिवसभर धावपळ करणाऱ्या वार्ताहराला या श्रमाचे काही ना काही आर्थिक मूल्य मिळत होते.

मात्र काळ बदलला आणि पत्रकारितेचे आर्थिक गणितही बदलले. विशेषतः कोरोना महामारीच्या काळानंतर ग्रामीण वार्ताहरांच्या मानधनाचा प्रश्न अधिकच गंभीर झाला. अनेक ठिकाणी मानधन कमी झाले, काही ठिकाणी बंद झाले आणि काही संस्थांमध्ये मानधन हा शब्दच जणू जुनाट झाल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. आज मोठ्या दैनिकांसाठी काम करणारा ग्रामीण वार्ताहर अनेकदा संस्थेचा प्रतिनिधी असतो; पण त्याच्या श्रमाला नियमित आर्थिक मोबदला मिळतोच असे नाही.

यापेक्षा मोठी विसंगती कोणती असू शकते?बातमी तुमची, वेळ तुमचा, प्रवास तुमचा, मोबाईल तुमचा, इंटरनेट तुमचे; पण मोबदला मात्र कुठेच नाही!

ग्रामीण पत्रकाराला सकाळी घरातून बाहेर पडल्यापासून दिवस कधी संपतो याचा नेम नसतो.अपघात झाला तर घटनास्थळी धावावे लागते. शेतकऱ्यांचा प्रश्न असेल तर बांधावर जावे लागते. आंदोलन असेल तर तेथे उपस्थित राहावे लागते. पोलीस ठाण्यातील माहिती घ्यावी लागते. शासकीय कार्यालयांमध्ये कागदपत्रे तपासावी लागतात. एखाद्या सामाजिक कार्यक्रमाचे वृत्तांकन करायचे असेल तर स्वतःचा वेळ द्यावा लागतो.त्यानंतर बातमी लिहायची, फोटो पाठवायचा आणि ती प्रसिद्ध झाली की पुढच्या बातमीच्या शोधात निघायचे.या सगळ्याला लागणारा प्रवासखर्च, मोबाईलखर्च, इंटरनेट खर्च आणि वेळ याचा हिशेब मात्र कोणाच्या वहीत नोंदवला जात नाही.



उलट काही ठिकाणी ग्रामीण वार्ताहराकडे बातम्यांपेक्षा जाहिरातींच्या अपेक्षेने पाहिले जाते.'संस्थेसाठी किती जाहिराती आणल्या?'हा प्रश्न बातमीच्या गुणवत्तेपेक्षा महत्त्वाचा ठरू लागला तर पत्रकारितेच्या मूळ हेतूलाच धक्का बसतो.

**पत्रकार की जाहिरात प्रतिनिधी?**

ग्रामीण वार्ताहरासमोर आज सर्वात मोठे आव्हान हेच आहे.तो पत्रकार म्हणून काम करतो की जाहिरात संकलक म्हणून? स्थानिक व्यापारी,डॉक्टर,बांधकाम व्यावसायिक, शैक्षणिक संस्था, राजकीय व्यक्ती,सामाजिक संस्था,विविध प्रतिष्ठानांकडे जाहिरातीसाठी पाठपुरावा करणे ही पत्रकाराची जबाबदारी आहे का, असा प्रश्न आता ग्रामीण भागातील अनेक वार्ताहरांना पडतो.

पत्रकाराला बातमी मिळवण्यासाठी स्रोत निर्माण करावे लागतात;मात्र जाहिरातीसाठी प्रत्येक व्यावसायिकाच्या दारात जावे लागले तर पत्रकार आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यातील सीमारेषा पुसली जाते.त्यातच टार्गेटचा दबाव असेल तर परिस्थिती आणखी कठीण होते.

जाहिरात आणली नाही तर नाराजी, जाहिरात कमी झाली तर प्रश्न,टार्गेट पूर्ण झाले नाही तर दबाव आणि तरीही मानधन नाही.ही परिस्थिती ग्रामीण पत्रकारांसाठी अन्यायकारक ठरणारी आहे.

'मानधन मागायचे तरी कसे?'

ग्रामीण पत्रकारांची आणखी एक मोठी अडचण म्हणजे स्वतःच्या श्रमाचा मोबदला मागण्याची मानसिक कुचंबणा.

'मानधन द्या' असे सांगितले तर आपण पैशासाठी पत्रकारिता करतो,असा गैरसमज होईल का? संस्था नाराज होईल का? प्रतिनिधित्व काढून घेतले जाईल का? बातम्यांना कमी महत्त्व मिळेल का? या भीतीमुळे अनेक वार्ताहर आपली व्यथा उघडपणे मांडत नाहीत.

परिणामी पत्रकारिता सुरू राहते;पण पत्रकाराची आर्थिक कोंडी कायम राहते.

ही अवस्था म्हणजे 'बिनपगारी वेठबिगारी आणि त्यावर पत्रकारितेचे लेबल'अशी होऊ नये, एवढीच अपेक्षा.

**उमरखेडसारख्या तालुक्याची एक बोलकी वस्तुस्थिती**

यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेडसारख्या तालुक्यातील पत्रकारिता ही केवळ शहरातील पत्रकारितेइतकी सोपी नाही. विस्तीर्ण ग्रामीण भाग, दूरवरची गावे, शेतीचे प्रश्न, पावसाची अनिश्चितता,पूर-दुष्काळ,अपघात, गुन्हे, आरोग्य, शिक्षण, रस्ते, वीज, पाणी, शासकीय योजनांची अंमलबजावणी अशा असंख्य विषयांवर ग्रामीण पत्रकार सतत काम करत असतो.

याच उमरखेडमध्ये एका दैनिकाला तब्बल दहा वर्षांपासून तालुका प्रतिनिधी मिळू शकलेला नाही,अशी स्थानिक पत्रकार वर्तुळात चर्चा आहे. अनेकांना तालुका प्रतिनिधी होण्याची विनंती करण्यात आली; मात्र त्यांनी ती जबाबदारी स्वीकारण्यास नकार दिल्याचे सांगितले जाते.

**यामागे कारण काय?**

पत्रकारितेची भीती नव्हे, तर जाहिरातींच्या टार्गेटची भीती!

'बातम्या करा, पण त्यासोबत मोठ्या प्रमाणावर जाहिरातीही आणा' अशी अपेक्षा असेल, तर ग्रामीण भागातील अनेक पत्रकार त्या जबाबदारीपासून चार हात लांब राहणे पसंत करतात. कारण बातमी करणे आणि जाहिरात विकणे ही दोन वेगळी कामे आहेत. दोन्ही कामांची जबाबदारी एकाच व्यक्तीवर टाकली आणि त्यातही नियमित आर्थिक मोबदला नसेल, तर ही जबाबदारी स्वीकारायला कोणी तयार न होणे स्वाभाविक आहे.

पत्रकारितेचे मूल्य पैशात नाही; पण पत्रकाराला जगण्यासाठी पैसा लागतो!

पत्रकारिता ही केवळ व्यवसाय नाही, हे मान्य. समाजातील अन्याय, उपेक्षितांचे प्रश्न आणि सामान्य माणसाचा आवाज शासन-प्रशासनापर्यंत पोहोचवणे ही तिची सामाजिक जबाबदारी आहे. मात्र पत्रकाराने ही जबाबदारी पार पाडताना स्वतःच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, हा प्रश्नही तितकाच वास्तव आहे.

पत्रकाराच्या लेखणीला किंमत नसावी, असे म्हणणे योग्य नाही. किंमत म्हणजे बातमी विकणे नव्हे; तर पत्रकाराच्या श्रमाला संस्थात्मक सन्मान आणि योग्य मोबदला देणे होय. मोठ्या दैनिकांच्या प्रसाराचा पाया शहरात असला तरी त्यांचा जनाधार ग्रामीण भागात मजबूत करणारा चेहरा हा गावागावातील वार्ताहरच असतो. त्याच्याकडून बातम्या हव्या असतात, स्थानिक माहिती हवी असते, वाचकांशी संपर्क हवा असतो, संस्थेची उपस्थिती हवी असते; मग त्याच्या श्रमाचे आर्थिक मूल्य मात्र शून्य का?

**प्रश्न एका वार्ताहराचा नाही; संपूर्ण ग्रामीण पत्रकारितेचा आहे!**

आज ग्रामीण भागातील पत्रकारासमोर तीन मूलभूत प्रश्न उभे आहेत.मानधन, जाहिरातींचे टार्गेट आणि संस्थात्मक संरक्षण.

पत्रकाराला बातमीच्या गुणवत्तेवर ओळख मिळावी, जाहिरात संकलनाच्या क्षमतेवर नव्हे. त्याला संस्थेचा प्रतिनिधी म्हणून सन्मान मिळावा, केवळ जाहिरात आणणारा माणूस म्हणून नव्हे. त्याच्या बातमीला महत्त्व मिळावे आणि त्याच्या श्रमाला योग्य मोबदला मिळावा.

कारण ग्रामीण पत्रकार हा कोणाच्या उपकारावर पत्रकारिता करत नाही. तो स्वतःचा वेळ, पैसा आणि श्रम खर्च करून समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडत असतो.आज गरज आहे ती ग्रामीण पत्रकारितेच्या या न बोलल्या जाणाऱ्या व्यथेवर गंभीरपणे विचार करण्याची.

मानधनाची रक्कम मोठी असावी, अशी मागणी नाही; पण 'मानधन' हा शब्दच पत्रकारितेतून हद्दपार होऊ नये, एवढी अपेक्षा आहे.

कारण शेवटी प्रश्न काहीशा पैशांचा नाही.प्रश्न आहे ज्याची लेखणी समाजासाठी झिजते, त्या लेखणीचा सन्मान कोण करणार?

ग्रामीण वार्ताहर आजही बातमीच्या शोधात गावोगाव फिरतो आहे. पावसात, उन्हात, रात्री-अपरात्री घटनास्थळी पोहोचतो आहे. मोबाईलच्या छोट्याशा स्क्रीनवर बातमी लिहून पाठवतो आहे. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात स्वतःची बातमी पाहून समाधान मानतो आहे.पण त्या समाधानावर घर चालत नाही.

पत्रकारितेचा सन्मान हवा असेल, तर ग्रामीण पत्रकाराच्या श्रमाला आर्थिक सन्मान देण्याची वेळ आता आली आहे.अन्यथा उद्याच्या ग्रामीण पत्रकारितेत बातम्या असतील; पण त्या बातम्या गोळा करणारे वार्ताहर मात्र उरणार नाहीत!

**प्रशांत रत्नाकर भागवत,**
उमरखेड,जि,यवतमाळ
मो.९४२२८६७७४८

# आमदार तायडे यांच्या मार्गदर्शनात जयस्तंभच्या राजाची अभूतपूर्व विसर्जन रॅली

## -उंट, घोडे, दिंडी व ढोल ताशा पथक ठरले मुख्य आकर्षण

**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा शहरातील जयस्तंभ चौक येथे आमदार प्रवीण तायडे यांच्या मार्गदर्शनात भाजपाच्या वतीने 'जयस्तंभचा राजा' या गणेशोत्सव मंडळाची स्थापना करण्यात आली होती. १० दिवस चाललेल्या या उत्सवात विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. महाप्रसादाच्या कार्यक्रमानंतर ३० सप्टेंबर रोजी गणपतीची भव्य विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. अचलपूर-परतवाडा जुळ्या शहरात पहिल्यांदाच अशा स्वरूपाच्या वैशिष्ट्यपूर्ण विसर्जन मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत डीजे किंवा ध्वनीप्रदूषण करणाऱ्या यंत्रणांचा अजिबात वापर न करता ढोल-ताशा पथके, उंट, घोडे, पालखी आणि दिंडी अशा पारंपरिक बाबींचा समावेश होता.



गुलालाऐवजी हळदीच्या रंगात न्हाऊन निघालेली ही रॅली अत्यंत भव्य-दिव्य आणि नेत्रदीपक ठरली.या मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी नागरिकांनी अत्यंत श्रद्धाभावाने गणपती बाप्पांचे स्वागत केले. दुराणी चौक येथे आयोजित करण्यात आलेला विशेष शो या मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरला.

कोणताही अवाजवी गोंधळ किंवा कोणाच्याही भावना दुखावणार नाहीत अशा अत्यंत शांततापूर्ण, शिस्तबद्ध आणि श्रद्धामय वातावरणात ही विसर्जन रॅली पार पडली. सर्वधर्म समभावाचे दर्शन घडवणाऱ्या या मिरवणुकीतून परतवाडा शहरात एक सकारात्मक आणि सामाजिक सलोख्याचा वेगळा संदेश दिला गेला. आयोजनाच्या या अनोख्या संकल्पनेचे परिसरातील नागरिकांमधून जोरदार कौतुक होत आहे.

यावेळी भाजपा पक्षाचे नेते प्रमोद कोरडे,गजानन कोल्हे,जिल्हा उपाध्यक्ष विशाल काकड,शहराध्यक्ष कुंदन यादव, तालुकाध्यक्ष शंकर मालखेडे,सुनील चौधरी,प्रफुल बर्वे,नगरसेवक अक्षय पखाले, अतुल वाठ, महेश कडू,अक्षय जनावरे,अक्षय बुंदेले,पुष्कर तिखिले, अविश कडू, कौस्तुभ मुंदे,मयंक शर्मा आदी पदाधिकारी - सदस्य मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

# राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय पोषण माह अंतर्गत व्याख्यान

**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** अतुल विद्या मंदिर, वर्धा संचलित राजर्षी शाहू सायन्स कॉलेज, चांदूर रेल्वे येथे महिला कक्ष आणि राजर्षी शाहू सायन्स व अतुल जगताप ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने नवव्या राष्ट्रीय पोषण माहानिमित्त 'तरुण महिलांसाठी पौष्टिक आहार' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. डिजिटल क्लासरूममध्ये सकाळी ११:३० ते दुपारी १:०० या वेळेत हा कार्यक्रम झाला.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून वनस्पतीशास्त्र विभागाच्या सहाय्यक प्राध्यापक तथा महिला कक्ष समन्वयक प्रा. डॉ. संपदा पी. पाथरकर यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. महाविद्यालयीन वयातील मुली आणि प्राध्यापिकांसाठी संतुलित आहाराचे महत्त्व, अशक्तपणा (ॲनिमिया) टाळण्याचे उपाय, मासिक पाळीदरम्यानचा आहार, अभ्यास व खेळासाठी आवश्यक ऊर्जा, त्वचा आणि केसांचे आरोग्य तसेच वसतिगृहात कमी खर्चात पौष्टिक आहार घेण्याचे मार्ग त्यांनी समजावून सांगितले.

स्थानिक तृणधान्ये, रागी, पालेभाज्या, मोड आलेली कडधान्ये, दूध आणि फळांचे महत्त्व सांगताना त्यांनी मिलेट्स, मायक्रोग्रीन्स, अंकुरित कडधान्ये आणि विविध फळांचे प्रात्यक्षिकही दाखवले. परीक्षा किंवा अभ्यासाच्या काळात कॉफिनयुक्त पदार्थाऐवजी नैसर्गिक पदार्थांचा वापर करण्याचा सल्ला त्यांनी दिला. मासिक पाळीदरम्यान कोणते व्यायाम करता येतात, याबाबतही माहिती दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. वडनेरकर होते. फास्ट फूड टाळून पारंपरिक आणि पौष्टिक आहार घेण्याचे



आवाहन त्यांनी विद्यार्थिनींना केले. आपण घेत असलेला दैनंदिन आहार आपल्या वागण्यातूनही दिसून येतो, असेही ते म्हणाले.

यावेळी IQAC समन्वयक प्रा. एस. ए. वाणी, महिला कक्षाच्या सहसमन्वयिका प्रा. डॉ. केने, प्रा. डॉ. भगत , प्रा. हांडे , प्रा. बेलसरे , प्रा. सरोसरे आणि प्रा. रोंघे उपस्थित होत्या . सखी सावित्री समितीच्या समन्वयिका प्रा. सोनू देशमुख आणि प्रा. देशमुख यांनी कार्यक्रमाचे आयोजन व प्रास्ताविक केले. बी.एस्सी. भाग २ ची विद्यार्थिनी मुक्ती वानखडे हिने सूत्रसंचालन केले, तर दीक्षा डोंगरे हिने आभार मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद आणि १०० हून अधिक विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

**NAME CHANGE**

OLD NAME
ABDUL HAFIZ
NEW NAME
ABDUL HAFEEZ
ABDUL MAJEED

ADRESS
KAZI PURA CHANDUR
BAZAR
PASSPORT NO. F2727952

**फ्लॅट विकणे आहे**

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९
९४२२१२०४०६**

# तडीपार आरोपी ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** तडीपार आदेश लागू असतानाही शहराच्या हद्दीत प्रवेश करून वावरत असल्याची माहिती मिळाल्यानंतर फ्रेजरपुरा पोलिसांच्या पथकाने एका व्यक्तीला ताब्यात घेतले. त्याच्याकडे शहरात येण्याची कोणतीही परवानगी नसल्याचे चौकशीत समोर आल्यानंतर महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिस उपनिरीक्षक मिलिंद राजाराम हिवरे हे पथकासह वरिष्ठांच्या आदेशानुसार अँटी गुंडा स्कॉडअंतर्गत पाहिजे गुन्हेगार तसेच तडीपार व्यक्तींची तपासणी करीत होते. याचदरम्यान पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे डेंटल कॉलेज रोडवरील क्रीडा प्रबोधिनी परिसरात पाहणी करण्यात आली. पोलिसांच्या पथकाला तेथे इरशाद खान युसुफ खान (वय २९, रा. हैदरपुरा, ईदगाह गेट, अमरावती) आढळून आला. त्याच्याकडे चौकशी करून शहरात वावरण्यासंदर्भातील परवानगीबाबत विचारणा करण्यात आली.

मात्र, त्याच्याकडे कोणतीही परवानगी नसल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाल्याचे नमूद आहे. पोलिस उपायुक्त, परिमंडळ-१ यांच्या आदेशानुसार इरशाद खान याला तडीपार करण्यात आले असल्याचे पोलिसांनी सांगितले. तडीपार आदेश अस्तित्वात असताना संबंधित व्यक्तीने परवानगीशिवाय शहरात प्रवेश केल्याने हा आदेशाचा भंग असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# कुंभार समाजातील गुणवंत विद्यार्थी व समाज बांधवांचा सत्कार

## -गोरोबा भवनासाठी सौर ऊर्जा प्रकल्प व विद्यार्थी वसतिगृहासाठी नझुलची जागा देणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** दरवर्षी प्रमाणे यंदाही कुंभार समाजातील दहावी, बारावी, पदवी, पदविका, पदव्युत्तर,कला क्रीडा मध्ये निपुण गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील समाज बांधवांचा भव्य सत्कार सोहळा श्री संत गोरोबा काका भवन शशी नगर बडनेरा रोड अमरावती येथे मोठ्या थाटात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे अध्यक्ष सुधाकर शेंडोकार तर प्रमुख पाहुणे म्हणून बडनेरा मतदार संघाचे आमदार रवि राणा, भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष तथा वर्धा जिल्हा भाजपा चे जिल्हाध्यक्ष संजय गाते, सकल कुंभार समितीचे प्रदेश सरचिटणीस सुभाष तेटवार, दर्यापूर नगरपरिषदेचे नगरसेवक तथा गटनेता प्रदीप मलिये, उद्योजक तथा समाज सेवक व संत गोरोबा काका बहुउद्देशीय समिती दर्यापूर





चे सचिव अरुण चोंडके, विदर्भ कुंभार समाज सुधार समिती चे माजी अध्यक्ष पंजाबराव काकडे,डॉ संजय साळीवकर, देविदास काळकर, देविदास धामणकर, वर्धा जिल्ह्याचे वसंतराव जवळेकर, सचिन इंगळे भाजपा जिल्हाध्यक्ष(ग्रामीण) समाजोन्नती समितीचे अध्यक्ष सुरेशराव नांदुरकर, सचिव डॉ श्रीराम कोल्हे, गोरोबा काका नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष भगवान जामकर, सचिव अरुणराव पोहनकर, महिला अध्यक्ष प्रभा भागवत, अकोल्याचे समाज प्रतिनिधी प्रा.दिलीप अप्तुरकर, प्रकाश चांदुरकर, पुंडलिक वनकर, रामचंद्र मेहरे, रमेश वनकर, संतोषराव सरोदे, समाज सेवक रामभाऊ खानापुरे, यवतमाळ चे प्रतिनिधी के.एन.मोरे विदर्भातील व विदर्भाबाहेरील अनेक जिल्ह्यांतील समाज प्रतिनिधी गुणवंत विद्यार्थी, त्यांचे पालक व नातेवाईक या सर्वांची उपस्थिती लक्षणीय होती.

या प्रसंगी विद्यार्थी व समाज बांधवांचा सत्कार करण्यात आला तसेच अध्यक्ष, प्रमुख पाहुणे व प्रतिनिधींची समायोजित भाषणे देखील झाली. समिती ने यावर्षी प्रथमच जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय घेतला. यावर्षी चा पुरस्कार समाजातील वयोवृद्ध समाज सेवक मारोतरावजी खंडूजी शेंडोकार रा. अकोट व देविदास सोनाजी काळकर रा.अमरावती यांना आमदार रवि राणा व समाज बांधवांचे हस्ते प्रदान करण्यात आला. प्रदीपभाऊ मलिये नगरसेवक, नगर परिषद दर्यापूर यांचा समाज गौरव पुरस्काराने सन्मान प्रदीपभाऊ मलिये यांचा त्यांच्या राजकीय क्षेत्रातील नेत्रदीपक उपलब्धी करिता आमदार रवि राणा यांनी समाज गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले. त्यासोबतच समाजातील सामाजिक राजकीय मान्यवरांना समाज गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. आपल्या प्रास्ताविकात संस्थेचे सचिव सुरेन्द्र सरोदे यांनी संस्थेच्या कार्याची वाटचाल व प्रगती या विषयी समाजास मार्गदर्शन केले. समितीचे उपाध्यक्ष ॲड गजाननराव तांबटकर, सहसचिव मधुकरराव खांडेकर, जिल्हाध्यक्ष सुनील भागवत, युवानेते रमेश अंबुलकर, अरुणराव पोहनकर, महिला अध्यक्ष प्रभा भागवत, निर्मला नांदुरकर , विनायकराव तायडे, राजेंद्रजु भागवत, विनोदराव मेहरे, नंदुभाऊ काकडे, नंदुभाऊ काळकर, नंदुभाऊ नांदूकर, मोहनराव नांदुरकर, विलासराव धामणकर, सुनील काळकर, राजेंद्रजी नांदुरकर, केशवराव मदनकर, अरविंदराव चोंडके, रवि काकडे, विनोदराव काकडे, राजेंद्रजी मांगुळकर, संजयराव शेंडोकार, रमेशराव गावंडे, रमेशराव अंबुलकर, देवाभाऊ काळबांडे, इंजि. सारंग गावंडे, विलासराव मेहरे , दिलीप खांडेकर,विलासराव नांदुरकर, गजाननराव काकडे, गजाननराव माहुलकर, नितीन घाटोळे, रामेश्वरराव वडुरकर, सोबतच सर्व महिला मंडळ पदाधिकारी संगिता साळीवकर, सविता कोल्हे, मंदा काळे, नंदा पोहनकर, सुषमा काळकर, सुषमा काकडे, निता धामणकर, सविता काकडे, सुषमा काकडे, वैशाली सरोदे, अनेक महिला व समाज बांधवांच्या सहकार्याने हा गुणगौरव कार्यक्रम संपन्न झाला. शेवटी समितीचे उपाध्यक्ष ॲड गजाननराव तांबटकर यांनी सर्व पाहुण्यांचे व उपस्थितांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.

## सार्वजनिक जाहीर नोटीस

(मृत्यूपत्र / Will बाबत हरकत व दावा आमंत्रित करणेबाबत )

सर्व संबंधित व्यक्ती, वारस, कायदेशिर वारसदार, हितसंबंधी, हक्कदार, दावेदार तसेच सर्वसामान्य जनतेस या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की,

**श्रीमती देंवांगणा ओंकार राक्षसकर,** वय अंदाजे ८९ वर्षे, व्यवसाय- गृहिणी, रा.मुलताई रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, महाराष्ट्र यांनी त्यांच्या स्वेच्छेने, शुध्द व स्थिर मनःस्थितीत, कोणत्याही प्रकारचा दबाव, प्रलोभन, फसवणुक अथवा अनुचित प्रभाव नसतांना, त्यांच्या स्वमालकीच्या व स्व-अधिकारातील चल-अचल मालमत्तेबाबत मृत्यूपत्र **(LAST WILL AND TESTAMENT)** करुन ठेवले होते.

सदर मृत्यूपत्र हे दिनांक २९/०८/२०२४ रोजी मुद्रांकित/नोटरीकृत करण्यात आले असून, त्यामध्ये मृत्यूपत्रकर्तीने आपल्या मालमत्तेबाबत तसेच आपल्या मुला-मुलींबाबत स्पष्ट ईच्छा व अंतिम निर्देश नमूद केलेले आहे. सदर मृत्यूपत्रावर साक्षीदारांच्या स्वाक्ष-या असून ते मृत्यूपत्रकर्तीच्या अंतिम इच्छेने दस्तऐवज आहे. सदर श्रीमती देवांगणा ओंकार राक्षसकर यांचे दिनांक २९/०९/२०२४ रोजी निधन अमरावती येथे झाले आहे. त्यांच्या निधनानंतर सदर मृत्यूपत्राची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर मृत्यूपत्रामध्ये मृत्यूपत्रकर्तीने आपल्या कुटुंबातील व्यक्तीचा उल्लेख करुन, आपल्या मालकीच्या व ताब्यातील मालमत्तेबाबत अंतिम इच्छापत्र केले आहे. मृत्यूपत्रातील तरतुदीनुसार संबंधित मालमत्ता श्री सदानंद ओंकार राक्षसकर यांचेकडे देण्याबाबत/ त्यांच्या नावे करण्याबाबत मृत्यूपत्रकर्तीने आपली स्पष्ट इच्छा व्यक्त केलेली आहे. सदर मृत्यूपत्रामध्ये **मालमत्ता १) अमरावती जिल्हयातील मौजे राजुरा, प्रगणे- मांजरखेड, ता.जि.अमरावती येथील शेत सर्वे नं. ४२/१/अ पार्ट मधील जमिनीतील वी.तहसिलदार साहेब, अमरावती यांचे फाईलावरील रे.के.नं.एन.ए.पी.ए.३४/राजुरा-५१/९८-९९, नि.ता.११/०१/१९९९ नुसार कन्वर्शन मंजुर झालेल्या जागेतील प्लॉट नं. ६७, आकार ९ मीटर X ११ मीटर एकूण क्षेत्रफळ १६२ चौरस मीटर (१७४४ चौ.फुट) ज्याची चर्तुसिमा :- पूर्वेस- प्लॉट नं.६६, पश्चिमेस- प्लॉट नं. ६८, उत्तरेस- दुस-याचे लेआउट आणि दक्षिणेस रोड आहे, मालमत्ता २)- जिल्हयातील मौजे राजुरा, प्रगणे- मांजरखेड, ता.जि.अमरावती येथील शेत सर्वे नं.३५ पार्ट मधील (२ हे ०२ आर) जमिनीतील वी.तहसिलदार साहेब, अमरावती यांचे फाईलावरील रे.के.नं.एन.ए.पी.ए.३४/राजुरा-१५/९७-९८, नि.ता.१३/०५/१९९८ नुसार कन्वर्शन मंजुर झालेल्या जागेतील प्लॉट नं. ०८, आकार १० मीटर X १७ मीटर एकूण क्षेत्रफळ १७० चौरस मीटर (१८२९ चौ.फुट) ज्याची चर्तुसिमा :- पूर्वेस- कॅब्रिज स्कूल,पश्चिमेस- सेंट जॉर्ज स्कूल, उत्तरेस- मार्डी रोड, आणि दक्षिणेस शिक्षक कॉलनी आहे.** परिसरातील जमीन/प्लॉट तसेच घर/प्लॉट संबंधी मालमत्तेचा उल्लेख करण्यात आलेला असून, सदर मालमत्तेबाबत मृत्यूपत्रकर्तीने आपला हक्क व अधिकार वापरुन मृत्यूपत्राव्दारे अंतिम विनियोग केला आहे.

त्यामुळे सदर मालमत्ता, मृत्यूपत्र अथवा त्या अनुषंगाने करण्यात येणा-या कोणत्याही व्यवहारावर कोणत्याही व्यक्तीचा मालकी हक्क, वारसा हक्क, हिस्सा, ताबा, गहाण, बोजा, विक्री हक्क, हस्तांतरणाचा हक्क, न्यायालयीन दावा किंवा अन्य कोणताही कायदेशिर/न्याय हक्क अथवा स्वारस्य असल्यास, त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाच्या आंत खाली सही करणा-या अधिवक्त्यांकडे त्याबाबतची लेखी हरकत, दावा किंवा आक्षेप, त्यास समर्थन करणा-या मुळ/प्रमाणित कागदपत्रांसह सादर करावा.

निर्धारित मुदतीमध्ये कोणत्याही व्यक्तीकडून कोणतीही हरकत अथवा दावा प्राप्त न झाल्यास, सदर मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्तीचा कोणताही दावा,हक्क, हिस्सा, आक्षेप, किंवा स्वारस्य नाही असे गृहीत धरुन, मृत्यूपत्रातील तरतुदीनुसार पुढील कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त होणा-या कोणत्याही हरकती, दाव्याची जबाबदारी संबंधित दावेदाराची राहील व त्या बाबत मृत्यूपत्राचा लाभार्थी/हक्कदारावर कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

ही जाहीर नोटीस मृत्यूपत्रकातील हक्क व मालमत्तेबाबत सर्व संबंधित व्यक्तीना सार्वजनिक सूचना देण्यासाठी प्रसिध्द करण्यात येत आहे.

मृत्यूपत्रकर्ती :- श्रीमती देवांगणा ओंकार राक्षसकर, मृत्यू- २९/०९/२०२४

मृत्यूपत्रातील प्रमुख लाभार्थी :- श्री सदानंद ओंकार राक्षसकर

रा.अर्जुन नगर, मोर्शी रोड, मेडिकल कॉलनी, शिवाजी नगर, अमरावती

हरकत/दावा सादर करण्याची मुदत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत.

**ठिकाण :- अमरावती**
**दिनांक :- ०३/१०/२०२६**

**राजकुमार नामदेवराव थोरात (Advocate)**
**District & Sessions Court, Nagpur**
**मो.- ७८७५०१०६१२**

**MAHAVITARAN** — **E-Tender Notice**

The e-tender dully filled in and digitally signed are invited from eligible/Registered and authorized reputed firm/contractor for the following works as per specification given below for MSEDCL, Urban Dn. Amravati. Tender No. T-07 for Tender for the work of Sub-division wise e-Tenders for meter Reading, Bill Printing and Bill Distribution for LT consumers up to-20KW under O&M Urban Sub-Division I for Tender amount is Rs. 124.02 Lakh. Tender No.T-08 for Sub-division wise e-Tenders for meter Reading, Bill Printing and Bill Distribution for LT consumers up to-20KW under O&M Urban Sub-Division II for Tender amount is Rs. 87.43 Lakh. The tender fee details/documents are available at our website https://etender.mahadiscom.in/eatApp/ w.e.f to 01.10.2026 to 07.10.2026

PRO. 199/2026

EXECUTIVE ENGINEER,
URBAN DIVISION, AMRAVATI.

**MAHAVITARAN** — **E-Tender Notice**

The e-tender dully filled in and digitally signed are invited from eligible/Registered and authorized reputed firm/contractor for the following works as per specification given below for MSEDCL, Urban Dn. Amravati. Tender No.T-09 for Sub-division wise e-Tenders for meter Reading, Bill Printing and Bill Distribution for LT consumers up to-20KW under O&M Urban Sub-Division III forTender amount is Rs.142.75Lakh. The tender fee details/documents are available at our website https://etender.mahadiscom.in/eatApp/ w.e.f to 01.10.2026 to 07.10.2026

PRO. 200/2026

EXECUTIVE ENGINEER,
URBAN DIVISION, AMRAVATI.

## जाहीर नोटीस

प्रोसेस क्र. ४९३३/२०२६

अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधिश- ७,यांचे न्यायालय

नियमित दिवाणी अर्ज क्र.१११/२०२३ — ने.ता. १९/१०/२०२६

**Applicant :- Anil Vitthalrao Thakare**
**---V/s----**
**Non-applicant:- Prashant Bharatkumar Mishra**

**बनाम :** **प्रशांत भरतकुमार मिश्रा**
शांती मेडिकलच्या बाजुच्या बिल्डीगमध्ये
तिसरा माळा, महाराष्ट्र बॅक जवळ, रुख्मीणी नगर चौक, अमरावती

**APPLICATION FOR SUBSTITUTED SERVICE UNDER ORDER 5 RULE 20 OF CIVIL PROCEDURE CODE, 1908**

ज्याअर्थी वरील अर्जदार **अनिल विठठलराव ठाकरे** यांनी वि.जिल्हा व सत्र न्यायाधिश-७, अमरावती यांच्या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी वरिल गैरअर्जदार प्रशांत भरतकुमार मिश्रा यांना वारंवार नोटीस देवुनही न्यायालयात हजर राहत नसल्यामुळे त्यांना पेपर प्रसिध्दीव्दारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी अपिलाच्या सुनावणी साठी दिनांक **१९/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता **वि.जिल्हा व सत्र न्यायाधिश-७, अमरावती** यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे वर नमुद तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०१.१०.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाचे शिक्कयानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

अमरावती
दिनांक ०१.१०.२०२६

शिक्का

**आदेशानुसार,**
**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक, (न्यायिक विभाग)**
**जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

## जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

आर.एम.जे.सी.क्र.४४८/२०२६ — ने.ता.१५.१०.२०२६

**अर्जदार :** १. **विनोद श्रावणजी मालखेडे,** वय ५१ वर्षे, व्यवसाय-मजूरी
रा.चौधरी पुरा, गडीपूरा, वार्ड क्र.२, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** १. **सुरेश श्रावणजी मालखेडे,** वय ६१ वर्षे, व्यवसाय- मजूरी
२. **बाळू श्रावणजी मालखेडे,** वय ५६ वर्षे, व्यवसाय - मजूरी
३. **माला वासुदेव वाजगे,** वय ५८ वर्षे, व्यवसाय-घरकाम
रा.परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती
४. **मिना दादाराव ताजणे,** वय ५३ वर्षे, व्यवसाय-घरकाम
रा.पथ्रोट, ता.अचलपूर, जि.अमरावती
५. **राजू श्रावणजी मालखेडे,** वय ५० वर्षे, व्यवसाय-मजूरी
अर्जदार क्र.१,२ व ५ रा.चौधरी पुरा, वार्ड क्र.२, करजगांव,
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार व गैरअर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक रमाबाई श्रावणजी मालखेडे** यांचा **मृत्यू दि.०३/०१/२०२३** रोजी रा.करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे तसेच **मृतक श्रावणजी मारोतराव मालखेडे** यांचा **मृत्यू दि.०३/१२/२०१६** रोजी व **मृतक बेबीताई श्रावणजी मालखेडे उर्फ बेबीताई रमेश पानझाडे** हिचा **मृत्यू दि.१८/०७/२०२०** रोजी झालेला आहे.

त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार व गैरअर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार व गैरअर्जदारांना मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे.त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.४४८/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना तसेच गैरअर्जदाराला वारसाचे प्रमााणपत्र देण्यात येईल.

आज दि.२९.०९.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

## सायटेशन/जाहीरनामा

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.५५२/२०२६ — ने.ता.०९.१०.२०२६

**अर्जदार -** १. **श्रीमती अर्चना दिवाकरराव लेकुरवाडे,** वय ५१ वर्षे, धंदा - घरकाम
२. **श्री. दर्शन दिवाकरराव लेकुरवाडे,** वय २८ वर्षे, धंदा - शेती
३. **श्री अनुप दिवाकरराव लेकुरवाडे,** वय २५ वर्षे, धंदा - शेती
तिघेही रा.माळीपुरा, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदार नं.१चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे वडिल नामे **दिवाकर पुंडलिक लेकुरवाडे** हे **दिनांक ०४/०८/२०२५** रोजी **Morshi, Tq. Morshi, Dist. Amravati** येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- ०३/१०/२०२६**

शिक्का

आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

आम जनतेला सुचित करण्यात येते की, **हेमा विजय कोठेकर, रा.स्वस्तीक नगर, अमरावती, ता.जि.अमरावती** यांनी त्यांचे मालकीचे व ताब्यातील खालील वर्णनांकित मिळकत विकण्याचा सौदा केलेला असून सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :-

नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर कचेरीचे कक्षेतील व मनपा अमरावती चे हददीतील मौजे बडनेरा, प्रगणे- बडनेरा, ता.जि.अमरावती, येथील शेत सर्वे नं.३०४/१, ३०४/२, ३०५/१ मधील १ हे ५३.५० आर मधील लेआउट कन्व्हर्शन मंजूर प्लॉट क्र.९३ स्वतःचे मालकीचा ज्याचे क्षेत्रफळ ६८.३७ चौ.मी. (७३५.९३ चौ.फुट) विकण्याचा सौदा केलेला असून सदर प्लॉट वर काही कर्ज, गहाण बॅकेचे कर्ज, गहान, बोजा, ताबा, हक्कसंबंध, हितसंबंध, वारसा हक्क, सरकारी कर्ज, सावकारी कर्ज बॅक व सोसायटीचे कोणत्याही प्रकारचे कर्ज असल्यास, खालील पत्यावर त्वरित संपर्क करावा. त्यानंतर कोणाचाही उजर चालणार नाही.

करिता सदरची जाहीर नोटीस.

दिनांक : ०३/१०/२०२६

**सही/-**
**ॲड. प्रफुल्ल भी वाहणे**
**रा.पळसमंडळ, ता.नांदगाव खंडेश्वर**
**जि.अमरावती**
**मो.- ९०८२८६१३२८**

## जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

आर.एम.जे.सी.क्र.४५०/२०२६ — ने.ता.१५.१०.२०२६

**अर्जदार :** १. **विनोद श्रावणजी मालखेडे,** वय ५१ वर्षे, व्यवसाय-मजूरी
रा.चौधरी पुरा, गडीपूरा, वार्ड क्र.२, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** १. **सुरेश श्रावणजी मालखेडे,** वय ६१ वर्षे, व्यवसाय- मजूरी
२. **बाळू श्रावणजी मालखेडे,** वय ५६ वर्षे, व्यवसाय - मजूरी
३. **माला वासुदेव वाजगे,** वय ५८ वर्षे, व्यवसाय-घरकाम
रा.परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती
४. **मिना दादाराव ताजणे,** वय ५३ वर्षे, व्यवसाय-घरकाम
रा.पथ्रोट, ता.अचलपूर, जि.अमरावती
५. **राजू श्रावणजी मालखेडे,** वय ५० वर्षे, व्यवसाय-मजूरी
अर्जदार क्र.१,२ व ५ रा.चौधरी पुरा, गडीपूरा, वार्ड क्र.२, करजगांव,
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार व गैरअर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक रमाबाई श्रावणजी मालखेडे** यांचा **मृत्यू दि.०३/०१/२०२३** रोजी रा.करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे तसेच **मृतक श्रावणजी मारोतराव मालखेडे** यांचा **मृत्यू दि.०३/१२/२०१६** रोजी व **मृतक बेबीताई श्रावणजी मालखेडे उर्फ बेबीताई रमेश पानझाडे** हिचा **मृत्यू दि.१८/०७/२०२०** रोजी झालेला आहे.

त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार व गैरअर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार व गैरअर्जदारांना मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे.त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.४५०/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना तसेच गैरअर्जदाराला वारसाचे प्रमााणपत्र देण्यात येईल.

आज दि.२१.०९.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ३०**
**आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025**

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# सरकारी शाळा वाचवण्यासाठी उदयापासून बेमूदत धरणे

## महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून हजारो आंदोलक सोमवारी आझाद मैदानावर धडकणार; शाळा वाचवा, शिक्षण वाचवा मंचाचा निर्धार

**अमरावती/का.प्र**

सरकारी व अनुदानित शाळा वाचवण्यासाठी तसेच शिक्षणाचे खाजगीकरण थांबविण्याच्या मागणीसाठी सोमवार,५ ऑक्टोबर पासून मुंबईतील आझाद मैदान येथे बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून पालक, विद्यार्थी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी तसेच शिक्षक मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी होणार असल्याची माहिती शाळा वाचवा, शिक्षण वाचवा मंचाचे निमंत्रक कॉ. संपत देसाई, संजय वेतुरेकर आणि सिद्धार्थ जगदेव यांनी दिली.

शिक्षण हक्क कायद्यामुळे प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला आहे. या कायद्यात शाळांसाठी आवश्यक असलेल्या भौतिक सुविधांचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. शिक्षकनिहाय वर्गखोल्या, मुख्याध्यापकांसाठी स्वतंत्र कक्ष, स्वच्छ पिण्याचे पाणी, मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे, खेळाचे मैदान व साहित्य, वाचनालय, सुरक्षा भिंत, धान्य साठवणुकीची व्यवस्था, डिजिटल साधने आदी सुविधांचा त्यात समावेश आहे.

**नवीन शैक्षणिक धोरणावरही आक्षेप**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील सरकारी प्राथमिक आणि अनुदानित माध्यमिक शाळांवर परिणाम होण्याची शक्यता असल्याचा दावा मंचाने केला आहे. या धोरणामुळे मोठ्या प्रमाणात शाळा व महाविद्यालये बंद होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षणाच्या प्रवाहात आलेल्या दलित, आदिवासी, बहुजन, कष्टकरी, भटके-विमुक्त आणि मुस्लिम अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांवर त्याचा परिणाम होऊ शकतो, असे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

भारतीय संविधानातील सातव्या अनुसूचीनुसार शिक्षणाचा विषय समवर्ती सूचीत आहे. तसेच ८६व्या घटनादुरुस्तीद्वारे अनुच्छेद २१-अ अंतर्गत ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे विविध कारणे देऊन शाळा बंद करण्याचे निर्णय या घटनात्मक अधिकाराच्या उद्देशाशी विसंगत असल्याचा दावा मंचाने केला आहे.

**राज्याचे स्वतंत्र शिक्षण धोरण करण्याची मागणी**

शाळा बंद होण्याच्या प्रश्नाच्या मुळाशी नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण असल्याचा दावा करत महाराष्ट्राने या धोरणाचा पुनर्विचार करून राज्यासाठी स्वतंत्र शिक्षण धोरण तयार करावे आणि सार्वजनिक शिक्षण व्यवस्था अधिक बळकट करावी, अशी मागणी मंचाने केली आहे.हे आंदोलन केवळ शाळा बंद करण्याच्या प्रश्नापुरते मर्यादित नसून महाराष्ट्राच्या भविष्यातील शिक्षण धोरणाबाबतचे आंदोलन असल्याचे मंचाने स्पष्ट केले आहे. ५ ऑक्टोबर पासून आझाद मैदान येथे सुरू होणारे बेमुदत धरणे आंदोलन सरकारने मागण्यांबाबत निर्णय घेईपर्यंत सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

आंदोलनातील काही मागण्या करण्यात आल्या आहे.कमी पटसंख्येचे कारण देऊन कोणतीही शाळा बंद करू नये.गाव, वाडी, वस्ती आणि नगर येथे शाळा उपलब्ध असावी.प्रत्येक शाळेत, प्रत्येक वर्गासाठी आणि प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र शिक्षक असावेत. दि. १५ मार्च २०२४ रोजीचा संचमान्यतेचा आदेश रद्द करावा. केजी ते पीजीपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण उपलब्ध करून द्यावे.शिक्षणावरील खर्च जीडीपीच्या १० टक्क्यांपर्यंत करावा. सार्वजनिक शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम व गुणवत्तापूर्ण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात.

या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयफेटोचे राष्ट्रीय महासचिव सुधाकर सावंत यांनी केले आहे. या प्रसिद्धीपत्रकावर निमंत्रक कॉ. संपत देसाई, संजय वेतुरेकर, सिद्धार्थ जगदेव, दीप्ती शेलार, तुषार सूर्यवंशी, रोहिदास जाधव, वैभव चोपकर, डायना महाकाल, कमलेश उबाळे, संयुक्ता जाधव, अनिकेत सोनवणे, दक्षता गंधे, प्रकाश रणसिंग आणि दत्ता ढगे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संक्षिप्त



### स्केटिंग स्पर्धेत अन्वी शिंगाणेचे उल्लेखनीय यश!

**अमरावती-**पी.आर.पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल, अमरावतीच्या इयत्ता चवथीमध्ये शिकणारी विद्यार्थिनी अन्वी शिंगाणे हिने जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून शाळेचे नाव उज्वल केले आहे. या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर अन्वीची विभागीय स्तरावरील शालेय स्केटिंग चॅम्पियनशिपसाठी निवड झाली आहे.तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक सचिन दुर्गे,उपमुख्याध्यापिका सोनल निस्ताने तसेच क्रीडा विभागाने तिचे अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.



### महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात

**अंजनगाव बारी-**येथील जनता विद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य गजेंद्र अवघड होते. प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षिका मनिषा चिंचोळकर व शिक्षक प्रतिनिधी मनिषा भगत उपस्थित होत्या. मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. यावेळी मनिषा चिंचोळकर यांनी दोन्ही महान नेत्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. प्राचार्य गजेंद्र अवघड यांनी मार्गदर्शन करताना महात्मा गांधींचे प्रिय भजन 'वैष्णव जन तो तेणे कहिए जे...' सादर करून उपस्थितांची मने जिंकली.जयंतीनिमित्त विद्यालय परिसरात विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले.कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन अमोल डवरे यांनी केले. यावेळी शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये गांधी, शास्त्री जयंती

**अमरावती-**पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करून उत्साहात जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री तसेच स्वातंत्र्यसैनिकांच्या वेशभूषा सादर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांच्या मनमोहक वेशभूषा, भाषणे आणि सांस्कृतिक सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.महात्मा गांधींचा सत्य, अहिंसा व स्वच्छतेचा संदेश तसेच लालबहादूर शास्त्री यांचा 'जय जवान, जय किसान' हा प्रेरणादायी विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना देशप्रेम, स्वच्छता, साधेपणा आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणा मिळाली.या कार्यक्रमासाठी शाळेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले.

## तिवसा येथे भाकपच्या वतीने सद्भावना दिवस

**तिवसा-** भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या (भाकप) वतीने तिवसा येथील ग्रामपंचायत कार्यालयात (जुनी) महात्मा ज्योतिबा फुले यांची द्विशताब्दी जयंती, महात्मा गांधी जयंती आणि संविधान जागर यानिमित्त सांयुक्त सद्भावना कार्यक्रम घेण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजाभाऊ बाभुळकर होते. कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य किसान सभेचे नेते प्रा. विजय रोडगे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. शाहीर कॉ. धम्मा खडसे यांनी क्रांतीगीतांच्या माध्यमातून जनप्रबोधन केले. यावेळी प्रा. रोडगे यांनी महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास, बाभुळकर यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस,तर शाहीर धम्मा खडसे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. चंद्रकांत वडस्कर यांनी प्रास्ताविक केले. भाकपचे तिवसा तालुका सचिव प्रकाश सोनोणे यांनी आपल्या भाषणातून देशातील सद्य राजकीय व सामाजिक परिस्थितीवर भाष्य केले. भ्रष्टाचारमुक्त भारत,रोजगार,कामगारांना योग्य मोबदला,सुरक्षित कार्यस्थळे तसेच शेतमालाला योग्य भाव आणि शेतीसाठी आवश्यक खते व कीडनाशकांच्या किमतींवर नियंत्रण याबाबत त्यांनी भूमिका मांडली. प्रमुख मार्गदर्शक प्रा. विजय रोडगे यांनी ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्या समतेच्या विचारांचा आढावा घेतला.तसेच १९७८ आणि २०२६ मधील दुष्काळाच्या संदर्भात मानवी हस्तक्षेपामुळे निसर्गावर होत असलेल्या परिणामांवर प्रकाश टाकला.कार्यक्रमाचे संचालन मनोहर वाढणकर यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंबादास जुवारे, श्रीकृष्ण लांजेवार, दिलीप गोहत्रे,जितेंद्र कोरडे,अनिल मुदाने,सुरेश घावडे,अशोक काळे,अनिल पोजगे,कळसकर, माला जिरापुरे,निरंजन बेले,गजानन बावणे,नुर अल्लीशहा,देवेंद्र बावणे, किसन आप्पा, मंजू, गजानन खुरसडे, नरेंद्र बावणे आदींनी सहकार्य केले.

## टायटन्स पब्लिक स्कूलची बास्केटबॉलमध्ये विभागीय स्तरावर

**अंजनगाव बारी-**जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने १९ वर्षांखालील मुलांच्या जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रीडांगणावर करण्यात आले होते. विजयात पारस विटाळकर, नैतिक देशमुख, राज चौखंडे, हरतेज मथारू, दीप जेना, यश पळसपगार, आराध्य धोटे, अर्चित खंडार आणि अमेय गायकी यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली.संघाला शाळेचे क्रीडा प्रशिक्षक तथा बास्केटबॉल कोच निलेश फुलंबरकर यांचे मार्गदर्शन लाभले. आता टायटन्स पब्लिक स्कूलचा संघ ६ ऑक्टोबर रोजी यवतमाळ येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेत अमरावती विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे.या यशाबद्दल विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष नितीन धांडे, उपाध्यक्ष उदय देशमुख, सचिव युवराज सिंग चौधरी, कोषाध्यक्ष हेमंत देशमुख तसेच सदस्य नितीन हिवसे, विनय गोहाड, गजानन काळे व पूनम चौधरी यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. शाळेचे प्राचार्य अजय चौबे यांनीही विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे कौतुक केले. शाळा प्रशासन, क्रीडा शिक्षक व पालकांकडून विजयी संघाचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## सेंट्रल बँक रिटायर्ड ऑफिसर्स असोसिएशन युनिटचा आज त्रैवार्षिक मेळावा

### पेन्शन अद्ययावतकरण, मेडिकल पॉलिसी, ज्येष्ठ सदस्यांचा सत्कार आणि नवीन कार्यकारिणीची निवड

**नागपूर-**सेंट्रल बँक रिटायर्ड ऑफिसर्स असोसिएशन (CBROA), नागपूर युनिटचा चौथा त्रैवार्षिक जनरल बॉडी कॉन्फरन्स (जीबीसी) रविवार, ४ ऑक्टोबर रोजी नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. त्रिमूर्ती नगर येथील श्री गजानन महाराज मंदिराजवळील Eternia Banquet Hall येथे सकाळी १० वाजता हा मेळावा होणार आहे. नागपूरसह देशातील विविध शहरांमधून तसेच विदेशातूनही निवृत्त बँक अधिकारी या अधिवेशनाला उपस्थित राहणार आहेत.

केंद्रीय बँकेच्या सेवाकाळात विविध शाखा, क्षेत्रीय व अंचलिक कार्यालये, केंद्रीय कार्यालय मुंबई, अंकेक्षण विभाग आणि अग्रणी बँक कक्ष आदी ठिकाणी एकत्रितपणे सेवा बजावलेल्या निवृत्त अधिकाऱ्यांना या मेळाव्याच्या निमित्ताने पुन्हा एकत्र येण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे अधिवेशनाला स्नेहमेळाव्याचे स्वरूप प्राप्त होणार आहे. या जीबीसी मध्ये निवृत्त अधिकाऱ्यांसाठी महत्त्वाचा असलेला पेन्शन अद्ययावतकरणाचा विषय, सुधारित निवृत्तिवेतन, विविध पेन्शनविषयक तरतुदी तसेच संघटनेच्या प्रयत्नांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यासोबतच वैद्यकीय सुविधा, विमा संरक्षण, डीआरएस तसेच बँकेकडून निवृत्त अधिकाऱ्यांना उपलब्ध असलेल्या विविध सुविधांबाबतही माहिती देण्यात येणार आहे. राष्ट्रीय स्तरावरील पदाधिकारी पारेख, मनोज वडनेरकर, अनिल ठाकूर, अरविंद मीना आणि लहाने मार्गदर्शन करणार आहेत.

अधिवेशनाचे विशेष आकर्षण म्हणजे ७५ वर्षे पूर्ण केलेल्या १०३ ज्येष्ठ सदस्यांचा विशेष सत्कार. बँकेच्या सेवेत दीर्घकाळ योगदान देणाऱ्या या ज्येष्ठ अधिकाऱ्यांचा सन्मान करून त्यांच्या सेवेला कृतज्ञतापूर्वक मानवंदना देण्यात येणार आहे. उपस्थित सदस्यांना विशेष भेटवस्तू तसेच सर्व सदस्यांचे मोबाईल क्रमांक असलेली डायरेक्टरी देण्यात येणार आहे.

जीबीसी ÛÜee Business Sessionमध्ये मागील तीन वर्षांतील संघटनेच्या कामकाजाचा आढावा,जनरल Secretary's Report, Audited Statement of Accounts, संघटनात्मक बाबी तसेच नियम व उपनियमांवर चर्चा होणार आहे. त्यानंतर आगामी तीन वर्षांसाठी नवीन कार्यकारिणीची निवड केली जाणार आहे.

या जीबीसीला नागपूर, अमरावती, अकोला, जळगाव, पुणे, मुंबई, गोवा, हैदराबाद, बेंगळुरू, भोपाळ, रायपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ आदी ठिकाणांहून तसेच विदेशातूनही सदस्य उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे हा मेळावा केवळ औपचारिक जनरल बॉडी कॉन्फरन्स न राहता देशाच्या विविध भागांत विखुरलेल्या माजी सहकाऱ्यांना पुन्हा एका छताखाली आणणारा स्नेह, स्मृती आणि संघटनात्मक ऊर्जेचा संगम ठरणार आहे.त्यामुळे हा मेळावा निवृत्त अधिकाऱ्यांच्या स्नेहबंधांना उजाळा देतानाच संघटनेच्या आगामी वाटचालीची दिशा निश्चित करणारा ठरणार आहे.

## करजगाव जि.प शाळेत सेवा संकल्प अभियान

**तिवसा-**महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा करजगाव येथे 'सेवा संकल्प अभियान' उत्साहपूर्ण वातावरणात राबविण्यात आले. यानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये सेवा, स्वच्छता, सामाजिक बांधिलकी व राष्ट्रप्रेमाची भावना रुजविण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादनाने करण्यात आली. कार्यक्रमाला



शाळेचे मुख्याध्यापक अविनाश गंजीवाले, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मोहन पुनसे, उपाध्यक्ष निकिता भोयर, शिक्षणतज्ञ रूपाली भोयर, अंगणवाडी सेविका मोनिका गोपाळे, तसेच शिक्षिका सविता पारसे, इंदिरा कोंडे व सुशीला बिचके यांची प्रमुख उपस्थिती होती.'सेवा संकल्प अभियान' या विषयावर विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे आपले विचार मांडले. अदवी भोयर, तेजस्विनी भोयर, कृष्णाली अडेकर, धैर्य पुनसे, भावेश मोहने व जीवीका ढवळे यांनी सेवा, त्याग, स्वच्छता, सामाजिक जबाबदारी,गांधीजी व शास्त्रीजी यांच्या जीवनमूल्यांवर प्रभावी भाषणे केली.कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, ग्रामपंचायतीचे पदाधिकारी तसेच गावातील पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे गांधी-शास्त्री जयंतीला सामाजिक जाणीव व सेवाभावाची प्रेरणा देणाऱ्या उपक्रमाची जोड मिळाली.

## वाडेकर नॅशनल स्कुलमध्ये म.गांधी व शास्त्री जयंती

**तिवसा -**राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती वाडेकर नॅशनल स्कूल मध्ये झाली. यावेळी शाळेच्या कोषाध्यक्ष विभा वाडेकर, प्रतीक्षा ढगे, नम्रता मोहोड इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी आपल्या वक्तव्यातून राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे भाषने दिली. कार्यक्रमाचे संचालन शिवनेरी निस्ताने, प्रदर्शन सारिका डहाके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता नूतन पाटील, अश्विनी खैरकर, रूपाली इंगोले, केतकी गावंडे, सारिका टिंगणे, आचल साबळे, श्रुती वाकोडे, क्रांती भारती, संध्या राऊत, प्रतीक्षा मेश्राम, कल्याणी राऊत, प्रतीक्षा यावले, आरती रोकडे, भूमिका कालमेघ इत्यादींनी परिश्रम घेतले.



## निधन

### प्रमोदराव वानखडे

**टाकरखेडा शंभू-**समता सहकारी गृहनिर्माण संस्थेचे माजी अध्यक्ष , तसेच मनीबाई छगनलाल देसाई विद्यालय आष्टीचे माजी शिक्षक प्रमोदराव वानखडे (वय ७०) यांचे शनिवारी ३ ऑक्टोबरल ला सकाळी दीर्घ आजाराने निधन झाले. मागील तीन वर्षांपासून ते कर्करोगाने ग्रस्त होते. त्यांच्या निधनाने समता कॉलनी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.प्रमोदराव वानखडे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, तीन भाऊ, सून व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पत्नी शिक्षक सेवानिवृत्त झाल्या आहेत. मुलगा डॉ. शंतनू वानखडे हे अस्थिरोगतज्ज्ञ असून, मुलगीही डॉक्टर आहे.त्यांच्या आई-वडिलांचे यापूर्वीच निधन झाले आहे.समता सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक व संस्थात्मक क्षेत्रात योगदान दिले. त्यांच्या निधनामुळे नातेवाईक, मित्रपरिवार तसेच परिचितांकडून शोक व्यक्त करण्यात येत आहे.



### कमलाबाई ठोंबरे

**कुऱ्हा-**येथील जेष्ठ महिला तथा वारकरी कमलाबाई रामभाऊजी ठोंबरे यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.त्याच्या पश्चात पाच मुले, दोन मुली, स्नुषा, जावाई, नातू नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.स्व.कमलाबाई ठोंबरे यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरातील गावकरी व नातेवाईक उपस्थित होते.ह.भ.प.वासुदेव रामभाऊजी ठोंबरे यांच्या मातोश्री आहे.



## सुरळीत विजेसाठी कृषीपंपाला कॅपासिटर आवश्यक

### मोहीम उघडत महावितरणकडून परिमंडळात जनजागृती

**अमरावती/का.प्र.**

दुष्काळाच्या स्थितीत कृषीपंपाला सुरळीत वीज पुरवठा करण्यासाठी महावितरण बांधिल असून, शेतकऱ्यांनीही कृषीपंपाला कॅपासिटर लावून सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केले आहे. कॅपॅसिटरची कृषीपंपाला गरज काय? आणि कॅपॅसिटर सुरळीत वीज पुरवठ्यासाठी कसे काम करते, याबाबत परिमंडळात मोहिम उघडण्यात आली असून या नोहिमेत क्षेत्रिय अभियंत्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना कॅपॅसिटरची फायद्याबाबत माहिती द्यावी आणि कृषीपंपाला कॅपॅसिटर लावण्याबाबत प्रवृत्त करावे असे निर्देश देण्यात आले आहे.

शेतातील कृषीपंपांमध्ये 'इंडक्शन मोटर'चा वापर केला जातो, ज्या सुरू असताना सुमारे ३० टक्के जास्त अतिरिक्त इंडक्टिव्ह करंट वीज वाहिन्यांवरून खेचतात. यामुळे विद्युत वाहिन्यांवर प्रचंड ताण येऊन ट्रान्सफॉर्मर ओव्हरलोड होतात आणि जळून खाक होतात.



या तांत्रिक बिघाडाचा मोठा फटका महावितरणसह ऐन मोक्याच्या वेळी शेतकऱ्यांनाही बसतो.

या समस्येवर कॅपेसिटर हा अत्यंत प्रभावी उपाय आहे. कॅपेसिटर हे उपकरण पंपाला लागणारी 'रिॲक्टिव्ह पॉवर' थेट पुरवते, ज्यामुळे लाईनवरून वाहणारा अतिरिक्त वीज प्रवाह ३० टक्क्यांपर्यंत कमी होतो. यामुळे वीज यंत्रणेवरील ताण मोठ्या प्रमाणावर हलका होऊन ट्रान्सफॉर्मर जळणे आणि तारा तुटण्याच्या घटनांवर नियंत्रण मिळवणे शक्य होते. शिवाय, शेतकऱ्यांना उच्च व योग्य दाबाने (व्होल्टेज) अखंडित वीज मिळून कृषीपंप जळण्याचे प्रमाण घटते आणि त्याची कार्यक्षमताही वाढते.

**अत्यल्प खर्च**

बाजारात एल अँड टी, कॅपको, हॅवेल्स यांसारख्या नामांकित कंपन्यांचे कॅपेसिटर सहज उपलब्ध असून अवघ्या ३०० ते ५०० रुपयांच्या नाममात्र खर्चात हजारो रुपयांची मोटार जळण्यापासून वाचवता येते. यामध्ये ३ एचपी मोटारीसाठी १ केव्हीएआर, ५ एचपी मोटारीसाठी २ केव्हीएआर, तर ७.५ एचपी मोटारीसाठी ३ केव्हीएआर क्षमतेचा कॅपेसिटर वापरणे आवश्यक आहे.

**ऑटोस्विचमुळे मोठे नुकसान**

वीज पुरवठा सुरू होताच सर्व शेतीपंप एकाच वेळी आपोआप सुरू व्हावेत यासाठी बहुतांश शेतकऱ्यांनी 'ऑटोस्विच' बसवले आहेत. मात्र, या ऑटोस्विचमुळे रोहित्रावर (ट्रान्सफॉर्मर) अचानक प्रचंड भार येऊन रोहित्र जळणे, लाईन ट्रिप होणे आणि विजेच्या तारा तुटण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. ही गंभीर समस्या टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी ऑटोस्विच तात्काळ काढून कृषीपंपाला योग्य क्षमतेचा 'कॅपेसिटर' बसवावा, असे आवाहन महावितरणचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केले आहे.

# समृद्धी महामार्गावर पुन्हा भीषण अपघात

## धावत्या पिकअपचा टायर निघाल्याने वाहन पलटी; ९ मजूर गंभीर, ८ जखमी

## ७ भाविकांचा बळी गेल्यानंतर सलग दुसऱ्या दिवशी अपघात



**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** समृद्धी महामार्गावर अपघातांचे सत्र सुरूच असून, काल ७ भाविकांचा बळी घेणाऱ्या भीषण अपघातानंतर आज दिनांक ३ ऑक्टोबर रोजी पहाटे पुन्हा एकदा भीषण अपघात झाला. तळेगाव दशासर पोलीस ठाण्याच्या हद्दीत धावत्या महिंद्रा पिकअप वाहनाचा पुढील डाव्या बाजूचा टायर अचानक निघाल्याने वाहन अनियंत्रित होऊन महामार्गावर पलटी झाले. या अपघातात तब्बल ९ मजूर गंभीर, तर ८ जण किरकोळ जखमी झाले. सर्व १७ जखमींना उपचारासाठी धामणगाव रेल्वे ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर तालुक्यातील २३ मजूर रोजगारासाठी बुलढाण्याकडे महिंद्रा पिकअप (क्र. MH ३७ T ४१८३) मधून जात होते. आज पहाटे सुमारे ५ वाजताच्या दरम्यान मुंबई कॉरिडॉरवरील चॅनल क्रमांक १२७+२०० जवळ अचानक पिकअपचा पुढील डाव्या बाजूचा टायर निघाला. त्यामुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि भरधाव पिकअप महामार्गावर पलटी झाले. अपघातानंतर वाहनातील मजुरांमध्ये एकच आक्रोश सुरू झाला.

मोहन शीरभाऊ यांच्या डाव्या ☞(पान २ वर)

# समृद्धीवर प्रवेशाचे 'फोन कनेक्शन'

## सात बळींनंतर टोल प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न



**वर्धा/प्रतिनिधीः-** सोमनाथे लेआउट परिसरातील युवक दुर्गामातेची मूर्ती घेऊन परतत असताना धामणगाव परिसरातील समृद्धी महामार्गावर वाहनाला भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत सात जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. या हृदयद्रावक दुर्घटनेनंतर आता एक गंभीर प्रश्न समोर आला आहे. ज्या वाहनाला समृद्धी महामार्गावर प्रवेशास सुरुवातीला विरोध करण्यात आला होता, त्याला अखेर प्रवेश मिळालाच कसा, प्रवेशासाठी नेमका कोणाचा फोन आला होता? त्या फोननंतर परवानगी कोणी दिली? आणि नियमांना अपवाद करून वाहन महामार्गावर सोडले गेले असेल तर त्याची जबाबदारी ☞(पान २ वर)

**पोलिसांनीही थांबविण्याचा प्रयत्न केला-**

टोल परिसरातील पोलिसांनीही युवकांना विरोध केल्याची माहिती समोर आली आहे. रात्रीचा प्रवास टाळून अंधार पडल्यानंतर टोल किंवा पेट्रोल पंपावर मुक्काम करावा आणि सकाळी पुन्हा प्रवास सुरू करावा, अशी विनंती पोलिसांनी केल्याचे टोल नाक्यावरील पोलिसांनी सांगितल्याची माहिती आहे. मात्र युवक आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर वाहन समृद्धी महामार्गावरून पुढे गेले. काही तासांनी धामणगाव परिसरात काळाने घाला घातला. ट्रकच्या धडकेत वाहनाचा चुराडा झाला आणि सात तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर संपूर्ण वर्धा परिसर नव्हे तर संपुर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे.

## अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुक

# ४ उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** विधानपरिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या चौथ्या दिवशी आज शनिवार ३ ऑक्टोबर २०२६ रोजी ४ उमेदवारांनी ४ नामनिर्देशनपत्रे दाखल केली आहेत. आतापर्यंत नामनिर्देशनपत्रे दाखल केलेल्या उमेदवारांची एकुण संख्या ६ झाली आहे.

आज नामनिर्देशन पत्रे दाखल केलेल्या उमेदवारांमध्ये अशोक वामन हिवाळे (अपक्ष), दिलीप भिमराव कडू (अपक्ष) गाजी मोहम्मद जाहेरोश ( वंचित बहुजन




नामनिर्देशनपत्र दाखल करता येणार नसल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निवडणूक कार्यक्रमानुसार ☞(पान २ वर)

...र्ज दाखल करण्याची ...ख आहे. बुधवार ७ ...रोजी अर्जांची छाननी ...णार असून, शुक्रवार ...र ही उमेदवारी अर्ज ...ची अंतिम तारीख ... ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत मतदान होणार असून, २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. ☞(पान २ वर)

# दर्यापूर तालुक्यातील ग्रामिण आरोग्यसेवा संकटात!

## चंद्रपूर, आमला रामतीर्थ, येवदा आरोग्य केंद्रांत ६९ पदे रिक्त

## कर्मचाऱ्यांची कमतरता, रुग्णसेवेवर परिणाम

**खल्लार/युवराज डोंगरेः-** दर्यापूर तालुक्यातील ग्रामिण भागातील नागरिकांना वेळेवर आणि दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी यासाठी उभारण्यात आलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्येच कर्मचारीटंचाईचे संकट निर्माण झाले आहे. दर्यापूर तालुक्यातील चंद्रपूर,आमला रामतीर्थ आणि येवदा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्याने ग्रामिण आरोग्य व्यवस्थेवर ताण पडण्याची शक्यता आहे. वैद्यकीय




अधिकारी, परिचारिका आणि इतर आवश्यक कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे आरोग्यसेवेच्या उपलब्धतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

दर्यापूर तालुक्यातील संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या आकडेवारीनुसार,चंद्रपूर येथे ३८ पदे मंजूर असून २३ पदे रिक्त आहेत.आमला येथे ४९ पदे मंजूर असून १६ पदे रिक्त आहेत. रामतीर्थ येथे ४८ मंजूर पदांपैकी ११ पदे रिक्त आहेत, तर येवदा येथे ४८ मंजूर पदांपैकी २० पदे रिक्त आहेत.

या चार आरोग्य केंद्रांमध्ये एकूण १७४ पदे मंजूर असून ६९ पदे रिक्त आहेत. त्यामुळे मंजूर मनुष्यबळाच्या तुलनेत रिक्त पदांचे प्रमाण लक्षणीय असल्यामुळे उपकेंद्रांमधील आरोग्यसेवेवरही मोठया प्रमाणावर ताण पडत आहे. प्राथमिक आरोग्य ☞(पान २ वर)

दर्यापूर तालुक्यातील चारही आरोग्य केंद्रातील सेवा खंडित होऊ नये यासाठी कर्मचाऱ्यांना अतिरिक्त जबाबदारी देण्यात येते. कोणतीही आरोग्यसेवा बंद राहू नये, याची दक्षता घेतली जात आहे. रिक्त पदांबाबत वरिष्ठ कार्यालयाला वेळोवेळी अहवाल सादर केला जात असून वरिष्ठ स्तरावर नियमित पदभरती झाल्यानंतर कर्मचारीटंचाईची समस्या दूर होण्यास मदत होईल.
**-डॉ. राहुल उमप**, तालुका आरोग्य अधिकारी दर्यापूर.

# नशेत झालेल्या वादानंतर तरूणाने घेतले विष

## पोलिसांच्या तत्परतेमुळे वाचवा जीव

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या मलकापूर गावात दारूच्या नशेत झालेल्या वादानंतर एका युवकाने कथितरित्या विषारी पदार्थ गिळल्याची माहिती समोर आली आहे. पोलीस कर्मचाऱ्यांनी वेळ न दवडता घटनास्थळी धाव घेत त्याचा जीव वाचवण्यासाठी तत्काळ पाऊले उचलली. माहितीनुसार आकाश प्रकाशराव मोहोळ (वय २९,रा. मलकापूर ) याचा दारू पिताना एका व्यक्तीशी वाद



झाला होता. याच दरम्यान दुसऱ्या व्यक्तीने त्याला चाकू मारण्याची धमकी दिल्याचे समोर आले. वाद आणि रागाच्या स्थितीत आकाशने कथितरित्या मीरा-७१नावाचे ☞(पान २ वर)

# पत्नीला निरोप देताना घात

## अंबा एक्सप्रेसमधून उतरताना पतीचा अपघाती मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** पत्नीला रेल्वेत बसविण्यासाठी आलेल्या पतीने गाडीने वेग घेतल्यानंतर खाली उतरण्याचा प्रयत्न केला आणि तोच प्रयत्न त्यांच्या जीवावर बेतला. पाय घसरून रेल्वेखाली आल्याने ५४ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. अमरावती मॉडेल रेल्वेस्थानकाच्या प्लॅटफार्मवर शुक्रवारी, २ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ही दुर्घटना घडली. दिनेश शंकरराव तानवैस (वय ५४, रा. ट्रेझरी




कॉलनी, अर्जुननगर) असे मृताचे नाव आहे. दिनेश हे पत्नीला अंबा एक्सप्रेसमध्ये बसविण्यासाठी रेल्वेस्थानकावर आले होते. पत्नीला डब्यात बसविल्यानंतर ☞(पान २ वर)

# युवकांना उडवून कार पोलवर आदळली, दोघे गंभीर

## चालकाला नागरिकांनी बेदम चोपले

### -काँग्रेसनगर चौकाजवळ धुमाकूळ

**अमरावती/प्रतिनिधीः-** वर्दळीच्या काँग्रेसनगर चौक परिसरात भरधाव कार दोन युवकांना धडक दिल्यानंतर रस्त्यालगतच्या पोलवर जाऊन आदळल्याची घटना शनिवारी दुपारी घडली. अपघातात दोन्ही युवक गंभीर जखमी झाले. दरम्यान, अपघातानंतर संतप्त झालेल्या नागरिकांनी कारचालकाला पकडून मारहाण




केल्याने परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, काँग्रेसनगर चौकाजवळून कार जात असताना अचानक ☞(पान २ वर)

# गुणवंत महाराज मंदिरातून मंगळसूत्र लंपास

## शिरजगांव कसबा येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** मंदिरात दर्शनासाठी जमलेल्या श्रद्धाळूंच्या गर्दीचा फायदा घेत एका अज्ञात चोराने ६० वर्षीय वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र लंपास केले. शिरजगांव कसबा पोलीस ठाणे क्षेत्रातील लाखनवाडी येथे असलेल्या प्रसिद्ध गुणवंत महाराज मंदिरात शुक्रवार रोजी दुपारी ही घटना घडली. चोरी गेलेल्या मंगळसूत्राची किंमत सुमारे ४९ हजार ३५० रुपये असल्याची माहिती आहे. माहिती



नुसार, अंजनगाव सुर्जी येथील रहिवासी ६० वर्षीय महिला शुक्रवार रोजी गुणवंत महाराज यांच्या दर्शनासाठी मंदिरात आल्या होत्या. मंदिर परिसरात श्रद्धाळूंची ☞(पान २ वर)

# भाडेपट्ट्याने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनाही दुष्काळी मदत द्या

### भाजपा किसान मोर्चा मेळघाट तर्फे पालकमंत्र्यांकडे मागणी

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यासह अचलपूर तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर आणि निराधार महिला भाडेपट्ट्याने अथवा लागवण पट्ट्याने शेती करतात.मात्र त्यांच्या हातात त्या शेतीचा अधिकृत भाडेपट्टा किंवा लागवण पट्ट्याचा पुरावा नसतो. या परिस्थितीत दुष्काळी उपाययोजनांचा लाभ नेमका त्या गरजूंपर्यंत कसा पोहचणार ? याबाबत ठोस उपाययोजना राबविण्याची मागणी भाजपा किसान मोर्चा मेळघाट तर्फे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे करण्यात आली आहे.

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पीक पेरणीसाठी अथक मेहनत घेऊन शेती तयार केली आणि पिके घेतली मात्र आज दुष्काळाचा फटका सहन करत आहेत. त्यांना केवळ कागदपत्रांच्या अभावामुळे शासनाच्या मदतीपासून वंचित राहावे लागू नये यासाठी भाडेपट्ट्याने ☞(पान २ वर)

# ७ दिवसांपासून तरूणी बेपत्ता

## भाजप पदाधिकाऱ्यांचा कोतवाली ठाण्यात ठिय्या

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील एक तरूणी बेपत्ता झाल्याच्या प्रकरणात सात दिवस उलटूनही तिचा कोणताही थांगपत्ता न लागल्याने भाजप नेते शिवराय कुलकर्णी यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन केले. तरूणीचा लवकरात लवकर शोध घेऊन तिला पालकांच्या ताब्यात द्यावे, अशी मागणी करत त्यांनी जोपर्यंत तीचा शोध लागत नाही, तोपर्यंत पोलीस ठाण्यातून हटणार नाही, असे स्पष्ट केले. कुलकर्णी यांनी यापूर्वीही राजापेठ



व बडनेरा पोलीस ठाण्यांमध्ये अशाच प्रकारची आंदोलने केली होती. या आंदोलनाची दखल घेत पोलीस प्रशासनाने तातडीने संबंधित युवतीचा शोध सुरू केला. माहिती नुसार २७ सप्टेंबर रोजी एक युवती अचानक बेपत्ता झाली होती. युवतीच्या पालकांनी त्याच दिवशी कोतवाली पोलिसांत तक्रार नोंदवली होती. आरोप आहे की, बडनेरातील जुनी वस्ती चमन नगरातील दानिश नावाच्या युवकाने युवतीला फूस लावून आपल्यासोबत ☞(पान २ वर)

# तलावात बुडून पुन्हा दोन मुलांचा मृत्यू

## प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा बळी : प्रविण हरमकर यांचा आरोप

## सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहरातील बडनेरा मतदार संघातंर्गत येणारा भानखेडा परिसर मानवी जीवनास धोकादायक झालेला असून या परिसरातील तलावात काल परत एकदा दोन १७ वर्षीय शाळकरी विद्यार्थ्यांचा येथील तलावात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना अत्यंत हृदयद्रावक असून प्रशासनाच्या बेजबाबदार कारभारामुळे घडली आहे, असा आरोप शिवसेना शहर प्रमुख प्रविण वसंतराव हरमकर यांनी केला आहे.



यापूर्वी मार्डी रोड, गोडे मेडिकल कॉलेज जवळील तलावात ४ निष्पाप जीवांचा मृत्यू झाला होता. त्यावेळी प्रविण हरमकर यांनी दि. १६/०६/२०२६ रोजी निवेदन देऊन तलाव सुरक्षित करण्याची मागणी केली होती. त्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासन, उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अमरावती यांनी दि. १७/०९/२०२६ रोजी जा.क्र. २७९१/उवसिमं/तां.७/सि.व्य.१/ ☞(पान २ वर)




शुभेच्छुक

**मा.श्री अशोकराव देशमुख,** (अजीव सदस्य, शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती व चार शाळेचे पालकत्व)
**मा.श्री.गोविंदराव देशमुख,** (माजी अध्यक्ष, खरेदी विक्री संघ, चांदूर रेल्वे,) **मा.श्री.अरुणराव देशमुख,** (माजी तंटामुक्त अध्यक्ष, निंभा), **मा.श्री गणेशराव देशमुख, मा.श्री.विजयराव देशमुख, मा.श्री दिपक झाडे, मा. विलास देशमुख** (कंट्रोल डीलर निंभा) **मा.श्री दिलीपराव देशमुख,**(माजी पोलिस पाटील निंभा), **ह.भ.प. दुबे महाराज,** चादुर रेल्वे, **मा.श्री प्रमोद इंगळे,**(सेवा सहकारी सोसा. अध्यक्ष निंभा तथा माजी मुख्याध्यापक फुबगाव तथा स्व. नरहरी देशमुख वाचनालयाचे अध्यक्ष, निंभा तथा पत्रकार चांदूर रेल्वे), **मा.श्री बंडू आठवले, मा.श्री.दे.सी. खोब्रागडे, मा.श्री उत्तमराव वासनिक, मा.श्री अतुल मैद** (मुख्याध्यापक माध्मिक विद्यालय गोलाई) **मा.श्री पठाण सर, मा.श्री पिंटू चव्हाण** (सामाजिक कार्यकर्ते), **मा.श्री आर बी देशमुख, मा.श्री उध्दव देशमुख, मा.मनोज परडके**

# सिनेट सदस्य डॉ.प्रशांत विघे शिक्षक मतदारसंघाच्या रिंगणात



**अमरावती/प्रतिनिधीः-** शिक्षकांच्या प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी आणि शिक्षकांच्या अधिकारांसाठी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. प्रशांत विश्वेश्वर विघे शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. शिक्षकांच्या अधिकारांसाठी त्यांचा संघर्ष आहे.त्यांना साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी आज शनिवार ३ ऑक्टोबर रोजी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केले आहे.

डॉ. विघे म्हणाले, जुनी पेन्शन योजना, टीईटी संबंधी प्रश्न, शिक्षकांच्या क्षेत्रात वाढते खासगीकरण ☞(पान २ वर)

# जन्मजात दुभंगलेले ओठ आणि टाळूवर मोफत शस्त्रक्रिया



**अमरावती/प्रतिनिधीः** मिशन स्माईल ८० जी व एफसीआरए नोंदणीकृत वैद्यकीय सेवाभावी संस्था, बजाज फिनसर्व्ह व डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल यांच्या सहकार्याने जन्मजात फट असलेल्या ओठ व टाळूचे मोफत ऑपरेशन केले जात आहे. त्यासाठी डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेज व ☞(पान २ वर)

**-१२ ते १४ ऑक्टोबर दरम्यान विशेष शिबिर 'मिशन स्माईल' अन् गोडे कॉलेजचा स्तुत्य उपक्रम**

# सारांश

जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय

रविवार, ४ ऑक्टोबर २०२६ E-paper - www.janmadhyam.com




## 'हनुमान अंश'च्या निर्मात्यांचे कौतुक

आध्यात्मिक गुरू नीम करौली बाबा यांच्या जीवनावर आधारित असलेल्या 'हनुमान अंश' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर इतिहास रचला. अवघ्या १.५ कोटी ते २ कोटीच्या बजेटमध्ये तयार झालेल्या ह्या चित्रपटाने दीड महिन्यामध्ये ४०८ कोटींचा गल्ला जमावला आहे. चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य तर गाजवले आहे, पण गाण्यांनीही प्रेक्षकांवर भुरळ घातली आहे. चित्रपटातील 'मैंने तेरे ही भरोसे हनुमान' आणि ' पार्वती' गाण्याने प्रेक्षकांवर भुरळ घातली आहे. सोशल मीडियावर स्क्रोल करताना या गाण्यांचे अनेक रिल आपल्याला पाहायला मिळतात. 'मैंने तेरे ही भरोसे हनुमान' गाण्याच्या सिंगरने आपल्या आवाजाने प्रेक्षकांना आपलंसं केलं आहे. या गायका संबंधित एक महत्त्वाची बातमी आहे.मैंने तेरे ही भरोसे हनुमान' गाणं गायक सुनिल लोधी या तरूणाने गायलं आहे. सुनील लोधी पूर्वीपासूनच दृष्टीहीन आहे. या दृष्टिहीन गायकावर उपचार करण्याचा संपूर्ण खर्च चित्रपटाच्या निर्मात्या करणार असल्याची माहिती त्यांनी स्वत: दिली आहे. दैनिक भास्करला दिलेल्या मुलाखतीत अनुप्रिया नागर यांनी सांगितले की, 'जेव्हा सुनील मुंबईत येईल, तेव्हा त्याच्या डोळ्यांची नेत्रतज्ज्ञांकडे तपासणी करून घेणार आहे. नोव्हेंबर महिन्यामध्ये त्याच्या डोळ्यांवर उपचार केले जाण्याची शक्यता आहे. अद्याप त्याच्यावर कोणत्या हॉस्पिटलमध्ये उपचार केले जाणार? हे ठरलेलं नाहीये. सुनील बालपणापासूनच दृष्टिहीन आहे. सुनील काही महिन्यांपूर्वी मुंबईमध्ये आला होता, त्यावेळी त्याची एका नेत्रतज्ज्ञांकडे अपॉईंटमेंट घेतली होती, पण त्यावेळी त्याच्यावर उपचार होऊ शकले नाहीत.' अनुपप्रिया यांनी सांगितले की, सुनीलसोबत बोलताना ती त्याच्या विचारांनी आणि त्याची देवावर असलेल्या श्रद्धेमुळे खूप प्रभावित झाली. तिने मुलाखती दरम्यान सांगितले की, 'कठीण परिस्थितीतही सुनील आपल्या यशाचे आणि आयुष्यात मिळालेल्या प्रेमाचे सर्व श्रेय हनुमानजींना देतो.

## आलियाचा बोल्ड 'शो गर्ल' अवतार



संजय लीला भन्साळी हे गेल्या काही वर्षांपासून त्यांच्या बहुचर्चित 'लव्ह अँड वॉर' या सिनेमावर काम करत होते. हा सिनेमा आता पूर्णत्वास आला असून, येत्या जानेवारीमध्ये हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटातील कलाकारांचे लूक आता समोर येण्यास सुरुवात झालेली आहे. सर्वात आधी रणबीर कपूरचा लूक समोर आला. परंतु नुकताच समोर आलेल्या आलियाच्या लूकने इंटरनेटचं तापमान चांगलंच वाढवलं आहे. आलियाचा ग्लॅमरस अंदाज पाहून सोशल मीडियावर चर्चेला उधाण आले आहे. मुख्य म्हणजे आलियाचा हा ग्लॅमरस अंदाज पाहून झीनत अमान यांनाही प्रतिक्रीया देण्याचा मोह आवरता आला नाही.आलियाचा पहिला लूकमधील फोटो हा कॅबरे डान्सरमधील असून, ती शो गर्ल दिसत आहे. वाईन रेड रंगाचा क्रॉप टॉप, त्याला मॅचिंग फ्लोइंग स्कर्ट आणि थाय हाय स्लिट असा तिचा ग्लॅमरस लूक आहे. तिच्या डोक्यावर असलेल्या पिसांनी तर या लूकला आणखीच शोभा आली आहे. आलियाने आत्तापर्यंत साकारलेल्या

## मराठी नाटक पुन्हा 'हाऊसफुल्ल'कडे!

मराठी रंगभूमीवर सध्या पडदा उघडतोय तो केवळ नाटकासाठी नाही, तर बदलत्या प्रेक्षकाच्या बदलत्या आवडींची चाहूल देण्यासाठी. काही वर्षांपूर्वी 'नाटकाचा व्यवसाय कठीण झाला' अशी चर्चा रंगत होती; आज नव्या नाटकांची लगबग, जुन्या गाजलेल्या नाटकाचे पुनरुज्जीवन, वाढती प्रयोगसंख्या आणि तिकीट खिडकीवरची गर्दी दिसते. २०२५-२६ मध्ये मराठी नाटकांच्या तिकीट विक्रीत मागील वर्षाच्या तुलनेत ५० टक्के वाढ झाल्याचे 'बुकमायशो'च्या आकडेवारीचा हवाला देत वृत्त प्रसिद्ध झाले. रंगभूमी पुन्हा प्रेक्षकाला बोलावते आहे, एवढे मात्र नक्की.

या बदलाच्या केंद्रस्थानी प्रशांत दामले आणि भरत जाधव यांच्यासारखी 'हुकमी' नावे तर आहेतच, पण सचिन खेडेकर, महेश मांजरेकर यांचे दमदार पुनरागमनही आहे. प्रेक्षक नावांवर नाटक निवडतो, हा व्यावसायिक रंगभूमीचा जुना नियम अजून संपलेला नाही. पण फक्त स्टारडमवर आता रंगभूमी टिकत नाही. कलाकाराचे नाव दार उघडते, आत प्रेक्षकाला बसवून ठेवते ती संहिता, अभिनय आणि अनुभव.

म्हणूनच नव्या लेखकांची चाहूल महत्त्वाची आहे. डॉ. सत्यजित खारकर यांचे 'सांगा, कसं जगायचं?' यासारखे विषय समकालीन संघर्ष, नातेसंबंध आणि सामाजिक वास्तवाला नाट्यरूप देतात. तर संदीप दंडवते, विराजस कुलकर्णी, क्षितीज पटवर्धन, डॉ. श्वेता पेंडसे, देबू बर्वे ही मंडळी नवी भाषा, नवे विषय आणि आजच्या पिढीच्या संवेदना रंगमंचावर आणत आहेत. संकर्षण क-हाडे लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेता म्हणून अनेक जबाबदा-या समर्थपणे सांभाळत आहेत. डॉ. विवेक बेळे यांच्यासारख्या तुलनेने नव्या नाटककारांच्या नाटकांचे पुनरुज्जीवनही होत आहे. म्हणजे आजचा रंगकर्मी एका चौकटीत अडकलेला नाही; तो नवे प्रयोग करतोय आणि प्रेक्षक ते स्वीकारतोय.

विनोद रत्ना, मयूर सरकाळे, मंगेश सातपुते यांच्यासारख्या तरुण रंगकर्मींकडे पाहिले की एक गोष्ट स्पष्ट होते. नव्या पिढीला रंगभूमी 'करायची' आहे, केवळ पाहायची नाही. विनोद रत्ना आणि त्यांच्या समूहाने एकांकिका स्पर्धांमधून लक्ष वेधले आणि 'चिरंजीव परफेक्ट बिघडलाय!' व्यावसायिक रंगभूमीवर आले. २०२६ मध्ये या नाटकाचे शंभर प्रयोग पूर्ण झाले. स्पर्धेपासून व्यावसायिक रंगभूमीपर्यंतचा हा पूल म्हणजे मराठी रंगभूमीची खरी ताकद.



राज्यस्तरीय आणि महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा आता केवळ पारितोषिकांची शर्यत राहिलेल्या नाहीत. त्या नव्या लेखकांची, दिग्दर्शकांची, अभिनेत्यांची आणि तंत्रज्ञांची प्रयोगशाळा बनल्या आहेत. विविध एकांकिका स्पर्धा आणि 'नाट्य परिषद करंडक'सारख्या उपक्रमांतून व्यावसायिक रंगभूमीकडे जाणा-या कलावंतांना व्यासपीठ मिळते. म्हणजे पुढची पिढी रंगमंचाच्या मागच्या दारातून नव्हे, तर स्पर्धांच्या प्रकाशझोतातून येते आहे.

विषयांचे क्षितिजही विस्तारले आहे. कौटुंबिक नाती, स्त्रीजीवन, पिढ्यांतील संघर्ष, डिजिटल जग, सामाजिक प्रश्न, इतिहास, संगीत, विनोद आणि मानवी मनातील गुंतागुंत रंगमंचावर येते आहे. 'संगीत देवबाभळी', 'चारचौघी'सारख्या निर्मिती वेगळ्या आशयाची आणि पुनरुज्जीवनाची ताकद दाखवतात. विनोदी नाटकांची मागणीही कायम आहे. प्रेक्षकाला विचार करायला लावणारे नाटक हवेच; पण दोन तास मनमुराद हसवणारे नाटकही हवे आहे.

## 'दृश्यम ३'ची बॉक्स ऑफिसवर दमदार सुरुवात




बॉलिवूड अभिनेता अजय देवगण याच्या बहुप्रतीक्षित 'दृश्यम ३' चित्रपटाने प्रदर्शनापूर्वीच बॉक्स ऑफिसवर जोरदार सुरुवात केली आहे. चित्रपटाच्या ?डव्हान्स बुकिंगला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, पहिल्या दिवसाच्या तिकीट विक्रीतून चित्रपटाने ९ कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. त्यामुळे प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी चित्रपट किती कमाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. हा चित्रपट २ ऑक्टोबरला चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

२९ सप्टेंबर दुपारी ३ वाजेपर्यंत चित्रपटाच्या पहिल्या दिवसाच्या शोसाठी २.३१ लाख तिकिटांची विक्री झाली होती. या तिकीट विक्रीतून चित्रपटाने ब्लॉक केलेल्या जागांसह ९.२८ कोटी रुपयांची कमाई केल्याची माहिती समोर आली आहे.

२ ते ४ ऑक्टोबर या पहिल्या तीन दिवसांच्या शोसाठीही चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

## 'चला हवा येऊ द्या' फेम भारत गणेशपुरेचीही भूमिका

'प्रहार'च्या ट्रेलरनंतर चित्रपटातील कलाकारांच्या भूमिकांबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. याच चित्रपटात अभिनेता भारत गणेशपुरे देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. भारत गणेशपुरे याने या सिनेमात एका वकिलाची भूमिका साकारल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, त्यांच्या पात्राचं नेमकं नाव अद्याप जाहीर करण्यात आलेलं नाही. भारत गणेशपुरे पहिल्यांदाच अशा गंभीर आणि कोर्टरूम ड्रामामध्ये दिसणार असल्याने त्यांच्या चाहत्यांमध्येही उत्सुकता वाढली आहे.

**कसा आहे 'प्रहार'चा ट्रेलर ?**

'प्रहार'चा ट्रेलर २६/११च्या त्या काळ्या रात्रीची आठवण करून देणाऱ्या दृश्यांनी सुरू होतो. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याची झलक ट्रेलरमध्ये पाहायला मिळते. या हल्ल्यात आपल्या आईला गमावलेली एक निष्पाप मुलगी न्यायालयात अजमल कसाबविरोधात साक्ष देताना दिसते. त्यानंतर कथानक न्यायालयीन लढाईकडे वळतं. उज्ज्वल निकम यांच्या भूमिकेतील राजकुमार राव कसाबला कायद्याच्या चौकटीत शिक्षा मिळवून देण्यासाठी लढताना दिसतो. ट्रेलरमध्ये राजकुमार रावचा गंभीर आणि प्रभावी अंदाज पाहायला मिळतो. त्याचबरोबर ललित प्रभाकरने साकारलेल्या कसाबच्या भूमिकेचीही चर्चा होत आहे. त्याचा लूक आणि देहबोली प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेत आहे.



**'प्रहार'मध्ये कलाकारांची मोठी फौज**

राजकुमार राव आणि ललित प्रभाकर यांच्यासोबत या चित्रपटात जयदीप अहलावत, वामिका गब्बी, सिकंदर खेर आणि आशिष विद्यार्थी यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत.

## 'पंचायत' सीझन ५ कधी येणार?

ओटीटीवरील सर्वात लोकप्रिय वेबसीरिज 'पंचायत'चा नवीन सीझन कधी येणार याची सगळेच वाट पाहत आहेत. फुलेरा गाव, प्रधान जी, सचीव जी, प्रल्हाद चा सगळ्यांचीच चाहते आठवण काढत आहेत. गावातील निवडणूक, राजकारण, निकाल आणि आता पुढे काय घडणार याची उत्सुकता आहे. प्रल्हाद चा यांना तर थेट आमदारकीची ऑफर आली आहे. ही ऑफर ते स्वीकारणार का? याचे उत्तर नव्या सीझनमध्ये मिळणार आहे. मात्र हा पाचवा सीझन कधी येणार याचं अपडेट प्रधान जी म्हणजेच अभिनेते रघुबीर यादव यांनी दिलं आहे.



अभिनेते रघुबीर यादव सध्या 'हुंकार' सीरिजमध्ये बापजीच्या भूमिकेत दिसत आहेत. एका मुलाखतीत त्यांनी 'पंचायत' सीरिजबद्दल अनेक खुलासे केले. ते म्हणाले, 'पंचायतमधले सगळेच कलाकार चांगले आहेत. मोठ्या काळानंतर अशा तऱ्हेच्या कलाकारांसोबत काम करायला मिळालं होतं जे इतके सहज आणि चांगल्या पद्धतीने भूमिकेवर पकड मिळवतात ज्यामुळे आम्हालाही मजा येते. कोणीच एकमेकांपेक्षा कमी नाहीये. खासकरुन विनोद आणि दुसरा भूषण, दोघंही बदमाश कलाकार आहेत.'

'पंचायत'च्या कास्टिंगवर ते म्हणाले, या सगळ्या कलाकारांनी आयुष्य पाहिलंय म्हणूनच ते इतकं चांगलं काम करतात. आयुष्य पाहिलं असेल, ते जगला असाल तर जास्त मेहनत घ्यावी लागत नाही. आपल्यातला दिखावा निघून जातो. हीच ती भूमिका आहे असं वाटतं. सीरिजची कास्टिंग एकदम परफेक्ट आहे.'

**कधी येणार सीझन ५?**

पाचव्या सीझनबद्दल रघुबीर यादव म्हणाले, 'नव्या सीझनचं शूट पूर्ण झालं आहे. रिलीजचं विचाराल तर मला वाटतं आणखी २-३ महिने तरी लागतील. सध्या सीरिजचं एडिटिंग आणि डबिंगचं काम सुरु आहे.

## कोण आहे ही अभिनेत्री? क्रिकेटर्सही आहेत फिदा

आपल्या सुंदर आवाजाने, दमदार अभिनयाने आणि भन्नाट डान्समुळे लाखो चाहत्यांच्या मनावर राज्य करणारी सारा गुरपाल पंजाबी मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री आणि गायिका आहे. पंजाबी चित्रपट आणि संगीत क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केल्यानंतर साराने हिंदी रिअ?लिटी शोमध्येही काम केले आहे. सध्या ती माजी भारतीय क्रिकेटपटू वीरेंद्र सेहवाग यांच्या 'राइज अँड फॉल' या शोमुळे चर्चेत आली आहे.

मॉडेलिंगपासून करिअरला सुरुवात

सारा गुरपालचा जन्म हरियाणातील फतेहाबाद जिल्ह्यात झाला. मात्र तिचे बालपण आणि शिक्षण चंदीगडमध्ये झाले. लहानपणापासूनच तिला कला आणि फॅशनची आवड होती. याच आवडीमुळे तिने मॉडेलिंगच्या माध्यमातून मनोरंजन क्षेत्रात प्रवेश केला.

२०१२ मध्ये साराने 'मिस चंदीगड' हा किताब पटकावला. या यशामुळे तिच्यासाठी मनोरंजन क्षेत्राचे दरवाजे खुले झाले. त्यानंतर तिने पंजाबी संगीत क्षेत्रात काम करण्यास सुरुवात केली.

२०१३ मध्ये पंजाबी गायक रंजीत बावा यांच्या 'जीन' या गाण्यात साराने मुख्य मॉडेल म्हणून काम केले. हे गाणे चांगलेच लोकप्रिय झाले. त्यानंतर साराने अनेक पंजाबी गाण्यांच्या म्युझिक व्हिडिओमध्ये काम केले.

मॉडेलिंगसोबतच साराने गायन क्षेत्रातही पाऊल ठेवले. आपल्या आवाजाच्या जोरावर तिने पंजाबी संगीत क्षेत्रातही वेगळी ओळख निर्माण केली.

पंजाबी चित्रपटातून अभिनेत्री म्हणून पदार्पण

मॉडेलिंग आणि म्युझिक व्हिडिओमध्ये लोकप्रियता मिळवल्यानंतर साराने पंजाबी चित्रपटांकडे मोर्चा वळवला. २०१७ मध्ये 'मंजे बिस्तरे' या पंजाबी चित्रपटातून तिने अभिनय क्षेत्रात पदार्पण केले.

त्यानंतर तिने अनेक पंजाबी चित्रपटांमध्ये काम केले.

तिच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे तिला हिंदीतील लोकप्रिय रिॲलिटी शो 'बिग बॉस १४' मध्येही सहभागी होण्याची संधी मिळाली. मात्र या शोमध्ये तिचा प्रवास फार काळ टिकला नाही. सुरुवातीच्या काळातच तिला घराबाहेर पडावे लागले.

**'राइज अँड फॉल' या रिॲलिटी शोमध्ये एंट्री**

'बिग बॉस'नंतर आता सारा गुरपाल पुन्हा एकदा रिअ?लिटी टीव्हीवर दिसत आहे. माजी क्रिकेटपटू वीरेंद्र सेहवाग यांच्या 'राइज अँड फॉल' या शोमध्ये तिने दमदार एंट्री केली आहे. शोच्या प्रीमियर एपिसोडमध्ये साराने आपल्या खास अंदाजात एक मजेशीर खुलासा केला. तिने वीरेंद्र सेहवाग यांच्यासमोर सांगितले की, अनेक प्रसिद्ध क्रिकेटपटू तिला सोशल मीडियावर मेसेज करतात.

साराच्या या वक्तव्यानंतर शोमध्ये चांगलीच चर्चा रंगली. तिच्या या खुलाशावर वीरेंद्र सेहवाग यांनीही मजेशीर प्रतिक्रिया दिली. शोचा हा भाग प्रसारित झाल्यानंतर सोशल मीडियावरही साराच्या वक्तव्याची चर्चा सुरू झाली.

मात्र साराने नेमके कोणते क्रिकेटपटू तिला सोशल मीडियावर मेसेज करतात, यांची नावे जाहीर केलेली नाहीत. त्यामुळे तिच्या या खुलाशानंतर चाहत्यांमध्ये उत्सुकता आणखी वाढली आहे.



आता 'राइज अँड फॉल'मध्ये सारा गुरपाल आपल्या बेधडक स्वभावासोबतच खेळाची रणनीती कशी वापरते आणि शोमध्ये किती पुढे जाते, याकडे तिच्या चाहत्यांचे लक्ष लागले आहे.

# अंगणातील तुळस

आमच्या अंगणात तुळशी वृंदावन आहे. रोजच्या येण्या-जाण्यात तुळस नजरेसमोर असते. सकाळी तिच्यासमोर दिवा लावला जातो, पाणी घातले जाते. त्यामुळे तुळस आमच्या घराच्या रोजच्या जीवनाचा एक भागच झाली आहे. पण इतकी जवळ असूनही तिच्याकडे निरखून पाहण्याचा योग मात्र फारसा आला नव्हता. काही दिवसांपूर्वी तुळशीचे निरीक्षण करत असताना अचानक माझी नजर तिच्यावर आलेल्या नाजूक गुलाबी फुलांवर गेली. क्षणभर थांबून मी तिच्याकडे पाहत राहिले. बारीकशा देठावर



एकामागोमाग एक उमललेली छोटी छोटी फुले, त्यांची रचना, फुलोऱ्याची लय आणि त्याभोवती तयार झालेल्या मंजिऱ्याष्ठ सगळंच खूप सुंदर दिसत होतं.

तुळशीला आपण प्रामुख्याने तिच्या पानांसाठी आणि धार्मिक महत्त्वासाठी ओळखतो. पण तुळस फुलते तेव्हा तिचं एक वेगळंच रूप समोर येतं. हिरव्या पानांमध्ये उठून दिसणारा हा गुलाबी फुलोरा अगदी छोट्याशा चित्रासारखा वाटला.

खरं तर आपण रोज अनेक गोष्टी पाहतो. पण त्या खरंच पाहतो का? एखादी गोष्ट रोजची झाली की तिच्यातलं सौंदर्य आपल्याला जाणवत नाही. तुळशीसोबतही कदाचित असंच झालं असावं. रोज दिसणारी म्हणून तिच्याकडे बारकाईने पाहण्याची गरजच वाटली नाही. पण त्या दिवशी थोडं थांबून पाहिलं आणि जाणवलं. आपल्या अगदी आसपास निसर्ग किती सुंदरपणे आपलं काम करत असतो!

तुळशीच्या पानांचा उपयोग पारंपरिक पद्धतीने चहा, काढा आणि विविध घरगुती उपयोगांसाठी केला जातो. तिचे औषधी महत्त्वही मोठे आहे. आयुर्वेदात तुळशीचा उपयोग पारंपरिकरीत्या सर्दी, खोकला, घशातील त्रास, पचनाशी संबंधित पारी अशा विविध कारणांसाठी केला जातो. त्यामुळे तुळस ही घराच्या अंगणातील एक महत्त्वाची औषधी वनस्पती मानली जाते. तुळशीला आपल्या संस्कृतीत विशेष स्थान आहे. तिच्याभोवती अनेक परंपरा आणि श्रद्धा जोडलेल्या आहेत. पण त्याचबरोबर तिचं वनस्पती म्हणून असलेलं सौंदर्यही आपण अनुभवायला हवं.

तुळशीचा हा फुलोरा पाहताना आणखी एक गोष्ट जाणवली, निसर्गाकडे पाहण्यासाठी नेहमी मोठ्या प्रवासाची गरज नसते. कधी कधी आपल्या अंगणात, घराच्या दाराशी, एखाद्या कुंडीतच निसर्गाची सुंदर कलाकृती उमललेली असते. फक्त आपली नजर थोडी निवांत आणि संवेदनशील असायला हवी. म्हणून तुमच्या घरातही तुळस असेल तर आज एकदा तिच्याकडे थांबून पाहा. तिची पाने, देठ, मंजिरी आणि फुलोरा निरखून पाहा. कदाचित रोज दिसणारीच तुळस त्या दिवशी तुम्हाला अगदी नव्याने दिसेल.

# सर्वात लहान वयाचा बाह्यग्रह

अवकाशातील आपल्या ताऱ्या भोवतीच्या धुलिकणांच्या कवचातून बाहेर येणारा एक अत्यंत नवीन बाह्यग्रह शास्त्रज्ञांच्या हाती लागला आहे. हा आजवरचा सर्वात लहान वयाचा बाह्यग्रह ठरला असून त्याचे वय १० लाख वर्षांपेक्षाही कमी आहे. या शोधामुळे आपल्या पृथ्वीसह इतर ग्रहांची निर्मिती कशी झाली, याचा अभ्यास करण्यास



खगोलशास्त्रज्ञांना मोठी मदत होणार आहे.

'इलियास २-२४ बी' असे नाव देण्यात आलेल्या या ग्रहाचे वस्तुमान आपल्या गुरू ग्रहाच्या दोन ते चार पट जास्त आहे. हा ग्रह त्याच्या ताऱ्यापासून नेपच्यून ग्रहाच्या अंतरापेक्षा दुप्पट अंतरावर फिरत आहे. हा ग्रह पृथ्वीपासून सुमारे ४५० प्रकाशवर्षे दूर असलेल्या एका नव्या ताऱ्याभोवती फिरत आहे. २०१७ मध्ये खगोलशास्त्रज्ञांना या ग्रहाचे पहिले संकेत मिळाले होते. ताऱ्याच्या सभोवतालच्या वायू आणि धुळीच्या तबकडीमध्ये एक लहानशी पोकळी/गॅप दिसून आली होती. यावरून तेथे ग्रहाची निर्मिती होत असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला होता, परंतु त्यावेळी हा ग्रह थेट दिसत नव्हता.

'द ॲस्ट्रोफिजिकल जर्नल लेटर्स' मध्ये प्रसिद्ध झालेल्या अभ्यासानुसार, शास्त्रज्ञांनी जगातील तीन मोठ्या दुर्बिणींच्या (हवाईतील केक ऑब्झर्व्हेटरी, चिलीमधील अल्मा आणि व्हेरी लार्ज टेलिस्कोप) मदतीने एकत्र अभ्यास केला. या दुर्बिणींमुळे या ग्रहाचे थेट छायाचित्र घेणे आणि त्याचे वय १० लाख वर्षांपेक्षा कमी असल्याचे सिद्ध करणे शक्य झाले. "हा ग्रह आजवर शोधलेला सर्वात तरुण ग्रह आहे. तो अजूनही आपल्या सभोवतालच्या पदार्थांना स्वतःमध्ये शोषून घेत आहे. त्यामुळे ग्रहनिर्मितीचा असा टप्पा पाहायला मिळणे अत्यंत दुर्मीळ आहे," असे या अभ्यासाचे प्रमुख लेखक ॲंड्रिया बर्नार्डी यांनी सांगितले. हा नवा ग्रह आपल्या पृथ्वीपेक्षा तब्बल ५,००० पट लहान आहे. मानवाच्या सरासरी आयुष्याशी तुलना केली तर, 'इलियास २-२४ बी' हा ग्रह अवघ्या दोन किंवा तीन दिवसांच्या बाळासारखा आहे.

# बदलत्या नात्यांचा नवा पेच

जग झपाट्याने बदलत आहे. सध्या कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयचे युग आहे. बदलत्या तंत्रज्ञानाने माणसाचे अनेक व्यवहार सोपे केले असले, तरी त्याचवेळी नवी आव्हानेही तितक्याच ताकदीने समोर उभी केली आहेत. बदलत्या जीवनशैलीचा परिणाम कोणत्याही एका क्षेत्रापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो माणसाच्या नातेसंबंधांपर्यंत पोहोचला आहे. आजच्या तरुणाईसमोर 'लग्न' हा शब्द उच्चारला की नव्या नात्याची उत्सुकता कमी आणि भविष्याबद्दलची भीती अधिक जाणवते, असे म्हणण्यास वाव आहे. कारण याचा पुरावा आजचा समाजच आहे. याच मुद्द्याला हात घालून लेखक रवींद्र पांढरे यांनी 'घोडमुंजे' या पुस्तकातून लग्न ही संकल्पना किती भयंकर होत चालली आहे यावर अगदी सोप्या भाषेत प्रकाश टाकला आहे.

काळानुरूप बदलत जाणा-या समाजव्यवस्थेस धरून लेखकाने गाव- खेड्यातील भीषण परिस्थिती मांडली आहे. हुंडा प्रथा, शेतक?याचा आक्रोश, सरकारी कारभार, संसाराचा गाडा याबाबत केलेली विस्तृत मांडणी सगळ्यांनाच विचार करायला भाग पाडणारी आहे. लग्न म्हणजे 'मोठं आव्हानच गड्या' ही सर्वसामान्य लोकांची भावना झालेली आहे. शहर असो वा ग्रामीण भाग, या बदलाला कोणीही अपवाद नाही. आजच्या पिढीचा लग्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन पूर्वीच्या पिढीपेक्षा पूर्णपणे वेगळा आहे. वाढते घटस्फोटाचे प्रमाण, नात्यांमधील वाढती दरी, करिअरला दिले जाणारे प्राधान्य, आर्थिक स्वावलंबन आणि बदललेल्या अपेक्षा यामुळे विवाहसंस्थेसमोरच नवे प्रश्न उभे राहिले आहेत. त्यात मुलींच्या बदलत चाललेल्या अपेक्षा यामुळे यात अधिकच भर पडते आहे.

'लग्नाळू मुलगा असूनही लग्न जमत नाही' ही समस्या आता अनेक कुटुंबांसमोर उभी आहे. विशेषत ग्रामीण भागातील अनेक तरुण वयाची चाळिशी ओलांडली तरी योग्य जोडीदाराच्या शोधात आहेत. यामागे अनेक कारणे आहेत. मुलींच्या अपेक्षा वाढल्या आहेत, असे म्हणण्यापेक्षा त्या बदलल्या आहेत, असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. एक काळ असा होता की, घरची शेतीवाडी, गुरेढोरे आणि स्थिर उत्पन्न असले की मुलाचे लग्न सहज जुळत असे. ग्रामीण भागातील कुटुंबात सून येणे हा सामाजिक प्रतिष्ठेचा भाग मानला जात असे. मात्र, आता परिस्थिती



कमालीची बदलली आहे. शेती, जमीन-जुमला आणि पारंपरिक व्यवसायापेक्षा शिक्षण, नोकरी, नियमित उत्पन्न, शहरातील वास्तव आणि आधुनिक जीवनशैलीला अधिक महत्त्व दिले जात आहे.

ग्रामीण भागातील तरुण अशिक्षित आहेत, असे चित्र दुर्मिळ आहे. अनेक तरुण उच्चशिक्षित आहेत. मात्र, शेती किंवा पारंपरिक व्यवसाय करणा?या मुलांकडे आजही काही वेळा दुय्यम नजरेने पाहिले जाते. त्याउलट शहरातील 'व्हाईट कॉलर' नोकरी करणारे तरुण मुलींना अधिक आकर्षक वाटतात. यामध्ये मुलींचाही दोष म्हणता येणार नाही. बदलत्या जीवनशैलीत आर्थिक स्थैर्य, सुरक्षित भविष्य आणि समान विचारसरणी यांना महत्त्व मिळणे स्वाभाविक आहे. मात्र, या सगळ्या बदलांमध्ये एक महत्त्वाचा प्रश्न कायम आहे, लग्न नेमके हवे कशासाठी? केवळ सामाजिक परंपरा म्हणून, की दोन व्यक्तींनी एकमेकांच्या सोबतीने आयुष्य घडवण्यासाठी? आज तरुण-तरुणी लग्नाचा निर्णय अधिक विचारपूर्वक घेत आहेत. 'समाज काय म्हणेल?' यापेक्षा 'माझ्यासाठी योग्य काय?' हा प्रश्न महत्त्वाचा ठरत आहे. त्यामुळे विवाहाचे वय वाढत आहे, जोडीदार निवडताना निकष बदलत आहेत आणि अनेक जण लग्न करण्यापेक्षा एकटे राहण्यालाही प्राधान्य देत आहेत.

विवाहसंस्था संपत चालली आहे, असे सरसकट म्हणणे कदाचित घाईचे ठरेल. पण, तरुणाई लग्नाबद्दल कसा विचार करते, भीती, आव्हाने, घुसमट, समाजाचा दबाव हे सगळं चित्र 'घोडमुंजे' पुस्तकातून अनुभवता येते. पूर्वी कुटुंब आणि समाज ठरवत असलेले लग्न आज व्यक्ती स्वतच्या आयुष्याचा निर्णय म्हणून पाहत आहे. त्यामुळे 'लग्न जमेना' हा केवळ मुलगा किंवा मुलीचा प्रश्न राहिलेला नसून बदलत्या समाजव्यवस्थेचे ते एक महत्त्वाचे प्रतिबिंब बनले आहे. कदाचित लग्न इतिहासजमा होणार नाही; पण लग्नाची व्याख्या, त्यामागची कारणे आणि नात्याकडून असलेल्या अपेक्षा मात्र इतिहासात नक्कीच बदलल्या आहेत. हा बदल समजून घेणे हीच आजच्या समाजासमोरील खरी गरज आहे.

लग्नसंस्था हा समाजव्यवस्थेचा अविभाज्य भाग असताना सध्याच्या काळात मात्र या संकल्पनेविषयी तरुणांच्या मनात संभ्रम वाढत चालला आहे. त्यातच 'मॉडर्न लाईफस्टाईल'ला प्राधान्य देणा-या समाजामुळे ग्रामीण भागातील विशेषतः शेतक-यांच्या मुलाला भविष्याविषयीची स्वाभाविक काळजी आहे हे तितकेच खरे.

# गाझात दोन पोती पिठाच्या बदल्यात मुलीचं लग्न

गाझामध्ये सुरू असलेल्या युद्धाचे दुष्परिणाम आणि त्याच्या झळा आता कमी झाल्या असतील, असा अनेकांचा होरा आहे; पण या युद्धाचे भयावह परिणाम हळूहळू बाहेर येत आहेत. या युद्धाचा सर्वाधिक गंभीर परिणाम महिला आणि मुलींवर होत आहे. किती भयानक असावेत हे परिणाम? उपासमार, गरिबी, बदनामी, विस्थापन आणि असुरक्षितता.. यांसारख्या कारणांमुळे जेरीस आलेल्या एका पालकानं आपल्या १४ वर्षांच्या मुलीचं लग्न नुकतंच दोन पोती पिठाच्या बदल्यात लावून दिलं! या घटनेमुळे संपूर्ण जगात खळबळ माजली आहे.

अर्थात ही आणि अशा प्रकारची घटना पहिलीच नाही. अशा अनेक घटना येथे सर्रास घडत आहेत. संयुक्त राष्ट्र लोकसंख्या निधीच्या ताज्या अहवालातून ही गोष्ट स्पष्ट झाली आहे. बालविवाह आणि जबरदस्तीच्या विवाहांचं प्रमाण इथे प्रचंड प्रमाणात वाढलं आहे.

ज्या व्यक्तीनं बलात्कार केला, त्याच्याशीच आपल्या मुलीचं लग्न लावून देण्याचं प्रमाणही इथे वाढतं आहे. मुलीची आणि कुटुंबाची बदनामी होण्यापेक्षा हे जास्त श्रेयस्कर असं अनेक पालकांना वाटतं आहे. काही प्रकरणांत पीडित मुलींना आरोपीशीच बळजबरी लग्न करण्यासही बाध्य करण्यात आलं. गाझामध्ये बालविवाह आणि जबरदस्तीच्या विवाहांच्या नोंदवलेल्या प्रकरणांत तब्बल १२३ टक्के वाढ झाली आहे.

हा अहवाल गाझामध्ये काम करणाऱ्या १० संस्थांकडून मिळालेल्या माहितीवर आधारित आहे. महिलांनी सांगितलेल्या माहितीनुसार, बलात्काराच्या घटना तंबूंमध्ये, आश्रयस्थान म्हणून वापरल्या जाणाऱ्या शाळांमध्ये, रस्त्यांवर आणि समुद्रकिनाऱ्याजवळही घडल्या. काही प्रकरणांमध्ये आरोपी पीडितेला ओळखत असल्यामुळे घटना लपवण्याचा प्रयत्न झाला.

अशा अनेक घटना आहेत, ज्यामुळे पालकही एका वेगळ्याच मनोवस्थेतून जात आहेत. एका अपंग मुलीचा ठावठिकाणा लागत नव्हता. ती परत आल्यानंतर सुमारे दोन महिन्यांनी ती गर्भवती असल्याचं समोर आलं. युद्धात पालक गमावलेल्या १४ आणि १५ वर्षांच्या दोन मुलींचं त्यांच्या काकांनी लग्न लावून दिल्याचं एका महिलेने सांगितलं. पालकांचं संरक्षण नसल्यामुळे अनेक मुलींना बालविवाहात ढकलण्यात आलं आहे. कुटुंबाच्या आतही लैंगिक हिंसेची बरीच प्रकरणं समोर आली आहेत. युद्धामुळे घरं उद्ध्वस्त झाली, रोजगार गेला, गरिबी वाढली आणि वारंवार विस्थापन झालं. या परिस्थितीचा मानसिक ताण पुरुषांच्या वर्तनावरही दिसतो आहे. बरेच पुरुष आपला राग पत्नी आणि मुलांवर काढत आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आकडेवारीनुसार, लैंगिक हिंसेच्या घटनांत ६१ टक्क्यांची वाढ झाली आहे.

यात १८ ते ५९ वर्षांच्या महिलांचं प्रमाण सर्वाधिक आहे. एप्रिल ते जून २०२६ या कालावधीत महिला आणि मुलींविरुद्ध नोंदवलेल्या लैंगिक हिंसेच्या एकूण घटनांमध्ये २७ टक्क्यांची वाढ झाली. भावनिक हिंसेची प्रकरणं ३०.९ टक्के, तर शारीरिक हल्ल्यांची प्रकरणं ३०.५ टक्के होती.

# हतबल झालेल्या रडवेल्या शेतकऱ्यांसाठी तिजोऱ्या खोला...

"एल निनो' मुळे पाऊस गायब झाला. महाराष्ट्र तीव्र दुष्काळाच्या उंबरठ्यावर आहे. त्याची सर्वाधिक झळ मराठवाडा, विदर्भाला जाणवते आहे. नदी-नाले कोरडे आहेत. धरण, तलावांमध्ये अर्धाही साठा नाही. उन्हाळ्यात या दुष्काळाचे चटके सर्वत्रच बसतील. १९७४ पासून महाराष्ट्र दुष्काळाचा सामना करतो आहे. गेल्या सात-आठ वर्षांपासून तर दरवर्षीच दुष्काळी स्थिती आहे.

२६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला. त्यात आणखी ४३ तालुक्यांची भर पडली. तसा जीआरही निघाला. पंचनामे सुरू झाले आहेत. शेतातील पीक कापू नका, नांगर फिरवू नका, अन्यथा पीक विमा मिळण्यात अडचणी येतील, असे प्रशासन सांगत आहे. परंतु, मदतीचे स्वरूप काय असेल, ती नेमकी केव्हा मिळेल, हे अद्याप स्पष्ट नसल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप आहे. त्याचा सामना बांधावर जाणाऱ्या राजकीय मंडळींना करावा लागतो आहे. शेतकरी कधी ओल्या तर कधी कोरड्या दुष्काळाचा सामना करतो. शेतसारा, शिक्षण शुल्क, कृषिपंपाचे वीजबिल माफ यासारखी तात्पुरती मलमपट्टी केली जाते. शेतीचा विकास, पाणंद रस्ते, जमीन मोजणी, सिंचन, बांधबंदिस्ती, शेतीपूरक योजना या बाबी दुर्लक्षित राहिल्या. शेतकऱ्यांना आजही दर्जेदार बियाणे, खते, कीटकनाशके मिळत नाहीत. दरवर्षीच निकृष्ट बियाण्यांच्या हजारो तक्रारी शासन दरबारी दाखल होतात. राज्यात चार कृषी विद्यापीठे आहेत. मात्र तिथे संशोधनाचा आनंद इतका की, या विद्यापीठांचीच शेकडो एकर शेती पडीक आहे. शेतकऱ्याचे जीवनमान उंचावण्यासाठी उपयोगी पडेल, असे कृषी संशोधन खासगी क्षेत्रातही होताना दिसत नाही.



दुष्काळाच्या पाहणीचा 'शो' सुरू आहे. मंत्री, खासदार, आमदार, प्रशासन शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले आहेत. पंचनामे होत आहेत. त्यावर खुद्द शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या जाणार आहेत. शासकीय यंत्रणेला मुख्यालय सोडण्यास मनाई करण्यात आली आहे. सुट्या रद्द करण्यात आल्या आहेत. सरकार शेतकऱ्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे मंत्री, मुख्यमंत्री सांगत आहेत. मात्र, शेतकऱ्याला तसा अनुभव येतो आहे का? काजू-बदाम कल्चरमधून बाहेर येऊन व्हीआयपी ताफे कमी करून, खर्चात कपातीची सुरुवात स्वत:पासून करून तोच पैसा सरकारने दुष्काळात कोलमडलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा उभे करण्यासाठी वापरला, तरच शेतकऱ्याचा विश्वास बसेल.

सरकारला खरोखरच शेतकरी जगवायचा असेल तर दीर्घकालीन उपाययोजना हाती घेऊन त्या किमान सलग पाच वर्षांसाठी राबवाव्या लागतील. पाच टक्के अनुदानावर बियाणे, खते, कीटकनाशके, नाममात्र व्याज दरात दीर्घमुदत पीक कर्ज, रोजगार हमी योजनेतून शेतमजूर उपलब्ध करून देणे, त्यानंतरच त्यांना अन्नधान्यासह शासनाच्या विविध सवलतीच्या योजनांचा लाभ देणे, शेतीला दिवसा पूर्ण क्षमतेने पूर्णवेळ वीज, भक्कम हमीभाव, शेतातच मालाची कापणी, खरेदी आणि जागेवरच चुकाऱ्याची व्यवस्था निर्माण करणे अशा काही उपाययोजना शेतकऱ्यांना अपेक्षित आहेत.

शेतकऱ्याचीही वर्गवारी करणे गरजेचे आहे. ज्याचे पोट केवळ शेतीवर अवलंबून आहे, तोच खरा शेतकरी. शासनाने कोणताही लाभ देताना या शेतकऱ्यांचा प्राधान्याने विचार केला पाहिजे. हा शेतकरी मजुरीचे वाढलेले दर आणि घड्याळाच्या काट्यावर चालणाऱ्या मजुरांमुळे आधीच त्रासला आहे. या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे हेक्टरी १३ हजार ५०० च्या मदतीने काहीच होणार नाही. पंचनामे, सर्वेक्षण न करता नियम बाजूला ठेवून सरसकट हेक्टरी ५० हजारांची मदत मिळाली तरच तो तग धरू शकेल. रिअल इस्टेट, गुंतवणूक, फार्महाऊस किंवा टाईमपास म्हणून शेती करणाऱ्या, आयकर भरणाऱ्या 'शहरी शेतकऱ्यांची' वेगळी यादी करावी, त्यांना योजना व अनुदानाचा लाभ देण्याऐवजी तोच पैसा खऱ्या शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन उपाययोजनांवर खर्च करावा. सरकारने शेतकऱ्यातील खरा फरक ओळखणे गरजेचे आहे.

शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्यात राष्ट्रीयीकृत बँका यावर्षीही माघारल्या आहेत. कर्जमाफीचा गोंधळ आहे. कुठेच स्पष्टता नाही, माफी होऊनही पुन्हा व्याज आकारले जात आहे. अनधिकृत सावकाराच्याच दारी खुलेआम लूट सुरू आहे. दुष्काळाचा सामना करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना हाती घेतानाच सरकारचा फोकस शेतकरी जगवण्यावर असणे गरजेचे आहे. त्याला अन्नधान्य, तातडीची आर्थिक मदत व एकूणच जगण्याची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी लागेल. अर्थात, सरकारच्या मदतीलाही मर्यादा आहेत. शेतकऱ्यांची दसरा, दिवाळी अंधारात जाणार नाही, याची काळजी समाजालाही घ्यावी लागेल. दानपेट्या शिगोशीग भरलेली मंदिरे, उद्योजक, कॉर्पोरेट कंपन्यांनी आपल्या तिजोऱ्या खोलायची हीच वेळ आहे.

# ब्लॅक कॉफी पिण्याचा ट्रेंड

कॉफी पिण्याचे अनेक प्रकार आहेत. त्यापैकी दूध किंवा गरम पाण्यात कॉफी मिसळून पिणे हे सर्वाधिक सामान्य आहे. यांना साधारणपणे ब्लॅक कॉफी आणि मिल्क कॉफी असे म्हटले जाते. कॉफीचे शरीरासाठी काही फायदेही आहेत. मात्र, सध्या ब्लॅक कॉफीचा ट्रेंड वाढला आहे. विशेषतः यकृतावर अतिरिक्त चरबी जमा होऊ नये, यासाठी अनेक जण ब्लॅक कॉफीवर अधिक विश्वास ठेवत आहेत. सोशल मीडियामुळेही ब्लॅक कॉफीचा ट्रेंड वाढला आहे. आता ब्लॅक कॉफी केवळ पेय राहिलेले नसून फिटनेस कल्चरचा एक भाग बनले आहे. मात्र, दूध घालून कॉफी पिणाऱ्यांना त्यामुळे काही नुकसान होते का, असा प्रश्न उपस्थित होतो.

कॉफीमध्ये दूध घालून प्यायल्याने पोटाच्या समस्या निर्माण होतात का? दिवसभर गॅस किंवा ॲसिडिटीचा त्रास होऊ शकतो का? ही कॉफी कोणत्या लोकांनी सावधगिरीने प्यावी? दूध घातलेली कॉफी हानिकारक नाही. जर एखादी व्यक्ती दिवसातून एक किंवा दोन कप कॉफी घेत असेल आणि त्यात थोडे दूध व कमी साखर वापरत असेल, तर बहुतांश निरोगी व्यक्तींसाठी ती योग्य असू शकते. दूधामुळे कॉफीमध्ये प्रोटीन आणि कॅल्शियमचीही भर पडते. त्यामुळे



केवळ कॉफीमध्ये दूध आहे म्हणून ती आरोग्यासाठी अपायकारक आहे, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. कॉफीमध्ये जास्त प्रमाणात साखर, क्रीम किंवा सिरप मिसळले गेले किंवा दिवसभरात अनेक कप कॉफी प्यायली गेली तर समस्या निर्माण होऊ शकते. त्यामुळे रोजच्या आहारातील कॅलरी आणि साखरेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढू शकते.

काही लोकांना दूध पचवण्यास त्रास होतो. अशा व्यक्तींना दूध घातलेली कॉफी प्यायल्यानंतर गॅस, पोट फुगणे किंवा पोटात अस्वस्थता जाणवू शकते. फिटनेस आणि वजनाबाबत वाढलेली जागरूकता हे ब्लॅक कॉफी लोकप्रिय होण्याचे एक प्रमुख कारण आहे. साखर आणि क्रीम नसलेल्या ब्लॅक कॉफीमध्ये कॅलरीचे प्रमाण खूप कमी असते. त्यातील कॅफिनमुळे काही काळ अधिक सतर्क आणि सक्रिय वाटू शकते.

त्यामुळे जिम आणि फिटनेस कल्चरमध्येही ब्लॅक कॉफीला पसंती मिळत आहे.



# तरुण वयातच बिघडतेय हृदयाचे आरोग्य?

आरोग्य निरोगी ठेवायचे असेल तर, आपल्याला आपल्या दैनंदिन सवयींकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. आपल्या स्वयंपाकघरात अशा गोष्टी आहेत, ज्यांचा अतिवापर केल्यास हृदयाला गंभीर नुकसान पोहचू शकते. त्यामुळे या गोष्टींकडे वेळेवर लक्ष देणे आवश्यक आहे. आजकालच्या काळात तरुण वयातही लोकांना हृदयाशी संबंधित आजार होऊ लागले आहेत. आपले आरोग्य आणि खानपानाच्या चुकीच्या सवयींचा थेट परिणाम हृदयावर होतो. जाणून घ्या अशा कोणत्या गोष्टी आहेत ज्यांच्या अतिवापराणे हृदयावर परिणाम होण्याची शक्यता असते.

**मीठ**

जेवणात मीठ नसले की ते अळणी आणि बेचव लागते, परंतु जास्त प्रमाणात मिठाचे सेवन केल्यास रक्तदाब वाढू शकतो. रक्तदाब वाढल्यामुळे हृदयावर अतिरिक्त ताण पडतो, ज्यामुळे हृदयविकाराचा धोका वाढण्याची शक्याता असते.

**साखर**

अतिरिक्त साखरेचे सेवन केल्याने वजन वाढणे, लठ्ठपणा आणि शुगर होण्याचा धोका वाढतो. हे सर्व घटक पुढे जाऊन हृदयविकाराचे मुख्य कारण ठरू शकतात.

**रिफाइंड तेल**

आजकाल तिखट-मीठ किंवा तळलेले पदार्थ बनवण्यासाठी रिफाइंड तेलाचा वापर भरपूर प्रमाणात केला जातो. रिफाइंड तेलाचा गरजेपेक्षा जास्त वापर आहारामध्ये केल्याने अतीरिक्त चरबी वाढते. जी आपल्या हृदयासाठी अजिबात योग्य मानली जात नाही.

**मैदा**

मैद्यापासून बनवलेले पदार्थ जसे की बिस्किटे, पास्ता, पिझ्झा आणि ब्रेड आजकाल आरोग्याचे शत्रू बनत चालले आहेत. मैद्याचे सतत आणि जास्त सेवन संतुलित आहाराचा भाग नाही. यामुळे पचनसंस्थेवर वाईट परिणाम होतोच, पण हृदयालाही हानी पोहोचते.

**प्लास्टिकचे डबे/ कंटेनरचा वापर**

खाण्यापिण्याच्या वस्तूंव्यतिरिक्त किचनमध्ये वापरले जाणारे प्लास्टिकचे कंटेनर देखील हृदयासाठी हानिकारक ठरू शकतात.

गरम अन्न दीर्घकाळ प्लास्टिकच्या डब्यात ठेवल्यामुळे त्यातील हानिकारक रसायने अन्नात मिसळतात. त्यामुळे काच किंवा सुरक्षित पर्यायांचा वापर करावा.

हृदय निरोगी ठेवण्यासाठी रोजच्या जेवणात मीठ, साखर आणि तेलाचे प्रमाण नियंत्रित ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. यासोबतच ताजे आणि पौष्टिक अन्न खाण्याला प्राधान्य दिले पाहिजे.

खाण्यापीण्याच्या सवयी बदलण्यासोबतच दररोज नियमित शारीरिक व्यायाम करणे ही हृदयाच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे.

# Gen& Q च्या सुट्टीचा नवा ट्रेंड

आजची तरुण पिढी म्हणजेच Gen& Q सुट्टीचे नियोजन वेगळ्या पद्धतीने करत आहे. आता आधी एखादे ठिकाण ठरवण्याऐवजी अनुभवाला प्राधान्य दिले जात आहे. पूर्वी गोवा, जयपूर किंवा दुबईसारखे एखादे ठिकाण आधी निश्चित केले जायचे. त्यानंतर विमान आणि हॉटेल बुक केले जायचे आणि शेवटी तिथे काय करायचे, याची यादी तयार केली जायची. मात्र, उर्हं ने हा क्रम बदलला आहे. आता एखादा कॉन्सर्ट, म्युझिक फेस्टिव्हल, थीम पार्क, फूड एक्सपीरियन्स किंवा अन्य एखादा खास अनुभव हा प्रवासाचे कारण ठरू शकतो. त्यानंतर त्या अनुभवासाठी कोणत्या ठिकाणी जायचे, हे ठरवले जाते.

Gen& Q च्या २०२६ मधील संशोधनानुसार, १० पैकी ७ भारतीय Gen& Q प्रवासी एका मोठ्या वार्षिक सुट्टीपेक्षा तीन दिवसांच्या छोट्या सहलीला पसंती देतात. तसेच ८० टक्के जणांनी सांगितले की, प्रसिद्ध पर्यटनस्थळांपेक्षा प्रवासातील छोटे अनुभव त्यांच्यासाठी अधिक महत्त्वाचे आहेत.

या बदलाचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे संगीताशी संबंधित प्रवास. AiRnbच्या २०२६ च्या 'एक्सपीरियन्स-लेड ट्रॅव्हल इनसाइट्स'नुसार,



२०२६ मध्ये ६२ टक्के भारतीय Gen& Q प्रवाशांनी कॉन्सर्ट किंवा म्युझिक फेस्टिव्हलसाठी प्रवास करण्याचे नियोजन केले होते. तर ७६ टक्के जणांनी सांगितले की, एखाद्या कॉन्सर्ट किंवा फेस्टिव्हलमुळे ते पहिल्यांदाच एखाद्या शहरात गेले. यातील निम्म्याहून अधिक जणांनी त्या शहरात फिरण्यासाठी आपला मुक्कामही वाढवला.

यामुळे पर्यटनाचे स्वरूपही बदलत आहे. एखादा अनुभव हा प्रवासाचा सुरुवातीचा ट्रिगर ठरतो आणि त्यानंतर ते शहर त्या अनुभवाचा भाग बनते. उदाहरणार्थ, एखाद्या कॉन्सर्टचे तिकीट घेतल्यानंतर त्या शहरासाठी फ्लाइट आणि हॉटेल बुक केले जाते. त्यानंतर आसपासची कॅफे, बाजारपेठा आणि पर्यटनस्थळे शोधली जातात. म्हणजेच एखादा कार्यक्रम तरुणांना त्या शहरात घेऊन जातो आणि त्यानंतर शहर त्यांना आणखी काही दिवस तिथे थांबण्याचे कारण देते.

तीन दिवसांच्या सुट्टीचा ट्रेंड- प्रत्येक सुट्टीसाठी सात दिवस, तीन बॅगा आणि मोठी यादी आवश्यक नसते. एखाद्या प्रवासामागे स्पष्ट कारण असेल तर तीन दिवसांची छोटी सहलही पुरेशी ठरू शकते. कॉन्सर्टसाठी दुसऱ्या शहरात जाऊन एक रात्र अतिरिक्त मुक्काम करणे. थीम पार्कच्या आसपास वीकेंड ट्रिप करणे.

फूड फेस्टिव्हलसाठी रोड ट्रिप करणे. दोन रात्रींसाठी वेलनेस रिसॉर्टमध्ये मुक्काम करणे. क्रीडा स्पर्धेसाठी दुसऱ्या शहरात प्रवास करणे.

# डाळिंब हृदयासाठी अधिक फायदेशीर

जगभरातील अनेक हृदयविकाराचे रुग्ण प्रिझर्व्हड इजेक्शन फ्रॅक्शनसह हृदयविकार या समस्येने ग्रस्त असतात. या स्थितीत, हृदयाचे स्नायू कडक होतात आणि प्रत्येक ठोक्याच्या दरम्यान ते योग्यरित्या शिथिल होत नाहीत, ज्यामुळे हृदयातील रक्तप्रवाहात अडथळा येतो. ही स्थिती पूर्णपणे बरी होऊ शकत नसली तरी, ती नियंत्रणात ठेवता येते.

किंग्ज कॉलेज लंडन येथील शास्त्रज्ञांच्या संशोधनातून असे समोर आले आहे की, ही समस्या नियंत्रणात ठेवण्यासाठी डाळिंब फायदेशीर ठरू शकते. डाळिंब खाल्ल्यानंतर शरीरात तयार होणारे एक नैसर्गिक संयुग या आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांच्या हृदयाच्या कार्यात ८०ज्ञ् पर्यंत सुधारणा करू शकते, असा दावा या संशोधनात करण्यात आला आहे. हे संशोधन सायन्स ॲडव्हान्सेस या जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहे.

**हृदयविकार म्हणजे काय?**

हृदयविकाराचे दोन प्रकार आहेत. सामान्य हृदयविकारात, हृदयाचे स्नायू पातळ आणि कमकुवत होतात, ज्यामुळे हृदय प्रभावीपणे रक्त बाहेर पंप करू शकत नाही; याउलट, प्रिझर्व्हड इजेक्शन फ्रॅक्शनसह हृदयविकारात, स्नायू योग्यरित्या शिथिल होऊ शकत नाहीत ही समस्या असते. उच्च रक्तदाब, मधुमेह किंवा वाढते वय यांसारख्या परिस्थितींमुळे हृदयाच्या भिंती कडक होतात. परिणामी, दोन ठोक्यांच्या दरम्यान हृदयात पुरेसे रक्त भरत नाही, ज्यामुळे धाप लागणे, पायांना सूज येणे आणि पायऱ्या चढता न येणे यांसारखी लक्षणे दिसतात.

**डाळिंब हृदयासाठी कसे फायदेशीर ठरू शकते?**

किंग्स कॉलेज लंडनच्या संशोधकांनी डाळिंबाशी संबंधित एका नैसर्गिक संयुगाचा अभ्यास केला. 'युरोलिथिन ए' हे संयुग डाळिंबातील काही घटकांचे आतड्यांमधील चांगले बॅक्टेरिया विघटन केल्यानंतर शरीरात तयार होऊ शकते. संशोधकांनी या संयुगाची हृदय निकामी होण्याच्या गुंतागुंतीच्या मॉडेल्सवर चाचणी केली. या अभ्यासात असे दिसून आले की हे संयुग हृदयाचे कार्य ८०ज्ञ् पर्यंत सुधारू शकते. संशोधकांनी असे निरीक्षण केले की युरोलिथिन ए मुळे कडक झालेल्या हृदयाच्या स्नायूंच्या ऊती अधिक लवचिक झाल्या. तसेच हृदयाच्या ऊतींमध्ये तयार होणाऱ्या 'फायब्रोसिस' अर्थात कठीण व्रणयुक्त ऊतींचे प्रमाण कमी झाल्याचेही संशोधकांना आढळले.



**डाळिंबाचा रस प्यायल्याने हृदयविकार बरा होतो का?**

संशोधनात हे देखील स्पष्ट केले आहे की डाळिंब कोणत्याही आजारावर रामबाण उपाय नाही. शास्त्रज्ञांनी नमूद केले आहे की हा अभ्यास प्री-क्लिनिकल मॉडेल्स आणि प्रयोगशाळेतील ऊतींच्या नमुन्यांचा वापर करून करण्यात आला होता. याचा अर्थ असा नक्कीच नाही की, केवळ डाळिंब खाल्ल्याने किंवा त्याचा रस प्यायल्याने तुम्ही तुमच्या हृदयाशी संबंधित औषधे घेणे थांबवावे.

या अभ्यासातून असेही दिसून आले आहे की, डाळिंब खाल्ल्यानंतर प्रत्येकाच्या शरीरात 'युरोलिथिन ए' तयार होत नाही; ही प्रक्रिया पूर्णपणे त्या व्यक्तीच्या आतड्यांमधील सूक्ष्मजीवांवर अवलंबून असते. मात्र, या संशोधनाचा एक मोठा फायदा म्हणजे शास्त्रज्ञ आता 'युरोलिथिन ए' चा वापर करून औषधे विकसित करू शकतील.

# द्राक्ष अन् मनुक्याचा ...

आयुर्वेद हे जगातील पहिले औषध शास्त्र म्हणून मानण्यात येत आहे. फळ, भाज्या आणि सुका मेवा यांच्या औषधी गुणांचा उल्लेख हा आयुर्वेदशास्त्रात प्रामुख्याने येतो. लोकांना ड्राय फ्रुट्स हे एक स्वादिष्ट फळ म्हणूनच परिचीत आहे. मात्र आयुर्वेदानुसार द्राक्ष वर्गातील झाडे हे शरीराच्या तीनही दोष वाद, पित्त आणि कफ यांना नियंत्रित करण्याची क्षमता ठेवतात.

पत्त शमनासाठी, पचन सुधारण्यासाठी आणि रक्त शुद्धीकरण्यासाठी द्राक्ष वर्गातील फळांचे नियमीत सेवन प्रभावी ठरते. आयुर्वेदिक डॉक्टारांच्या मते आयुर्वेदिक ग्रंथामध्ये द्राक्ष आणि मनुका यांचा खास उल्लेख येतो. काळी द्राक्षे वाढवून मनुका तयार केल्या जातात. आयुर्वेदानुसार द्राक्षाला श्रेष्ठ फळ म्हणून दर्जा प्राप्त आहे. चवीला गोड आणि थंड प्रकृतीच्या द्राक्ष आणि मनुका यांच्या सेवनाने काय फायदे होतात हे पाहुयात.

**द्राक्ष आणि मनुका**

द्राक्ष ताज्या फळात मोडते. त्यात पाण्याची मात्र जास्त असते. आयुर्वेदानुसार द्राक्षाला थंड आणि ताजेपणा देणारे फळ मानले गेले आहे. तर मनुका हे वाळवलेले काळे द्राक्ष फळ आहे. त्यात पोषक तत्वे आणि नैसर्गिक साखर अधिक प्रमाणात असते.

**द्राक्षाचे फायदे**

आयुर्वेदानुसार द्राक्ष फळ हे गोड, शीतल आणि शरीराला पोषण देणारे फळ मानलं गेलं आहे. पारंपरिक स्वरूपात ते पित्त आणि शरीराच्या उष्णतेशी जोडले गेलेल्या समस्या दूर करते. द्राक्षाचे सेवन केल्याने थकवा, अशक्तपणा, जास्त तहाण, घसा कोरडा पडणे आणि शरीरातील जळजळ या समस्यांवर प्रभावी ठरते. आयुर्वेदानुसार द्राक्ष बद्धकोष्ठता आणि पचनासंदर्भातील समस्यांवर उपयोगी पडते.

# लोक झोपेत का बडबडतात?

एखाद्या व्यक्तीला झोपेत बडबडताना पाहिले किंवा ऐकले की अनेकांना आश्चर्य वाटते. झोपेत असताना माणूस बोलतो तरी का, असा प्रश्नही सहज पडतो. याच कारणाचा शोध घेण्यासाठी वेळोवेळी विविध अभ्यास करण्यात आले आहेत. झोपेत बडबडण्यामागे अनेक कारणे असू शकतात, असे संशोधनातून समोर आले आहे.

याबाबत असेही सांगितले जाते की, झोपेत मेंदू पूर्णपणे बंद होत नाही; काही लोकांमध्ये, मेंदूला शांत ठेवणाऱ्या भागांपेक्षा बोलण्यासाठी जबाबदार असलेले भाग अधिक काळ सक्रिय राहतात.

**दोन तृतीयांशपेक्षा अधिक लोक झोपेत बोलतात**

संशोधनानुसार, दोन तृतीयांशपेक्षा अधिक लोक आयुष्यात कधी ना कधी झोपेत बोलतात किंवा बडबडतात. सामान्यतः ही बाब चिंतेचे कारण मानली जात नाही. मात्र, काही वेळा झोपेत बोलण्याबरोबरच पॅरासोमनिया म्हणजेच झोपेत चालणे किंवा झोपेशी संबंधित इतर असामान्य वर्तन होण्याची शक्यता वाढू शकते.

**झोपेत मेंदूत नेमकं काय सुरू असतं?**

विज्ञानाच्या मते, झोपेत बोलण्याची घटना तेव्हा घडू शकते, जेव्हा भाषा आणि बोलण्याशी संबंधित मेंदूचे भाग सक्रिय असतात, तर मेंदूचे इतर भाग झोपेच्या अवस्थेत असतात. बहुतेक वेळा झोपेत बोलताना स्पष्ट शब्द ऐकू येत नाहीत. त्याऐवजी अस्पष्ट बडबड, हसणे किंवा कुजबुजणे असे प्रकार दिसतात. मात्र, एखादी व्यक्ती झोपेत स्पष्टपणे बोलत असेल, तर त्यात 'नाही' हा शब्द सर्वाधिक वेळा ऐकू येतो, असे संशोधनातून दिसून आले आहे.

**वयानुसार बदलते झोपेचे स्वरूप**

संशोधकांच्या मते, झोपेत बोलण्याची घटना तुलनेने सामान्य आहे. काही अभ्यासांमध्ये असे आढळून आले आहे की, झोपेत बोलणारी व्यक्ती सुमारे निम्म्या वेळा



तिला विचारलेल्या प्रश्नाला किंवा केलेल्या विधानाला उत्तर देऊ शकते. झोपेत बोलणे किंवा बडबडणे ही घटना लहान मुलांमध्ये अधिक सामान्य असल्याचे संशोधकांचे म्हणणे आहे. असे का होते, याचे निश्चित कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, मुलांमध्ये स्लो-वेव्ह नॉन-रॅपिड आय मूव्हमेंट झोपेचे प्रमाण अधिक असते. वय वाढत जाते तसे या प्रकारच्या गाढ झोपेचे प्रमाण कमी होत जाते. त्यामुळे झोपेच्या रचनेत होणाऱ्या या बदलामुळे वयानुसार झोपेत बडबडण्याचे प्रमाणही कमी होत असावे, असा अंदाज व्यक्त केला जातो.

**थकवा वाढला की झोपेत बोलण्याची शक्यता अधिक**

झोपेत बोलणे तसेच पॅरासोमनियाशी संबंधित इतर घटना व्यक्ती अत्यंत थकलेली असताना अधिक प्रमाणात घडू शकतात, असे वैज्ञानिकांना आढळले आहे. त्यामुळे एखादी व्यक्ती झोपेत बडबडत असेल, तर लगेच चिंता करण्याचे कारण नाही. उलट, शरीराला आणि मेंदूला आणखी विश्रांतीची गरज असल्याचे ते एक संकेत असू शकते.

**झोपेत शरीर आणि मेंदूत नेमके काय घडते?**

झोपेचा साधारण एक चतुर्थांश भाग 'आरईएम' (Rapid Eye Movement) अवस्थेत जातो. याच अवस्थेत बहुतांश वेळा अत्यंत जिवंत वाटणारी आणि स्पष्ट स्वप्ने पडतात. याउलट 'नॉन-आरईएम' झोपेचा कालावधी सुमारे ७५ ते ८० टक्के असतो. यामध्ये गाढ झोपेच्या अवस्थेचाही समावेश होतो. गाढ झोप हा शरीरासाठी अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. या काळात शरीराची अनेक कार्ये मंदावतात आणि शरीराला विश्रांती घेण्यास तसेच स्वतःची दुरुस्ती करण्यास वेळ मिळतो. दररोज रात्री लोक साधारणपणे ९० मिनिटांच्या अंतराने या विविध टप्प्यांतून जात असतात. झोप लागल्यानंतरच्या सुरुवातीच्या काळात 'नॉन-आरईएम' झोपेचे प्रमाण अधिक असते, तर पहाटेच्या वेळी 'आरईएम' झोपेचे प्रमाण वाढते.

आठवणी मजबूत करण्यापासून रोगप्रतिकारक शक्तीपर्यंत...

संशोधनानुसार, शरीर आणि मेंदूसाठी झोप अत्यंत महत्त्वाची आहे. झोपेत असताना दिवसभरातील अनेक आठवणी अधिक मजबूत होतात आणि त्या दीर्घकाळ स्मरणात राहण्यास मदत होते. मुलांच्या वाढीसाठीही झोप महत्त्वाची असते. याशिवाय झोपेच्या काळात शरीराची रोगप्रतिकारक यंत्रणा अधिक सक्रिय राहते.

म्हणूनच झोप हा केवळ विश्रांतीचा काळ नसून, मेंदू आणि शरीराला पुन्हा ऊर्जा मिळवून देण्याबरोबरच त्यांची दुरुस्ती आणि देखभाल करण्यासाठीचा महत्त्वाचा कालावधी आहे.

# शनि ग्रह पाहण्यासाठी चालू आठवडा वर्षातील सर्वोत्तम

चालू आठवड्यात शनि ग्रह आपल्या वार्षिक 'ऑपोझिशन' (सूर्य आणि पृथ्वी यांच्या एकाच रेषेत येण्याची स्थिती) टप्प्यात पोहोचत आहे. यामुळे वर्षभरात शनि ग्रह आजवरचा सर्वात मोठा आणि तेजस्वी दिसेल, तसेच रात्रभर आकाशात स्पष्ट दिसणारा हा एकमेव ग्रह ठरेल.

खगोलप्रेमींसाठी हा एक अत्यंत महत्त्वाचा काळ असून, याचा संबंध शनिच्या सूर्याभोवतीच्या भ्रमणापेक्षा पृथ्वीच्या कक्षेतील स्थानाशी अधिक आहे.

जेव्हा पृथ्वी सूर्य आणि दुसऱ्या ग्रहाच्या (या प्रकरणात शनि) अगदी मध्ये येते, तेव्हा ही 'ऑपोझिशन' स्थिती निर्माण होते.

या काळात पृथ्वीवरून पाहिल्यास शनि ग्रह पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे सूर्याच्या अगदी विरुद्ध दिशेला असतो. त्यामुळे संध्याकाळी सूर्य अस्ताला जाताच शनि पूर्व क्षितिजावर उगवतो, मध्यरात्री आकाशात सर्वात उंच स्थानावर पोहोचतो आणि पहाटे सूर्योदयाच्या वेळी पश्चिम क्षितिजावर मावळतो.



यंदाची ही 'ऑपोझिशन' स्थिती रविवारी (४ ऑक्टोबर) निर्माण होत आहे.

त्यामुळे पुढील व मागील काही आठवडे शनि ग्रह पाहण्यासाठी अतिशय उत्तम मानले जातात.

यादरम्यान शनि पृथ्वीपासून सुमारे १२६ कोटी किलोमीटर (७८४ दशलक्ष मैल) अंतरावर, म्हणजेच तुलनेने जवळ असेल. टेलिस्कोपमधून पाहिल्यास त्याचा आकार सर्वात मोठा आणि त्याचा फिकट पिवळा प्रकाश नेहमीपेक्षा अधिक तेजस्वी दिसेल.

शनिला आकाशात शोधण्यासाठी कोणत्याही उपकरणाची गरज भासणार नाही. निरभ्र आकाशात 'मीन' आणि 'केटस' या तारकासमूहांच्या दरम्यान शनि ग्रह एका तेजस्वी व स्थिर दिव्यासारखा साध्या डोळ्यांनी सहज ओळखता येईल.

एकदा शनि ग्रह सापडल्यानंतर, त्याच्याभोवती असणाऱ्या सुंदर कड्या स्पष्टपणे पाहण्यासाठी टेलिस्कोपचा वापर करणे सर्वोत्तम ठरेल.

पहिल्यांदाच शनिची कडी पाहणे हा खगोल प्रेमींसाठी एक अविस्मरणीय अनुभव असतो. मोठ्या क्षमतेच्या टेलिस्कोपच्या मदतीने शनिचा सर्वात मोठा चंद्र 'टायटन' आणि इतर काही उपग्रहही पाहता येतील, मात्र एका साध्या कौटुंबिक टेलिस्कोपमधूनही शनिची कडी अत्यंत स्पष्टपणे दिसून येतात.

# ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये महागाईचा कडेलोट!

जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर, चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीत महागाईचा पारा तीव्रतेने चढत जाण्याची शक्यता 'एसबीआय रिसर्च'ने जाहीर केलेल्या पूर्व-पतधोरण अहवालात व्यक्त केली आहे. सप्टेंबर महिन्यात किरकोळ महागाई दर वाढून ५.६५ टक्क्यांवर पोहोचेल, तर ऐन सणासुदीत म्हणजे ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यात हा दर ६.५ टक्क्यांची मजल गाठेल, असाही अहवालाचा इशारा आहे.



वाढती महागाई, जागतिक आव्हाने आणि रुपयावर असलेला ताण यांमुळे रिझर्व्ह बँक येत्या आठवड्यात ५ ते ७ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या पतधोरण समितीच्या बैठकीत रेपो दरात किमान २५ आधार बिंदूंची (पाव टक्का) वाढ करेल, असा अंदाज देशातील सर्वात मोठ्या बँकेच्या अर्थतज्ज्ञांनी या अहवालातून वर्तवला आहे. म्हणजे सध्या ५.२५ टक्के असलेला रेपो दर लवकरच ५.५ टक्क्यांवर जाण्याची शक्यता आहे.

या आधी ऑगस्ट महिन्यात किरकोळ महागाई दर वाढून ४.८२ टक्क्यांवर पोहोचला आहे. विशेष म्हणजे, नवीन आधारभूत वर्षानुसार मालिकेत महागाई मोजण्यासाठी गृहीत धरल्या जाणाऱ्या वस्तूंची व्याप्ती वाढली आहे. जानेवारीत केवळ २२ वस्तूंमुळे ९० टक्के महागाई ठरत होती, ती संख्या ऑगस्टमध्ये वाढून ५१ वर पोहोचली आहे. म्हणजेच महागाईचे मापन अधिक सर्वसमावेशक बनले आहे.

यावर्षी नैऋत्य मोसमी पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या ८७ टक्क्यांवर राहिला असून, देशातील ४३ टक्के जिल्ह्यांमध्ये अपुरा पाऊस पडला आहे. एल निनोची तीव्र स्थिती आणि ऑक्टोबरमधील कमी पाऊस यामुळे रबी पिकांवर आणि पर्यायाने अन्नधान्याच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढण्याची भीती अहवालाने व्यक्त केली आहे.

'जीडीपी' वाढीच्या अंदाजात कपात शक्य

मजबूत अमेरिकन डॉलर, जागतिक तेल भडक्याने तेल कंपन्यांची परकीय चलनाची वाढलेली मागणी आणि परकीय गुंतवणूकदारांकडून सुरू असलेली सततची विक्री यांमुळे रुपयावर मोठा ताण आला आहे. या सर्व आव्हानांचा विचार करता 'एसबीआय रिसर्च'च्या मते, रिझर्व्ह बँकेकडून यंदाच्या बैठकीत आर्थिक वर्ष २०२७ साठीचा सकल राष्ट्रीय उत्पादन अर्थात जीडीपी वाढीचा अंदाज ३० आधार बिंदूंनी (०.३० टक्के) आणि महागाईचा अंदाज २० आधार बिंदूंनी (०.२० टक्के) वाढवण्याची शक्यता आहे. वाढत्या महागाईला लगाम घालण्यासाठी रिझर्व्ह बँकेने आजवर रेटलेली 'तटस्थ' धोरणाची भूमिकाही बाजूला सारून व्याजदर वाढवण्याच्या दिशेने पाऊल टाकावे लागू शकते.

# शेअर बाजारात हाहाकार!

भारतीय शेअर बाजारात गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने घसरण होत आहे. या घसरणीमुळे गुंतवणूकदारांना लाखो कोटी रुपयांचा फटका बसला आहे. बाजारातील घसरणीचा परिणामी म्युच्युअल फंडांनाही मोठा फटका बसला आहे. सप्टेंबर २०२६ मध्ये स्मॉल-कॅप म्युच्युअल फंडांमध्ये मोठ्या प्रमाणावर विक्री झाली आली आहे. यामध्ये केवळ चार फंडांनाच सकारात्मक मासिक परतावा मिळवता आला. सप्टेंबर या श्रेणीत २.५९३ ची घसरण झाली, तरीही बहुतांश फंड्सनी गेल्या वर्षभरात सकारात्मक कामगिरी कायम राखली आगे.



'व्हॅल्यू रिसर्च'च्या सप्टेंबर २०२६ अखेरच्या आकडेवारानुसार, ६.२०% परताव्यासह 'सॅमको स्मॉल कॅप फंड' सप्टेंबरमधील कामगिरीच्या यादीत अव्वल स्थानी राहिला. त्यानंतर 'बँक ऑफ इंडिया स्मॉल कॅप फंड' १.१२% परतावा, 'टाटा स्मॉल कॅप फंड' ०.७७%परतावा आणि 'ग्रो स्मॉल कॅप फंड' ०.२०% परतावा यांचा क्रमांक लागला.

या श्रेणीतील इतर सर्व फंडांनी महिन्याभरात नकारात्मक परतावा नोंदवला. 'क्वांट स्मॉल कॅप फंड'मध्ये ०.७४% ची घट झाली, तर 'बंधन स्मॉल कॅप फंड' ०.८५% आणि 'आयसीआयसीआय प्रुडेन्शियल स्मॉल कॅप फंड' ०.९९३नी घसरले.

घसरण झालेल्या फंडांमध्ये 'एडेलवाईस स्मॉल कॅप फंड'मध्ये सर्वाधिक म्हणजे ५.०३% ची घसरण दिसून आली. 'यूटीआय स्मॉल कॅप फंड' ४.२२% नी, तर 'एसबीआय स्मॉल कॅप फंड' ३.७९% नी घसरला. 'कॅनरा रोबेको स्मॉल कॅप फंड' आणि 'इनव्हेस्को इंडिया स्मॉल कॅप फंड'मध्ये अनुक्रमे ३.८९% आणि ३.३०% ची घट झाली.

सप्टेंबरमधील कामगिरी कमकुवत असूनही, एका वर्षाचे एकूण चित्र बऱ्यापैकी सकारात्मक आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, 'स्मॉल-कॅप फंड' श्रेणीने एका वर्षात ९.९२% परतावा दिला आहे. ज्या फंडांची आकडेवारी उपलब्ध आहे, त्यापैकी 'बँक ऑफ इंडिया स्मॉल-कॅप फंड'ने २९.२५% इतका सर्वाधिक वार्षिक परतावा नोंदवला. त्यापाठोपाठ 'ट्रस्ट एमएफ स्मॉल-कॅप फंड'चा क्रमांक लागतो. ज्याने २९.१४%परतावा दिला. 'मोतीलाल ओसवाल स्मॉल-कॅप फंड'ने २०.८८% परतावा दिला, तर 'युनियन स्मॉल-कॅप फंड'चा परतावा २०.५५% राहिला.

# द ऑक्सबो

निसर्गाची दोन टोकाची, विसंगत रूपं एकत्रित दर्शवणारे हे प्रसिद्ध 'द ऑक्सबो' चित्र. अमेरिकेतल्या थॉमस कोल या चित्रकारानं निसर्गाचे हे रूप कॅनव्हासवर इतक्या जिवंत आणि नाट्यमय पद्धतीनं रंगवलं की, ते चित्र जागतिक कलाविश्वातला एक मैलाचा दगड ठरलं.

कल्पना करा, आपण पावसाळ्याच्या दिवसांत महाबळेश्वरच्या किंवा माथेरानच्या एखाद्या उत्तुंग कड्यावर उभे आहोत आणि समोर पाहत आहोत. आपल्याला डाव्या बाजूला घनदाट, काळाकुट्ट, अंगावर काटा आणणारा दाट सह्याद्रीचा रानपायथा दिसतोय; तिथे अचानक आभाळ फाटून विजा कडाडत आहेत, वाऱ्याच्या वेगानं भलीमोठी झाडं उन्मळून पडत आहेत आणि पावसाचं रौद्र तांडव सुरू आहे. पण त्याचक्षणी, आपण उजव्या बाजूला पाहिलं, तर खाली पसरलेल्या नदीच्या खोऱ्यात सोनेरी कोवळं ऊन पडलंय. तिथे शांतपणे शेती चालू आहे, धुराड्यांतून संथ धूर निघतोय, नदी अगदी शांत संथपणे वळणे घेत वाहत आहे आणि एक आल्हाददायक प्रसन्न शांतता नांदत आहे!

एकाच वेळी एकाच जागेवरून पाहिलेली ही निसर्गाची दोन टोकाची, विसंगत रूपं. एकीकडे भयानक वादळ आणि दुसरीकडे स्वर्गीय शांतता! ही विसंगती पहिली की आपण नकळत अंतर्मुख होतो. आजपासून जवळपास दोनशे वर्षांपूर्वी, अमेरिकेतल्या थॉमस कोल नावाच्या चित्रकारानं नेमकं हेच दृश्य कॅनव्हासवर इतक्या जिवंत आणि नाट्यमय पद्धतीनं रंगवलं की, ते चित्र जागतिक कलाविश्वातला एक मैलाचा दगड ठरलं. त्या चित्राचं नाव आहे- 'द ऑक्सबो.'

### भविष्यफल सेवा

बालपण संघर्षात गेलेल्या कोलनं अमेरिकेमध्ये चित्रकलेमधली 'हडसन रिव्हर स्कूल' नावाची चळवळ सुरू केली. ही अमेरिकन कला इतिहासातली पहिली आणि अत्यंत महत्त्वाची चित्रकला चळवळ होती. या चळवळीमध्ये चित्रकारांनी अमेरिकेतल्या निसर्गाचं अथांग आणि नयनरम्य सौंदर्य आपल्या कॅनव्हासवर उतरवलं.



'द ऑक्सबो' हे चित्र समजून घेण्यासाठी आपल्याला १८३० च्या दशकातली अमेरिका समजून घ्यावी लागेल. या काळात अमेरिका अत्यंत झपाट्यानं बदलत होती. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष अँड्र्यू जॅक्सन यांच्या नेतृत्वाखाली देशात भांडवलशाही आणि विकासाची एक अभूतपूर्व लाट आली होती. त्यांची विकासाची विचारसरणी सरळ होती – 'या संपूर्ण खंडातली जंगलं तोडणं, इथल्या मूळ रहिवाशांना (रेड इंडियन्स) हुसकावून लावणं, नद्या अडवणं, खाणी खोदणं आणि निसर्गावर विजय मिळवून तिथे कारखाने व शहरं वसवणं हा आमचा दैवी अधिकार आहे!' या काळात तिथले लोक कुऱ्हाडी घेऊन जंगलांवर तुटून पडत होते. रेल्वेच्या रुळांचं जाळं पसरत होते. जंगलं साफ करून तिथे शेतं आणि शहरं उभी राहत होती.

त्या दिवसांत कोल एका श्रीमंत व्यक्तीसाठी एक चित्रमालिका रंगवत होता. या चित्रमालिकेत त्याला एका साम्राज्याचा जन्म, त्याचा विकास, त्याचं ऐश्वर्य, त्याचा विनाश आणि शेवटी स्मशानशांतता असं मानवी इतिहासाचं चक्र दाखवायचं होतं. हे काम त्याच्यासाठी अतिशय मानसिक ताणाचं आणि थकवणारं होतं. सलग महिनोन्-महिने बंद खोलीत बसून युद्धाची, विनाशाची आणि आगीची चित्रं काढताना कोल मानसिकदृष्ट्या खचला होता. याच वेळी न्यूयॉर्कमधलं वार्षिक कला प्रदर्शन जवळ आलं होतं. त्यामध्ये कोलवर काहीतरी नवीन आणि भव्य चित्र देण्यासाठी दबाव होता. कोलनं ठरवलं की, या काल्पनिक ऐतिहासिक चित्रांमधून थोडं बाहेर पडायचं आणि त्याला मनापासून आवडणारा अमेरिकेचा खराखुरा निसर्ग पुन्हा एकदा मोठ्या कॅनव्हासवर मांडायचा! यामधूनच 'द ऑक्सबो' चित्राची निर्मिती झाली. 'द ऑक्सबो' चित्रात निसर्गाची दोन रूपं दिसतात. उजवीकडे मुसळधार पाऊस, जंगल, पर्वत दिसतंय. उजव्या टोकाला दूरचे डोंगर, त्यावर कोसळणारा पाऊस आणि चमकणारी वीज दिसतीये. याउलट उजवीकडे वादळाचा लवलेशही नाही. आकाशात ढगांमधून बाहेर आलेले कोवळं ऊन पसरलंय. खाली नदीनं जमिनीवर एक सुरेख, अर्धगोलाकार वळसा घेतलाय. चित्रात कोलनं स्वत:ला कॅनव्हास आणि कुंचला घेऊन दाखवलंय. पुढच्या भागात दिसणारं वीज कोसळलेलं, मोडकळीस आलेलं झाड मानवी नश्वरतेचे आणि निसर्गाच्या रौद्र रूपाचं प्रतीक आहे.

# मुंढे नावाचा नवा शेषन!

तुकाराम मुंढे यांनी 'एफडीए' आयुक्त म्हणून सुरू केलेली कामगिरी धडाकेबाज आहे. जनता आतापर्यंत विष प्राशन करत होती हे त्यांच्या धाडसत्रातून दिसते. मुंढे यांना त्यांची कर्तबगारी दाखवण्याची संधी इतर क्षेत्रांतही मिळायला हवी. मुंढे यांच्या धडाक्याने मला टी. एन. शेषन यांची आठवण झाली.

तुकाराम मुंढे यांनी जनतेला स्वच्छ, भेसळमुक्त अन्न वगैरे देण्याचा विडा उचलला आहे. हॉटेल्स, पेट्रोल पंप, मेस, मिठाईच्या दुकानांवर त्यांनी घातलेल्या धाडी लक्षवेधी ठरत आहेत. मुंढे यांचा रणगाडा सुसाट सुटला आहे. महाराष्ट्रात आपण सर्व अशुद्ध पाणी, भेसळयुक्त अन्न पचवत आतापर्यंत कसेबसे जगलो याबद्दल देवाचे आभार मानायला हवेत. तुकाराम मुंढे यांच्या धाडी सुरू असतानाच देशाचे गृहमंत्री अमित शहा यांची प्रकृती बिघडली व त्यांना इस्पितळात दाखल केले. शहा यांना अन्नातून विषबाधा झाल्याचे निदान झाले व ते एकदम गलितगात्र झाले. शहा यांना कोणत्या अन्नातून विषबाधा झाली? त्यांनी ते अन्न कोठे खाल्ले? या तपासाची जबाबदारी मुंढेंवर सोपवायला हवी. मुंढे यांनी हायकोर्टाच्या कॅण्टीनवर धाड घातली. मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या 'पंचतारांकित' खाणावळीत उंदीर फिरत असल्याचे कळले म्हणून तेथे धाड टाकून ती खाणावळ बंद केली. एमसीए मुंढेंविरुद्ध हायकोर्टात गेली व कोर्टाने मुंढे यांना झापले. मुंढे कोणालाच सोडत नाहीत. संपूर्ण जग, समाज, व्यवस्था, प्रशासन भ्रष्ट आहे. ती सफाई करण्याची जबाबदारी ईश्वराने आपल्यावरच सोपवली असल्याचे ते मानतात. फडणवीस यांचे हिंदुत्ववादी मंत्री नितेश राणे यांनी सांगितले की, मुंढे फक्त हिंदूंच्याच दुकानांवर धाडी घालतात. मुस्लिम मोहल्ल्यांत धाडी घालून दाखवा. मुंढे यांनी लगेच सुलेमान मिठाईवाल्यावर धाड घालून त्यांचा मिठाई विक्रीचा परवानाच रद्द केला. मुंढे थांबत नसतात. ते धाडी घालत धावत सुटतात. उपनगरातल्या पंचतारांकित हाटेलमध्ये एक प्रख्यात डॉक्टर आपल्या मित्रांसह जेवायला गेले. जेवणाची ऑर्डर दिली. तोपर्यंत प्लेटस् वगैरे मांडल्या. प्लेटच्या आसपास एक झुरळाचे पिल्लू फिरताना डॉक्टरांनी पाहिले. डॉक्टरांना 'मुंढे' आठवले. त्यांनी त्या झुरळाचा फोटो काढून समाजमाध्यमांवर टाकला. लगेच मुंढे यांचे धाड पथक त्या हॉटेलात उलथापालथ घडवायला धडकले. एफडीएने सध्या महाराष्ट्रात अशी धमाल माजवली आहे. मुंढे यांचे फोटो झळकत आहेत. चॅनल्सवर मुलाखतींचे कार्यक्रम सुरू आहेत. महाराष्ट्रातील दुष्काळात होरपळलेला शेतकरी मदतीसाठी याचना आणि आक्रोश करीत आहे त्याप्रमाणे मुंढे यांनी बंद केलेल्या हॉटेल्स, दुकानांतील बेरोजगार स्टाफही सरकारकडे मदतीसाठी याचना करीत आहे!



### भेसळीचा मार्ग

महाराष्ट्रच नव्हे तर भारतातील अनेक खाद्यपदार्थांमध्ये भेसळ होते. सगळ्यात जास्त भेसळ दुधात व दुधापासून बनवलेल्या पदार्थांत होते. दूध मलईदार, शुभ्र दिसावे म्हणून त्यात 'युरिया' मिसळले जाते. पनीर, खवा यांपासून बनवल्या जाणाऱ्या मिठाया म्हणजे 'जहर' ठरल्या आहेत. मिठाईवरील चांदीचा 'वर्ख' आरोग्यास धोकादायक आहे. हे सर्व बंद करून मुंढे यांनी जनतेवर उपकार केले आहेत. निवडणूक आयोगात टी. एन. शेषन यांनी ज्याप्रमाणे आचारसंहितेची अंमलबजावणी सुरू केली त्याच पद्धतीने मुंढे यांनी एफडीएमध्ये असलेल्या नियमावलीची अंमलबजावणी सुरू केली. मुंढे स्वतःचे असे काहीच करत नाहीत. ते फक्त नियम व कायद्याची अंमलबजावणी करीत आहेत, पण शेषन यांनी आचारसंहिता अंमलबजावणीचा अतिरेक केला. तीच शेषनगिरी मुंढे करत आहेत काय? सर्व काही बंद करून मुंढे काय साध्य करणार? मुंढे यांच्या खात्याचे मंत्री नरहर झिरवळ आहेत.

इतक्या महत्त्वाच्या व संवेदनशील, जनहिताच्या खात्याची धुरा झिरवळांसारख्या मंत्र्यांना द्यावी हे अक्कलशून्यतेचे लक्षण आहे. अन्न-औषध प्रशासन खाते म्हणजे सर्वात मोठ्या खाऊबाजीचे कुरण असे ज्या मंत्र्यांना वाटले त्या मंत्र्यांची अवस्था मुंढे यांनी बिकट केली. धाडी घालून मांडवली करायची. गुटखा, तंबाखूच्या परराज्यांतून आलेल्या ट्रक्सकडून वसुली करायची व विष घालून माणसे मारायची हे सर्व मुंढे यांनी तूर्त तरी थांबवले आहे. अर्थात म्हणून राज्यातली भेसळ, भ्रष्टाचार थांबला असे होत नाही, पण भेसळ करणाऱ्यांच्या मनात भीती निर्माण झाली आहे, हे नक्की. एखादे खाते अनियमिततेविरुद्ध कठोर पावले उचलते तेव्हा त्या खात्यातील भ्रष्टाचाराचा 'रेट' वाढतो. असे सांगितले जाते. एखादा नवा पोलीस अधिकारी आला की, आपल्या विभागातील दारू, मटके, जुगाराच्या अड्ड्यांवर धाडी घालून ते बंद पाडतो, पण हे अड्डे कायमचे कधीच बंद पडत नाहीत. मुंढे यांच्याबाबतीत तसे म्हणणे हा अन्याय ठरेल, पण त्यांच्या धाड पथकांनी मांडलेला हैदोस दुर्लक्षित करण्यासारखा नाही. मुंढे यांनी औषधांचा, सलाईनचा काळाबाजार रोखला आहे. मोठे राकेट तूर्तास 'थंड' पाडले आहे हे खरेच, पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंढे यांना एकाच खात्यात मर्यादित ठेवू नये. त्यांच्या धडाकेबाज कार्याचा लाभ इतर क्षेत्रांनाही मिळू द्या. ते कसे?

तुकाराम मुंढे यांच्यातला 'शेषन' जागा आहे तोपर्यंत फडणवीस यांनी त्यांचा योग्य वापर केला पाहिजे. महाराष्ट्राच्या अनेक क्षेत्रांत भ्रष्टाचार आणि बजबजपुरी माजली आहे. आर्थिक शिस्त बिघडली आहे. महाराष्ट्रावर ठिकठिकाणी बेमुर्वतखोर वतनदारांचे राज्य सुरू आहे. हे सर्व थांबवण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी एका टास्क फोर्सची स्थापना करावी व त्याचे नेतृत्व तुकाराम मुंढेंकडे द्यावे.

मुंढे यांच्या शरीरातला सचोटीचा अग्नी अशा पद्धतीने बाहेर पडू द्या. फडणवीस यांनी तुकाराम मुंढे यांच्यासारखे पाच अधिकारी प्रशासनातून निवडायला हवेत. (पण असे पाच मोती मिळतील काय?) नगरविकास, महसूल, शक्तिपीठ मार्ग, शालेय पोषण आहार, आदिवासी विकास मंत्रालय, सहकारातील घोटाळे व ओरबाडणे यावर नियंत्रण ठेवण्यासाठी 'मुंढे टास्क फोर्स' निर्माण झाला तर महाराष्ट्राची प्रतिमा सुधारेल. मुंढे हे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातल्या भ्रष्ट नेटवर्कवरच धाडी घालतील. त्यानंतर भाजपचे लोक, जे आज मुंढे यांच्या कार्याचे कौतुक करत आहेत, तेच ओरडू लागतील, 'मुंढे देशद्रोही आहेत. फडणवीस यांना बदनाम करण्यासाठी मुंढे हे विरोधकांची सुपारी घेऊन काम करत आहेत.'